# THE BOOK WAS DRENCHED

UNIVERSAL LIBRARY
OU_192846
UNIVERSAL LIBRARY

OSMANIA UNIVERSITY LIBRARY
SHEC
चन्द्रगुप्त

556—13-7-71—4,000

OSMANIA UNIVERSITY LIBRARY

all No M 8 Accession No M 2 1 0 1

uthor

le Chandranath

is book should be returned on or before the date last marked below

शरत्-साहित्य माला—१

# चन्द्रनाथ

[ शरच्चन्द्र चतर्जींच्या मूळ बंगालीवरून ]

अनुवादक
**यशवन्त तेंडुलकर**

प्रस्तावना लेखक
**श्री. वि. स. खांडेकर**

प्रकाशक
**नवभारत प्रकाशन संस्था—मुंबई ४**

**१९३८**

**किंमत १ रुपया**

मुद्रक—
रघुनाथ दिपाजी देसाई,
न्यू भारत प्रिंटिंग प्रेस,
६ केळेवाडी, मुबई नं. ४

शरत्-साहित्य मालेचें
पुढील पुस्तक
**चार मिनार**
[ शरच्चन्द्राच्या निवडक कथांचा संग्रह ]
लवकरच प्रसिद्ध होईल.

[ सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन ]

प्रकाशक—
रघुनाथ दिपाजी देसाई,
नवभारत प्रकाशन संस्था,
मुंबई नं. ४.

# आरंभींचे दोन शब्द

आतर्प्रांतीयच नव्हे तर आतर्राष्ट्रीय कीर्ति ज्याच्या वाङ्मयानें मिळविली त्याचें महत्त्व आम्हीं काय निराळें सागणार! ज्याना तें अद्याप अज्ञात असेल, त्याना श्री. खाडेकराच्या 'लामणदिव्या' च्या चक्क प्रकाशात तें चागलें ज्ञात होईल. हा प्रकाश पाडून त्यानीं व्यक्तिशः आम्हास अत्यत ऋणी केलें आहे.

आमच्या 'निवेदना' च्या पणतीची वात पेटविण्याची त्यानीं आवश्यकता ठेविली नाहीं, याबद्दल आम्हीं त्याचे आभारी आहों.

सध्याचे दिवस आतर्प्रांतीय सलोखा अधिकाधिक वाढवून एकदेशीयत्व दृढतर करण्याचे आहेत. अशावेळीं परस्पराचा परिचय परस्परानीं करून घेऊन, एकमेकाचीं मनें ओळखलीं पाहिजेत, एकमेकाच्या आशा आकाक्षा ओळखल्या पाहिजेत, परस्पराच्या जीवनात हरघडी चालू असलेल्या खळबळी, धडपडी, वावटळी समजून घेतल्या पाहिजेत. त्यामुळें सहानुभाव निर्माण होईल, आत्मीयता जागृत होईल, 'अनेक असूनहि एक' ही राष्ट्रहितपोषक भावना वाढीस लागेल व दृढमूल होईल. हा परिचय करून घेण्याचे मुख्य साधन 'वाङ्मय' हेंच होय. वाङ्मय,–विशेषतः ललित-वाङ्मय हें समाजाच्या अंतःकरणाचें बोलके चित्र असतें. कोणताहि आडपडदा न राहता सारें सारें काहीं त्यात तुम्हाला दिसेल. बकीम, रवीन्द्रनाथ किंवा शरच्चंद्र यासारख्या 'यथा दर्शन तथा चित्रलेखन' करणाऱ्या साहित्यिकाच्या समाजचित्रात समाजाचा कोनान् कोंपराहि स्पष्ट दिसेल.

वंगवाङ्मयात बंकिम, रवीन्द्रनाथ यानीं स्वतःच्या कर्तबगारीनें स्वतंत्र

गादी निर्माण करून स्वत च्या छापाचे चलन एके काळीं सुरू केलें. शरच्चंद्रानींहि तेच केले आहे. या चलनाबरहुकूम, पण वरचा छाप बदलून काहीं नाणीं पाडण्याचा महाराष्ट्रात प्रयत्न झाला. पण तीं संग्रहीं ठेवावी इतके महत्त्व कोणालाही वाटलें नाहीं. उलट अस्सलाबद्दलच आतुरता वाढली व वाढत आहे. ही आतुरता लक्षात घेऊनच 'शरत्-साहित्या'चे सपूर्ण दर्शन महाराष्ट्रीय बाधवास करून देण्याचें आम्ही योजिले आहे '**चन्द्रनाथ**' नंतर थोड्या थोड्या अतराने शरद्बाबूंच्या कादबऱ्या व कथा प्रसिद्ध केल्या जातील. वाचकवर्गाकडून जितक्या मोठ्या प्रमाणात आमच्या या प्रयत्नाला आश्रय मिळत जाईल तितक्या प्रमाणात या प्रकाशनाचा वेग वाढेल व वाचकास 'सपूर्ण दर्शना'साठीं फार काळ तिष्ठत रहावे लागणार नाहीं. वाचकवृंदाकडून आम्हास भरपूर उत्तेजन मिळेल असा दृढ विश्वास आहे.

—प्रकाशक.

# लामणदिवा

लहानपणीं हाताला लागणारी प्रत्येक कादबरी मी उत्सुकतेनें वाचीत असे. त्यावेळीं वडील माणसापुढे हें कबूल करायचा धीर होत नसे ही गोष्ट निराळी ! आपला मुलगा रात्रीं बाराबारा वाजेपर्यंत जागून अभ्यास करीत आहे म्हणून त्याचें कौतुक करणाऱ्या आईला तो घरातले तेल कादंबऱ्याच्या पायीं जाळत आहे हे कळलें असते तर—तर काय झालें असते हें सागायला कशाला हवे ? मात्र अशा रीतीने वडील पिढीची फसवणूक करणारीं मुलें सर्वस्वीं दोषी असतात असें अजूनही मला वाटत नाही. काव्यप्रियता हा मानवी मनाच्या विकासाचा अत्यत आवश्यक घटक आहे हे जाणून कितीसे आईबाप आपल्या मुलाना वाढवीत असतात ? अष्टौप्रहर रुक्ष वातावरणात वावरणाऱ्या मुलाची अद्भुत-रम्यतेची आवड त्याना थोडीच स्वस्थ बसू देते ! जे प्रत्यक्ष जीवनात अनुभवता येत नाहीं, तें स्वप्नात पाहण्याची मानवी मनाची प्रवृत्ति नैसर्गिकच आहे. आणि कादबऱ्या म्हणजे सामाजिक प्रतिभेला पडणारीं तरल परंतु मधुर अशीं स्वप्नेच नाहींत काय ?

आपल्याला पडणाऱ्या स्वप्नापैकीं बहुतेक आपण दुसऱ्याच क्षणीं विसरून जातों. मात्र एखादें स्वप्न नदीच्या प्रवाहाबरोबर डुलतझुलत जाणाऱ्या फुला-प्रमाणे आपल्या आयुष्याच्या ओघाबरोबर वाहत येत असते. असले स्वप्न विसरू म्हटलें तरी त्याचा विसर पडत नाहीं. एखादी कादंबरीही अशीच असते. प्रत्यक्ष वाचनाच्या वेळीं तिने ज्या यक्षभूमींत आपल्याला नेलेलें असतें ती स्मृतिशेष झाली असली, तरी त्या कादंबरीची आठवण झाली कीं आपले मन आनंदित झाल्याशिवाय राहत नाहीं. मी लहानपणीं वाचलेल्या कादंबऱ्यापैकीं ‘ प्रणयपंक ’ ही कलाकृति अशीच आहे. इतर कादंबऱ्या-

प्रमाणे तीही मी अधाशीपणानेच वाचून काढली. पण ही कादंबरी हाता-वेगळी केल्यावर मनाला जी चुटपुट लागली ती अजून गेली नाही. सवड झाली की 'प्रणयपंक' पुन्हा सावकाश वाचण्याचा माझा बेत अद्यापिही कायम आहे त्या कादंबरीत असे विशेष काय आहे हे त्यावेळी मला दुसऱ्याला सांगता आले नसते. पण साध्या प्रकाशाला सरावलेले डोळे विद्युत्प्रकाशाने एकदम दिपून जात नाहीत का? माझी स्थितीही त्यावेळी तशीच झाली.

आणि पुढे महत्त्वाच्या तेवढ्याच मराठी कादंबऱ्या वाचण्याचा परिपाठ मी ठेवला असला तरी 'प्रणयपंका'चे जनक शरच्चंद्र चतर्जी यांच्या कुठल्याही कृतीचा अनुवाद प्रसिद्ध झाला असे ऐकले की मी तो वाचण्याला आतुर होतो. 'गीतांजलि' इंग्रजीतून वाचताना आपणाला बंगाली येत असते तर फार बरे झाले असते असे मला वाटले होते. 'अनलज्वाला', 'नवी क्षितिजे' वगैरे शरच्चंद्राच्या मराठीत रूपांतरित झालेल्या कादंबऱ्या वाचताना हीच इच्छा पुन्हा बळावली. पण या इच्छेची मजल 'बंगाली-मराठी शिक्षक' विकत घेण्यापलीकडे गेली नाही हे सांगायलाच नको. लवकर उठणे नियमित व्यायाम करणे, दुसऱ्यावर उगीच न रागावणे, गरिबांना मदत करणे वगैरे गोष्टींप्रमाणेच दुसरी भाषा शिकून तिच्यातील आपल्या आवडत्या लेखकाचे अक्षर नि अक्षर वाचून काढणे ही गोष्टही प्रत्येकाच्या संकल्पात समाविष्ट झालेली असते. पण असले संकल्प सिद्ध न होण्यातच अधिक काव्य असावे!

शरच्चंद्राचे थोडेसे अनुवादित लिखाण वाचल्यामुळे ज्याची त्याच्या वाङ्मयाविषयीची उत्सुकता अधिकच वाढली आहे असा रसिक वाचक-वर्ग मराठीत निश्चित आहे. तो 'चंद्रनाथ' या प्रस्तुत दीर्घकथेपासून सुरू होत असलेल्या 'संपूर्ण शरच्चंद्रा'चे आनंदाने स्वागत करीलच. पण मराठी कादंबरी-वाङ्मयाच्या प्रगतीच्या दृष्टीनेही ही योजना स्वागतार्ह

आहे. मातृभाषेपलीकडील वाङ्मयाचा परिचय बहुजनसमाजाला जितका कमी तितकी त्याची रसिकताही संकुचित ! नदीचे पात्र कितीही विस्तीर्ण झाले म्हणून त्याला समुद्राची सर येईल का ? वाङ्मयाचेही तसेच आहे. अन्य भाषातील कृतींचे उत्कृष्ट अनुवाद वाचनात आले की वाचकाची रसिकता व्यापक होते, त्याच्या आपल्या लेखकाविषयींच्या अपेक्षा वाढू लागतात आणि ह्या अपेक्षा तृप्त करण्याकरिता झटणाऱ्या कलावंताच्या कृतींतूनच वाङ्मयाचे पाऊल पुढे पडत जाते.

‘ अनलज्वाला ’, ‘ प्रणयपंक ’ किंवा ‘ नवी क्षितिजे ’ या कादंबऱ्यातले परिणत प्रतिभेचे शरच्चंद्र ‘ चंद्रनाथ ’ या दीर्घकथेत वाचकांना आढळणार नाहीत. पण नदीच्या उगमाजवळ पात्राचा विस्तार आणि खोली कमी असली म्हणून तिच्या पाण्याची गोडी कमी असते असे थोडेच आहे ! गुलाबाच्या झाडाला लागणारी सारीच फुले काही टपोरी नसतात. काही लहान असतात, कित्येकांना किंचित् कीडही लागलेली असते. पण असे असले तरी गुलाबाला काही कोरांटीची फुले लागत नाहीत ! प्रतिभासंपन्न लेखकाच्या कलाकृतीही अशाच वैशिष्ट्यपूर्ण असतात.

‘ चंद्रनाथा ’त शरच्चंद्रांची अनेक वैशिष्ट्ये सरस रीतीने प्रगट झालीं आहेत. ‘ देवदासा ’प्रमाणे या दीर्घकथेलाही लेखकाने नायकाचे नाव दिले आहे. पण ‘ देवदास ’ मध्ये देवदासापेक्षा पार्वतीचेच दु:ख जसे आपल्याला आकृष्ट करते, त्याप्रमाणे ही कथा वाचताना चंद्रनाथापेक्षा सरयूच वाचकाला जवळची वाटते किंबहुना शतकानुशतके गुलामगिरीच्या शृंखलांनी बद्ध झालेल्या स्त्री-जातीची अनंत मूक दु:खे बोलकी करण्याकरिताच शरच्चंद्रांचा अवतार होता, असेच ही कथा वाचूनही मनात आल्यावाचून राहत नाहीं. सरयूवर आपल्या अंत:करणातील अमृताचा वर्षाव करणारा चंद्रनाथ ती पतितेची मुलगी आहे असे कळताच ‘ तू विष खाऊ शकशील ? ’ असा प्रश्न तिला विचारतो ! ही घटना जेवढी विलक्षण तेवढीच विदारक आहे.

अंध आणि क्रूर अशा रूढिदेवतेला कितीतरी निरपराधी स्त्रिया आपल्या समाजात प्रत्यही बळी दिल्या जात आहेत. स्त्रीचा सर्वांत मोठा आधार जो पति तोच तिच्यावर उलटल्यावर तिने कुणाच्या तोंडाकडे पाहायचे ? देव, ब्राह्मण, अग्नि या सर्वांच्या साक्षीने घेतल्या जाणाऱ्या शपथा स्त्रीला बंधनकारक आहेत, पुरुषाला नाहींत ! या दीर्घकथेतील नायक चंद्रनाथ दुष्ट नाही हे खरे. पण तो दुबळा आहे, आणि दुष्टपणापेक्षाही दुबळेपणानेच जगात अधिक अनर्थ घडून येतात. ज्या समाजाच्या भीतीने तो सरयूला प्रथम विषाचा प्याला प्यायला सांगतो व शेवटी घराबाहेरची वाट दाखवितो, तो समाज ही काय चीज आहे याचा त्याने कधीतरी विचार केला आहे काय ? कथेच्या शेवटी त्याचा चुलता मणिशंकर म्हणतो, ' समाज आम्ही, समाज तू आणखी कोणी या गावात तरी नाही. ज्याच्यापाशीं संपत्ति तोच समाजपति. मला वाटलं तर मी तुझी जात बाटवूं शकतो, तुला वाटलं तर तू माझी जात बाटवूं शकतोस. समाजाची पर्वा करूं नकोस ! ' हे उद्गार असत्य आहेत असे कोण म्हणू शकेल ? समाज, समाज या मोठ्या नावाखालीं गरीबांच्या पायात जन्मभर दीडदीड मणाच्या बेड्या घातल्या जातात, त्यांच्या झोपडींतल्या निर्मळ पाण्यात प्रसंगी विषही कालविलें जातें ! स्वर्गातल्या चित्रगुप्तापासून पृथ्वीवरल्या पोलिसापर्यंत प्रत्येकजण गरीबांचे गुन्हे पाहण्यात दक्ष असतो हेंच खरें !

सरयूला घरातून हाकलून दिल्यानंतर चंद्रनाथ उदास होऊन इकडे तिकडे भटकूं लागतो व शेवटी पश्चात्तप्त होऊन सरयूला परत घरीं आणतो हे दाखविताना शरच्चंद्रांनी भावनांचे मनोहर चित्रण केले आहे पण सरयूच्या जीवनमंदिराला लागलेली आग त्यांनी जेवढ्या सहजतेने विझविलेली आहे, तेवढ्या सहजतेनें ती जगात मात्र शांत होत नाही. जो भुतांच्या हातात कोलीत देतो, त्याने मागून पश्चात्तापाचे कितीही अश्रु गाळले तरी त्याला त्या आगींत जळून खाक व्हावेंच लागतें.

कथेच्या शेवटी मणिशकर काकाच्या तोंडीं शरच्चद्रानी खालील महत्त्वाचे उद्गार घातले आहेत ' बाबा, प्रायश्चित्त असत पापक्षालनासाठीं ! पण जिन पापच केलेल नाहीं, तिला प्रायश्चित्ताची आवश्यकता काय ? सुनेचा ( सरयूचा ) काही दोष नाही. उगाच प्रायश्चित्ताची गोष्ट काढून तिचा अपमान करू नकोस. ' चद्रनाथाच्या मनात सरयू कुलीन नाही हे विष भरवून देणाऱ्या मनुष्याच्या तोंडून असले उदार उद्गार बाहेर पडायला त्याला मध्यतरी तसाच विलक्षण अनुभव आला असला पाहिजे. परतु कथेत तर मणिशकर काकाच्या आयुष्यात वाऱ्याची झुळुकही आलेली दाखविली नाहीं, मग वावटळ दूरच राहिली ! शरच्चद्रानाही याची जाणीव असावी त्यानी लगेच पुढील मल्लिनाथी केली आहे — मणिशकर काकाच्या तोंडी हे बोलणे अगदी नवीनच दिसले. चद्रनाथ चकित होऊन पाहत राहिला. ते पुन्हा म्हणाले ' काही ना काही दोष, काही ना काही लाजेकाजेची गोष्ट प्रत्येक घरी आहे हे पाहता पाहताच मी म्हातारा झालो. मनुष्याला आपल्या दीर्घ जीवनात कितीतरी चालाव लागत. या दीर्घ जीवनपथात कुठ चिखल, कुठ शेवाळ, तर कुठ उचसखल असत. आणि म्हणूनच लोक पाय घसरून पडतात, बाबा पण ते आपली ही फजिती सागत नाहीत, फक्त दुसऱ्याविषयींच बोलतात. दुसऱ्याचे दोष, दुसऱ्याविषयीच्या लज्जास्पद गोष्टी घसा फोडून ते सागतात. का, तर केवळ स्वत.चे दोष लपविण्यासाठी. त्याना वाटत कीं दुसऱ्याविषयीच्या कोलाहलात आपल्या लाजिरवाण्या गोष्टी उघडकीस येणार नाहीत ! '

मणिशकर काकाच्या तोंडी हे उद्गार ओढून ताणून आणल्यासारखे दिसत असले तरी ते किती सत्य आहेत ! ' जो पतित नसेल त्यानेच या पतितेला धोंडा मारावा ' असे ख्रिस्त सागून गेल्याला दोन हजार वर्षे होत आली. पण अजून व्रणावर टोच मारणाऱ्या कावळ्याप्रमाणे आपल्या भोवतालच्या माणसाच्या व्यगाची कुचेष्टा करून जग आपली करमणूक करून घेत आहे. ' दैवायत्त कुले जन्म मदायत्त तु पौरुषम् ' हे कर्णाचे

उद्गार शतकानुशतके आमच्या कानात घुमत आहेत. पण कुलीन आणि अकुलीन, उच्च जातीचा आणि हलक्या जातीचा अशा भेदात रममाण होण्याची आमची मनोवृत्ति मात्र अजूनही कायमच आहे! आमच्या उपनिषदात जगाला चकित करील असे तत्त्वज्ञान आहे, आमच्या भगवद्गीतेत 'समः सर्वेषु भूतेषु' असा सुंदर उपदेश आहे, आमच्या मनुस्मृतीत 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता' अशी उत्कृष्ट शिकवणही आहे. पण ज्यावेळी सरयूसारखी साधीभोळी मुलगी तिची आई परक्या पुरुषाचा हात धरून घरातून बाहेर पडली होती एवढ्याच कारणामुळे घरातून हाकलून दिली जाते, त्यावेळीं समाजच काय पण पतिही तिच्या शुद्ध चारित्र्याचा आणि प्रेमळ हृदयाचा विचारसुद्धा करीत नाही. त्यावेळी हे तत्त्वज्ञान, हा उपदेश आणि ही शिकवण त्याला जागृत करायला क्षणभर तरी उपयोगी पडू शकतात काय? मणिशंकराच्या तोंडी घातलेल्या या उद्गारातून शरच्चंद्र एकच गोष्ट सांगत आहेत - शिक्षण, सुधारणा, धर्म, हीं नुसती समाजाची जरीची वस्त्रे आहेत. रानटी काळातील वल्कलांचे रूपांतर आता तलम रेशमी वस्त्रांत झाले आहे. पण वस्त्रे बदलली म्हणून काही अंतःकरणात पालट होत नाही. मनुष्याची खरी सुधारणा अजून व्हायचीच आहे! कुठल्याही पोपटपंचीच्या धर्मापेक्षा मानवधर्माचे महत्त्व आपल्या अंतःकरणाला अधिक वाटले पाहिजे. तरच ही सुधारणा घडून येईल. चित्र चौकटीकरिता नाही, तर चौकट चित्राकरिता आहे. कधीकाळी सद्हेतूने घालण्यात आलेल्या पण मानवी स्वभावाचा कोंडमारा करणाऱ्या भलत्याच नीतिनियमांचा आणि रूढ कल्पनांचा समाजात काहीं उपयोग नाही! मनुष्याचा देव करण्याच्या नादात त्याला पिशाच्चाचे स्वरूप प्राप्त होण्याचा संभव असतो हे विसरू नका! नीतीकरिता अगर तिच्या शाब्दिक खेळाकरिता मानवजाति जन्माला आलेली नाही! तर मानवजातीच्या सुखाकरिता, हिताकरिता, प्रगतीकरिता नीतीला मानवतेने जन्म दिला आहे.

'चन्द्रनाथ' वाचताना या कथेचा नायक तोच असावा असे प्रथम मला वाटले. पण जसजसा कथेचा विकास होत गेला तसतसा चद्रनाथ हे नुसते निर्जीव बाहुले आहे असा माझा ग्रह होत चालला. नायिकेच्या नवऱ्याला नायक म्हटले पाहिजे या व्याख्येप्रमाणे चद्रनाथ या कथेचा नायक ठरेल ही गोष्ट निराळी ! पण या कथेतले खरेखुरे सजीव पात्र कैलासचद्र हेच आहे. चद्रनाथ कथेच्या सोईकरिता हवा तसा घडविलेला वाटतो. सरयूविषयीच्या सहानुभूतीने तिच्याशी लग्न करणारा, तिचे हीनकुळ कळताच तिला घराबाहेर घालवून देणारा आणि मग तिच्यासाठी झुरत बसणारा चद्रनाथ हे भावनाप्रधान तरुणाचे साधे-सुधे रेखाचित्र आहे. सरयूच्या चित्रात यापेक्षा अधिक मोहक रग दिसतात. समाजाच्या निंदेपासून नवऱ्याची सोडवणूक करण्याकरिता ती विष घ्यायला तयार होते पण त्याचवेळी तिच्या उदरात असलेल्या बाळजीवाची मूक हाक तिला ऐकू येते ! आणि क्रूर समाजाचा कोलाहल व भ्याड नवऱ्याची बडबड याच्यापेक्षा ती हाकच तिला अधिक महत्त्वाची वाटते. हा प्रसग निःसशय सुदर आहे. तथापि कैलासचद्राच्या घरी सरयू गेल्यानतर मात्र तिच्या स्वभावाचा कुठलाही चमकदार पैलु दृष्टीला पडत नाही. आणि यामुळेच कैलासचद्र या कथेचा नायक ठरतो.

ही भूमिका शरच्चद्रानी मोठ्या कुशलतेने चित्रित केली आहे. बुद्धिबळाच्या खेळाचे वेड असलेला हा म्हातारा प्रथम वाचकाना भेटतो तेव्हा थोडासा हास्यरस निर्माण करण्याकरिता तर लेखकाने या पात्राची योजना केली नाही ना अशी त्याना शका येते. पण समुद्राच्या पृष्ठभागावर फेस तरगत असला तरी त्याच्या तळाशी मोत्याचे शिपलेच असतात. नाहीं का ? चद्रनाथ सरयूला घराबाहेर घालवितो. ती आपला मूळचा आश्रयदाता हरिदयाळ याच्याकडे येते. पण हरिदयाळचे पोट समाजाच्या कृपादृष्टीवर अवलबून असल्यामुळे तो तिला दारातही उभी करीत नाही. आडविहीर जवळ करण्याखेरीज सरयूला गत्यतरच उरत नाही. अशावेळी सकाळपासून

संध्याकाळपर्यंत बुद्धिबळाच्या नादात गुंग असणारा कैलासचंद्र या दुर्दैवी परित्यक्तेला पोटाशीं धरतो. पृ. ८२–८३ वरील हा प्रसंग किती हृदयस्पर्शी आहे ! पोटार्थी हरिदयाळ शेवटी कैलासचंद्राला विचारतो, 'काका, शेवटी तुम्ही देखील आपली जात सोडणार ना ?' या प्रश्नाला कैलासने दिलेले उत्तर मोठे मजेदार आहे. तो म्हणतो, 'हाय बाबा, तू घेत असलास तर देऊ शकतो ! '

बुद्धिबळाचे वेड हे कैलासचंद्राने आपल्या अंतःकरणातल्या खोल जखमेला लावलेले कसले तरी औषध आहे. त्याचा कमलचरण त्याला सोडून गेला होता. जगात कुणासाठी जगायचे हेंच बिचाऱ्याला कळत नव्हते. ओके ओके वाटणारे घर बुद्धिबळातल्या घोड्यांनी आणि हत्तींनी भरल्यासारखे वाटेल असा त्याला भास झाला तर त्यात नवल कसले ! पण सरयूच्या बाळाने त्याच्या घरात पाऊल टाकताच राजे, वजीर, हत्ती आणि घोडे सर्व कोपऱ्यात जाऊन पडले ९३-९६ या पृष्ठांवर वर्णिलेल्या 'विशू'च्या कैलासचंद्राशी चालणाऱ्या बाललीला मोठ्या गमतीच्या वाटतात. वृद्ध कैलासचंद्राचे बाल्य परत घेऊनच विशू देवाघरून आलेला दिसतो. विशूचे लाल रंगाच्या वजीराचे वेड आणि त्याचा कथेच्या शेवटी केलेला करुण उपयोग मोठा कलासुंदर आहे. पृ. ९७-९८ वर सांगितलेली भरतराजाची कथाही किती सूचक आहे !

वीरपुरुष कुठल्याही क्षेत्रात जावो, तो पराक्रम केल्याशिवाय राहत नाहीं. प्रतिभासंपन्न कलावंताचेही तसेंच आहे. 'चंद्रनाथ' ही शरच्चंद्राच्या अर्धस्फुट प्रतिभेची कृति असली तरी तिच्यातील कैलासचंद्राचे चित्रण त्याच्या एका असामान्य शक्तीचे द्योतक आहे. याच शक्तीने पुन्हा 'देवदासा'तली चंद्रा निर्माण केली

बाह्यस्वरूपात देशकाल-परिस्थितीचे कितीही अंतर असले तरी ललितकृतींचे अंतःस्वरूप किती एकरूप असते हे 'चंद्रनाथा'तल्या काहीं प्रसंगांवरून सहज दिसून येईल. चंद्रनाथ सरयूला शोधण्याकरिता कैलासचंद्राच्या

घरीं येतो तेव्हा त्याची बाहेर खेळत असलेल्या विशूशीच प्रथम गाठ पडते हा प्रसंग घ्या ! शाकुंतलाच्या शेवटीं दुष्यंत शकुंतलेची क्षमा मागण्याकरिता आश्रमांत जातो आणि पहिल्यांदा सर्वदमन त्याच्या दृष्टीला पडतो या प्रसंगासारखाच तो नाहीं का ? इथे घरांतली मोलकरीण 'कुणी तरी साहेब बाहेर आला आहे नि आपल्या विशूला घेऊन तो नाचत आहे' अशी बातमी आंत जाऊन सरयूला कळविते. त्यामुळे या वत्सल चित्राला एका हास्यछटेचीही जोड मिळाली आहे. दुष्यंताच्यावेळी साहेबी पोशाख नव्हता त्याला बिचारा कालिदास काय करणार ?

चंद्रनाथानें केलेला सरयूचा त्याग हा रामानें केलेल्या सीतेच्या त्यागासारखाच नाहीं का ? इब्सेनच्या Doll's House मधील नोरा व तिचा नवरा यांच्यांतल्या शेवटच्या वाग्युद्धाची पुसट आठवण करून देणारा प्रसंगही 'चंद्रनाथ'मधे आहे. 'आपल्या आवडत्या माणसाकरिता कोणताही पुरुष आपल्या अब्रूवर पाणी सोडायला तयार होणार नाहीं' असें नोराचा नवरा म्हणतो तेव्हा नागिणीप्रमाणें चिडून नोरा उत्तर देते 'हजारो स्त्रियांनी आजपर्यंत तें केलें आहे !' पुरुषाच्या स्वार्थी पराक्रमाचा पर्वत स्त्रीचें एक निःस्वार्थी पुष्प मातीमोल करून टाकते, हा अनुभव इथेही येतो. समाजाच्या भीतीनें गोंधळून गेलेल्या चंद्रनाथाला सरयू म्हणते, 'मी इलाज सांगते. ऐकाल ?'

'हो ऐकेन. बोल, कोणता इलाज ?'

'मी विष घेतलं तर इलाज होईल ?'

'हं, हा इलाज कबूल आहे. तूं विष खाऊं शकशील ?'

'हो, खाऊं शकेन'

'अगदीं गुप्तपणें ? आजच ?'

सरयू म्हणाली, 'बरं, आजच !'

नवरा उठून जात आहे असें पाहून तिनें त्याचे पाय धरून म्हटलें, 'मला आशीर्वादसुद्धां दिला नाहीं !'

निराकार त्यागाला साकार करता करताच ब्रह्मदेवाच्या हातून स्त्रीची मूर्ति निर्माण झाली असावी !

प्रस्तुत कथेचे अनुवादक श्री. तेंडुलकर हे व्यासंगी, उत्साही आणि उदयोन्मुख असे लेखक आहेत. त्यांच्या पुढे श्री. वि. सी. गुर्जरासारख्या कुशल अनुवादकाची उदाहरणेही आहेत. तेव्हा 'हाय गे अभागे' अथवा 'सरयूच्या लहानग्या बाळाने त्याना पुनरपि या जगातील स्नेहमय जटिल मार्गावर आणून सोडले' अशा प्रकारचे प्रयोग पुढील अनुवादात येणार नाहींत अशी दक्षता ते घेतीलच. वेषांतराइतकेंच भाषांतरही बेमालूम साधणे कठीण असते. मराठीचा विशिष्ट डौल मोडणार नाही अशी काळजी रूपांतरात श्री. तेंडुलकरांनी अवश्य घ्यावी. संस्करणानें हा सफाईदारपणा सहज साध्य होऊ शकेल. घराबाहेर पडायचे असेल तर आपला जामानिमा नीटनेटका आहे की नाही हे आपण आरशात पाहतोच की नाही ? ललितकृतीचा अनुवाद हाही काही या नियमाला अपवाद नाहीं. श्री. तेंडुलकरांनी व 'नवभारत प्रकाशना'ने हातीं घेतलेले हे कार्य पार पडून मराठीला संपूर्ण आणि निरभ्र शरच्चंद्राची जोड शक्य तितक्या लवकर मिळो अशीच कुणीही इच्छा करील. कोजागिरी पौर्णिमेचे दुग्धधवल चांदणे कधी कुणाला नको झालें आहे का ?

७-९-३८<br>'हंस पिक्चर्स', कोल्हापूर.

वि. स. खांडेकर

# चन्द्रनाथ

## १

पितृश्राद्धाच्या आदल्याच दिवशीं आपले चुलते मणिशंकर मुखोपाध्याय याच्याशीं चन्द्रनाथचें काहीं कारणाने वितुष्ट आले. याचा परिणाम असा झाला कीं, दुसरे दिवशी मणिशंकरनी त्याच्या घरी येऊन ज्येष्ठ बंधूच्या श्राद्धाचीं सगळी कामे तर उत्तम प्रकारें पार पाडलीं; पण स्वतः तेथील अन्नाच्या कणालाहि शिवले नाहींत, आणि स्वतःच्या मंडळीलाहि त्यानी शिवूं दिले नाही. ब्राह्मण-भोजन आटोपल्यावर चन्द्रनाथ हात जोडून म्हणाला, " काका, माझ्याकडून काहीं चूक झाली असेल, अपराध घडला असेल तर आजच्या घडीं क्षमा करा. आपण मला वडिलाच्या ठिकाणीं आहात, मी आपल्या मुलासारखा. "

वडिलधाऱ्या मणिशंकरनी उत्तर दिले, " बाबारे, तुम्ही कलकत्त्यांत राहून बी. ए., एम्. ए. पास होऊन विद्वान् आणि शहाणे झाला आहांत. आम्ही जुनीं मूर्ख माणसे. आमच्याशीं

तुमचे पटणार नाही. पहाना, शास्त्रकारानीच म्हटले आहे—
उपटून मुळ्या शिपती डहाळ्या !

या शास्त्रोक्त वचनाशी नवे विद्वान् आणि जुने मूर्ख यांचा जरी दाट संबंध नव्हता, तरी मणिशंकरनी आपल्या मनांतील व्यक्त केलेला भाव जाणून चन्द्रनाथने स्वतःशीं प्रतिज्ञा केली की यापुढे काकाबरोबर कोणत्याहि प्रकारचा व्यवहार ठेवावयाचा नाही. तसे पाहिले तर, चन्द्रनाथच्या वडिलाच्या हयातींतच या भावाभावात म्हणण्यासारखे सख्य नव्हते. पण जेवणखाण, उठणे बसणे चाले. आता ते देखील बंद झाले. चन्द्रनाथचे वडील भरपूर पैसा-अडका ठेवून गेले होते. परतु घरात कोणी आपले असे माणूस नव्हते. फक्त चन्द्रनाथचे निपुत्रिक मामा, आणि दुसरी त्याची मामी.

सारे घर ओके ओकें दिसूं लागले तेव्हा चन्द्रनाथने आपल्या कारभाऱ्यास बोलावून म्हटलें, " सरकार महाशय, मी थोड्या दिवसासाठीं बाहेरगावी जाणार म्हणतो. आपण पूर्वीप्रमाणेच इस्टेटीकडे लक्ष द्यावे.मला परत येण्यास कदाचित् विलंब लागेल."

यावर चन्द्रनाथचे मामा व्रजकिशोर यानी हरकत घेऊन म्हटले, " छट्, आताच बाहेरगावीं जाण्याची निकड नाहीं. तुझं चित्त थाऱ्यावर नसल्यामुळं तूर्त तूं घरींच राहणं उचित."

पण चन्द्रनाथने त्यांचे ऐकले नाहीं. आपल्या इस्टेटीची सर्व जबाबदारी सरकार महाशयावर, आणि घरादाराचा भार

व्रजकिशोरवर टाकून तो अगदी सहजगत्या प्रवासाला निघाला. सोबत एक नोकरसुद्धा त्याने घेतला नाहीं.

व्रजकिशोरना त्याची पत्नी हरकाली हिने एकांतात बोलावून म्हटले, " एक काम का नाहीं केलं तुम्ही ? "

व्रजकिशोरनी विचारले, " कोणते ? "

" तो प्रवासाला निघाला तेव्हा त्याच्याकडून लिहून का घेतलं नाहीं ? माणसाचं कधी काय होईल ते सांगता येत नसतं. परगावीच अकस्मात् त्याचं काही बरं-वाईट झालं, तर रहाल कुठे ? "

व्रजकिशोरनी कानावर हात ठेवून जीभ चावीत म्हटलें, " छे छे, असले शब्द उच्चारूं नकोस. "

हरकाली रागावली आणि म्हणाली, " तुम्ही भोळसर म्हणूनच मला असं बोलणं भाग पडलं. शहाणे असता तर बोलावंच लागतं ना ! "

पण बायकोच्या कृपेने दोन चार दिवसातच व्रजकिशोरना कळून चुकले की, ती जे काही म्हणाली होती ते रास्त होते. मग ते पस्तावू लागले.

वर्षभर चन्द्रनाथ ठिकठिकाणी भ्रमण करत होता. त्यानंतर गयेला जावून त्याने आपल्या स्वर्गवासी वडलाच्या वर्ष-श्राद्ध-दिवशी पिंडदान केलें. तरी देखील घरी परतण्याची त्याला इच्छा झाली नाही. त्याने मनाशी ठरवले की, अगोदर

काही दिवस काशीवास करावा, मग पुढचें पहातां येईल. काशीत मुखोपाध्याय कुळाचे पंडे हरिदयाळ घोषाल होते. चन्द्रनाथ एके दिवशी दुपारीं हातात कॅन्व्हासची बॅग घेऊन त्याच्या घरी गेला. काशी शहर चन्द्रनाथाला अपरिचित नव्हते. यापूर्वी कितीदा आपल्या वडलांबरोबर तो तेथे आला होता. हरिदयाळहि त्याला चागला ओळखत. त्याचे असे एकाएकीं येणे घडलेले पाहून ते काहींसे चकित झाले. माडीवरील एक खोली त्याला वाटेल तेवढे दिवस रहाण्यासाठी देण्यात आली.

या खोलीला आतील बाजूस एक खिडकी होती. तिच्यातून स्वयंपाकघराचा काही भाग दिसे. चन्द्रनाथ उत्कंठापूर्वक बहुधा तिकडेच पहात रहायचा. उत्कंठा स्वयंपाकाविषयी नसे, तर तो करणाऱ्या विधवेला पाहण्याविषयीची असे.

विधवा होती सुंदर; पण तिचा चेहरा दुःखाच्या आचेने काळवंडलेला होता. तिचे तारुण्य आहे किंवा संपले याचाहि मागमूस लागत नव्हता. ती मुकाट्याने आपले काम करत राही. केवळ दहा वर्षांची एक मुलगी स्वयंपाकाच्या कामी तिला मदत करी. चन्द्रनाथ अतृप्त नेत्रांनी हेच पहात असे.

काही दिवस ती चन्द्रनाथसमोर आली नाहीं. पान वाढून ठेवून बाजूला होई. पण हळू हळू ती त्याच्या पुढ्यात येऊं लागली. एक तर चन्द्रनाथ वयाने तिच्यापेक्षा लहान होता; शिवाय,एकाच जागीं फार दिवस राहिल्यावर एकप्रकारचा आ‌ले-

पणाहि वाटतो. यामुळें आतां चन्द्रनाथच्या जेवणाच्या वेळी ती जवळ बसून आईप्रमाणे आग्रहपूर्वक त्याला जेवूं घालूं लागली.

चन्द्रनाथला आपल्या आईविषयीची कसलीहि आठवण नव्हती. अल्पवयातच मातृ-हीन झालेल्या चन्द्रनाथचे लालन–पालन पित्याने केले. त्याने आईच्या प्रेमाची बहुतेक पूर्ति केली खरी. पण अशा प्रकारचा कोमल स्नेह त्याच्या ठिकाणी नव्हता.

बापाच्या मृत्युमुळे चन्द्रनाथच्या हृदयातील रिकामे पडलेले स्थान भरून येऊं लागलें, इतकेच नव्हे, अभिनव मातृप्रेमाने त्या पितृप्रेमावर विजय मिळवला.

एके दिवशी चन्द्रनाथने हरिदयाळला विचारले, " आपल्याला कुणी जवळचे संबंधी किंवा नातलग नाही हे मला माहीत आहे; मग ही कोण ? "

हरिदयाळ म्हणाले, " ही ब्राह्मण बाई आहे. "

" आपल्या नात्यातली का ? "

" छे, कुणी नव्हे. "

" तर ही मिळाली कुठे ? "

हरिदयाळ म्हणाले, " ती एक मोठी कथा आहे. पण थोडक्यात असं—सुमारे तीन वर्षांमागं आपला नवरा व ही मुलगी याना घेऊन ती तीर्थयात्रेला आली होती. काशींत तिचा नवरा वारला. गावी ज्याच्याकडे ती जाऊन राहूं शकेल, असा नात्यापात्याचा कोणी नव्हता. पुढचं तूं पहातोसच काय ते."

" आपल्याला ही सापडली कशी ? "

" मणिकर्णिका घाटाजवळ ही मुलीसह भिक्षा मागत होती."

चन्द्रनाथ जरा वेळ विचार करून म्हणाला, " तिचं घर कुठं आपल्याला माहीत आहे का ? "

" नक्की सागूं शकत नाही. पण नवद्वीपाजवळच्या कोणत्याशा गांवी ते आहे, एवढेच मला ठाऊक आहे. "

## २

यानंतर दोन दिवसानी, जेवीत असता चन्द्रनाथने ब्राह्मण बाईच्या तोंडाकडे पाहून अकस्मात् विचारले, " आपली जात कोण ? "

ब्राह्मणीचा चेहरा फिक्का पडला. हा प्रश्न का करण्यात आला ते ती समजली. जणूं आपण काहीं ऐकलेंच नाही अशा रीतीने ती सत्वर उठून उभी राहिली, आणि तिने म्हटले, " जाते दूध आणते. "

दूध आणण्याची इतकी घाई नव्हती. काही तरी विचार करण्यासाठीच ती स्वयंपाकघरांत चालती झाली. तेथे तिची मुलगी सरयूबाला दूध एका भाड्यातून दुसऱ्या भाड्यांत ओतत होती. आईच्या उतरलेल्या चेहऱ्याकडे तिचे लक्ष गेले नाही. आईने एकवेळ मुलीच्या तोंडाकडे बघितले, आणि दुधाची वाटी हातात धरून दीर्घ उसासा सोडत ती म्हणाली—हे दुःखी-दीनाच्या प्रतिपालका, हे अंतर्यामी, मला क्षमा कर.

नंतर तिने दुधाची वाटी आणून त्याच्या पुढ्यात ठेवली व जवळच ती बसली. चन्द्रनाथने पुन्हा तोच प्रश्न केला.

एक एक करून सर्व गोष्टी जाणून घेतल्यावर शेवटीं चन्द्रनाथने विचारले, " मग आपण आपल्या घरी का नाहीं गेला ? तिकडे कुणी नाही वाटतं ? "

" पोटाला घालील असा कोणीहि तेथे नाही. "

थोडा वेळ मान खालीं घालून चन्द्रनाथने कसला तरी विचार केला. आणि मग पुन्हा विचारलें, " आपणाला ही एक मुलगी आहे, हिचं लग्न आपण कसं करणार ? "

ब्राह्मणी दीर्घ निःश्वास सोडून सावकाशपणे म्हणाली, " विश्वेश्वर जाणे ! "

तोवर चन्द्रनाथचे जेवून झाले होतें. त्याने मान वर करून म्हटले, " मी आपल्या मुलीला अजून नीट पाहिलं सुद्धा नाही; पण हरिदयाळ सांगतात कीं, ती फारच शांत नि सुशील आहे. दिसण्यात तर चांगली आहेना ? "

ब्राह्मणी किंचित् स्मित करून म्हणाली, " मी आई पडले; आईच्या दृष्टीवर भरंवसा ठेवू नये. तरी वाटतं कीं, सरयू दिसण्यांत काहीं वाईट नाही. " मनातल्या मनात ती म्हणाली, ' काशींत इतके लोक येतात जातात. पण हे रूप मला कुणातहि आढळले नाहीं. '

त्यावर तीन–चार दिवसांनी एकदा सकाळच्या प्रहरी

चन्द्रनाथने सरयूला नीट न्याहाळलें. त्याला वाटले जगात असले रूप दुर्मीळ. सरयू स्वयंपाकघरांत भाजी चिरत होती. आणखी कोणीहि तेथे नव्हते. तिची आई गंगा-स्नानाला गेली होती, आणि हरिदयाळ वहिवाटीप्रमाणे यात्रेकरूंच्या शोधार्थ बाहेर पडलेले होते.

चन्द्रनाथ तिच्या जवळ जाऊन उभा राहिला व म्हणाला—
" सरयू ! "

सरयू दचकली आणि गोंधळून म्हणाली—" अ. "

" तुला स्वयंपाक करता येतो ? "

सरयू मान हालवून म्हणाली—" हो. "

" काय काय राधायला शिकलीस ? "

सरयूने काहीच उत्तर दिले नाही. कारण, त्यामुळें आणखीही अनेक गोष्टी सागाव्या लागल्या असत्या.

चन्द्रनाथने तिच्या मनातील हेतु ताडला. त्याने दुसरीच गोष्ट काढली.—" तू आणि तुझी आई दोघेहि इथं काम करता ? "

सरयूने मान हालवून म्हटले—" हो. "

" तुला महिना काय मिळतो ? "

" महिना केवळ आईला मिळतो, मला काही नाही मिळत मला फक्त जेवण. "

" नुसत्या जेवणावरच तू काम करतेस ? "

सरयू गप्प राहिली.

चन्द्रनाथ म्हणाला, " समज मी तुला जेवूं घालन, तर माझं काम पण तूं करशील ? "

सरयू हळूच म्हणाली, " आईला विचारीन. "

" हं, अवश्य विचार. "

त्याच दिवशी चन्द्रनाथने हरिदयाळला दोन–चार गोष्टी विचारून घेऊन आपल्या कारभाऱ्यास पुढीलप्रमाणे पत्र लिहिले–

" मी सध्या काशीत आहे. एक महिन्याच्या आत स्वतःचे लग्न उरकून घेण्याचे निश्चित केले आहे. मामाना ही गोष्ट कळवावी आणि थोडी रोकड, दागिने व इतर आवश्यक जिनसा घेऊन निघून यावे. "

त्याच महिन्यात सरयूशी चन्द्रनाथचे लग्न लागले.

लग्नानंतर जेव्हा सासरी जाण्याचा दिवस उजाडला, तेव्हा सरयू रडत म्हणाली, " आईचं कसं होईल ? "

" का, आमच्याबरोबर येऊं दे की. "

ही गोष्ट ब्राह्मणीच्या कानी गेली. तिने सरयूला एकांती बोलावून म्हटले, " सरयू, तिकडे गेल्यावर मधून मधून माझी आठवण काढ. पण कधीहि माझं नाव घेऊं नकोस. जिवंत असे तो काशी सोडून मी कुठंहि जाणार नाही. तुझं कधीं इकडे येणं घडलं तर भेट होईल. "

सरयू रडूं लागली.

पद्रानें मुलीचे तोड पुसून आणि तिला न रडण्याविषयीं सागून आई गंभीरपणे म्हणाली, " बाळ, सगळं काहीं कळत असून अस रडतात का कधीं ? "

मुलीने आईच्या कुशींत तोड लपवून रडत रडत म्हटले— " आई— "

आई म्हणाली, " आईसाठीं आईला विसरून जाणं हीच मातृभक्ति. "

चन्द्रनाथने आग्रह केला तरी ब्राह्मणीचे एकच उत्तर कीं, आपण काशी सोडून कोठेहि जाऊं शकत नाहीं.

चन्द्रनाथ शातपणे म्हणाला, " आपली कुठंच जाण्याची इच्छा नाही तर काशींतच रहा. पण निदान स्वतंत्र होऊन रहा. "

परतु ब्राह्मणीने ही गोष्टहि नाकारून म्हटले, " हरिदयाळ मला मुलीप्रमाणे मानतात. मी अत्यंत विपन्नावस्थेत असताना त्यानीं मला आश्रय दिला आहे. मी त्याची पितृवत् भक्ति करते. कोणत्याहि प्रकारं त्याना सोडूं शकत नाहीं. "

चन्द्रनाथला कळून आले की, या दुःखिनीलाहि स्वाभिमानाची काही जाणीव आहे. स्वेच्छेने ती कोणाची दया स्वीकारणार नाहीं. म्हणून तो एकटया सरयूला घेऊन घरी आला.

घरी आल्यावर सरयूने पाहिले की मोठा वाडा आहे. किती तरी शोभिवंत वस्तू आणि हरतऱ्हेचे सामान आहे. तिच्या आश्चर्याला सीमा राहिली नाहीं. मनातल्या मनात ती म्हणाली— माझ्यावर याचे किती पण उपकार, केवढी दया !

चन्द्रनाथनें या बालवधूला आदरपूर्वक विचारले, " घरदार सर्व पाहिलंस ? आवडलं ना ? "

सरयूने अगदी कुंठित होऊन पदराआड तोंड लपवले आणि मान खाली घातली. चन्द्रनाथला आपल्या पत्नीचा मनोभाव जाणण्याची इच्छा नव्हती, तर तिचा कंठस्वर ऐकायचा होता. त्याने दोन्ही हातानी सरयूचे तोंड वर करून विचारले, " बोल ! पसंत पडलं ? "

लाजेने सरयूचा चेहरा लालबुन्द झाला. नवऱ्याने वारंवार विचारल्यावर ती कसेंबसे म्हणाली, " सगळं तुमचंच ? "

चन्द्रनाथने हंसून तिचीच पुनरावृत्ति केली " हं, सगळं तुमचंच ! "

## ३

यानंतर कांही दिवस असेच निघून गेले. सरयू वयात आली. नवऱ्याची सेवा-चाकरी करण्यास शिकली. चन्द्रनाथला वाटे आपण काही सांगण्यापूर्वीच सरयू आपले मनोगत ओळखते. तिला केवळ दासीच म्हटले तर सबंध जग धुंडाळूनहि चन्द्र-नाथला अशी दासी मिळाली नसती. पण दासी मिळावी म्हणून कोणी लग्न करत नसतो. पत्नीकडून इतरहि गोष्टींची अपेक्षा बाळगली जाते. वास्तव दासीचे आणि पत्नीचे आचरण सर्वतोपरी समान नसणेच श्रेयस्कर असें वाटते. सरयूची वाग-णूक फारच निरिच्छ व गोड होती. परंतु दापत्याचे घनदाट नि परिपूर्ण सुख ती वृद्धिंगत करूं शकली नाहीं. म्हणून त्या

दोघाच्या वागणूकींत इतका प्रेमादर असूनहि त्यांच्यामधील एक प्रकारचे दूरत्व, एक प्रकारचें अंतर कोणत्याहि प्रकारे कमी होईना. एके दिवशीं अचानक चन्द्रनाथने सरयूला विचारले, " तूं इतकी भिऊन भिऊन कां रहातेस ? मी तुझ्याशीं काहीं वाईट रीतीनं का वागतो ? "

सरयू मनातच म्हणाली—याचे उत्तर तुम्हाला माहीत नाही ? आणि मग ती स्वतःशीच विचार करूं लागली—तुम्ही देव अहात, थोर अहात, नि मी ? तिरस्करणीय. तुम्ही प्रतिपालक, मी आश्रित. तुम्ही दाते मी भिकारीण.

सरयूचे अंतःकरण कृतज्ञतेने भरलेले होते. म्हणूनच तिचे प्रेम डोके वर काढूं शकेना. अंतर्वाहिनी फल्गु नदीप्रमाणे ते निःशब्द मंदगतीनें हृदयाच्या अंतर्भागातून वहात होते; उच्छृंखल होईना. निरंतर, अविश्रांतपणे वहात चाललेले असे होते ते. पण चन्द्रनाथला त्याची जाणीव नव्हती. एकादा दुर्दैवी प्राणी आपल्या आयुष्यात परमेश्वराला शोधूनहि प्राप्त करूं शकत नाही त्याप्रमाणें चन्द्रनाथ सरयूच्या हृदयातील हे प्रेम पाहूं शकला नाहीं परंतु आज अकस्मातच दिव्याच्या लख्ख प्रकाशांत सरयूचे कमळासारखे मोठे डोळे अश्रूंनीं डबडबलेले त्याला दिसले. तेव्हा त्याने विव्हळ होऊन तिला आपल्याजवळ घेतले. त्याच्या छातीवर सरयूचे मस्तक टेकले तेव्हा तो म्हणाला, " अं हं, नको, या गोष्टीची काहीं आवश्यकता नाहीं. " आणि त्यानें

आपल्या दोन्ही हातानीं सरयूचे मुख उचलून धरले. सरयूच्या मिटल्या डोळ्यावर एक उष्ण अश्रुबिंदू ठिबकला.

चन्द्रनाथ म्हणाला, " एकदा माझ्याकडे पहा तरी. "

सरयूने आपल्या दोन्ही पापण्या आकुळपणे घट्ट मिटल्या. तिच्याने पाहवले नाही.

जराशाने दीर्घ उसासा सोडून चन्द्रनाथ म्हणाला, " सरयू, तुला फार भीति वाटते म्हणून तूं माझ्याकडे पाहू शकत नाहींस. परंतु तूं पाहूं शकली असतीस तर किती बरं होतं. असो, एक काम कर. मी झोपी गेलेला असेन तेव्हा मला नीट निरखून घे. त्यात तुला भीति वाटण्याजोग काहीं नाही. तू तर माझ्या छातीवर आपलं मस्तक टेकलं आहेस, मग तुला माझ्या अंत - करणातील विचार ऐकूं येत नाहीत का ? सरयू, अजूनपर्यंत तूं मला ओळखूं शकली नाहीस. याचंच मला दु:ख होत."

तथापि सरयू बोलूं शकली नाही. मनातल्या मनात पतीच्या चरणाना नमस्कार करून ती म्हणाली—मी या चरणाची आश्रित दासी आहे. दासीला दासीसारखं राहूं द्या.

## ४

चन्द्रनाथची मामी हरकाली हिला आता तिळमात्र सुख राहिले नाही. दैवाने तिची अशी विटंबना करून टाकली. काही लोकाना हे जग काट्यानी भरलेल्या अरण्याप्रमाणे वाटते,

आणि त्यातून स्वतःसाठीं मार्ग शोधून काढावा लागतो. कुणाला मार्ग सापडतो, कुणाला नाहीं सापडत. हरकाली देखील या संसाररूपी अरण्यातून आपणासाठी एक जवळची वाट शोधत होती. चन्द्रनाथच्या वडलाच्या मृत्युमुळे ती तिला एक सापडली. परंतु या आकस्मिक विवाहाने, सरयूसारखी स्त्री आणि चन्द्रनाथचें निरतिशय पत्नि-प्रेम यामुळे तिच्या मार्गांत धोंड पडून तो बंद झाला. हरकालीची पाच वर्षाची एक भाची आपल्या बापाघरी वाढून आता दहा वर्षांची झाली होती. पण— जाऊं द्या ती गोष्ट. या सगळ्या कारणामुळेच हरकालीच्या मनाची सुख—शांति लोपली असे म्हणतो.

अलबत् अजूनहि हरकालीच घरची मालकीण, आणि तिचा नवरा मालक होता. सर्व गोष्टी पूर्ववत् चालत. अद्याप सरयू तिच्याच तोंडाकडे पहात राही, कोणत्याहि प्रकारचा असंतोष वा अभिमान दाखवत नसे. पाहिले तर वाटे की, या परिवारात ती एक सामान्य माणूस आहे. जरी या परिवारात तिची काही सत्ता होती, तरी तिचा आधार म्हणजे दुसऱ्याचा अनुग्रहच. हरकालीचा नवरा तिला पहाताच खूष होऊन बोलायला जाई— " आमची सून की नाही—" बस, लगेच हरकाली तांबडे लाल डोळे वटारून आणि धमकावून म्हणे, " पुरे पुरे, उगी रहा. आपल्याला कळत नाही त्या गोष्टीत तोंड खुपसू नये तुमच्या हाती देण्यापेक्षा आईबापानी माझे हातपाय बांधून मला पाण्यात बुडवलं असत तरी बर होतं. "

बस, व्रजकिशोर तोंड काळेनिळे करून तेथून चालते होत.

हरकालीचे वय तिसीच्या आसपास असेल, पण सरयू अजून पंधरा वर्षांची सुद्धा झाली नव्हती. ती आल्या दिवसापासून दोघींच्याहि मनात वाद उत्पन्न झाला. प्राणातिक प्रयत्न करूनहि हरकाली विजयी होऊं शकेना. एका लहानशा पोरीची एवढी ताकद पाहून ती विस्मितच झाली. बाहेरच्या लोकाना माहीत नव्हते की, या अंतस्थ दाव्यात सरयूलाच डिक्री मिळाली आहे; परतु तिची अंमलबजावणी करत नाही. तिने आपली डिक्री आपणच बेमुदत करून जिंकलेली इस्टेट हरकालीला परत केली. त्यामुळे तर हरकालीची पूरीच फजीती झाली.

हरकालीला माहीत होते कीं, सरयू मुकी किंवा वेडी पण नाही. हरकालीच्या पुष्कळशा कटु भाषणावर सरयू काहीं न बोलता मान खाली घालून तिला निरुत्तर करी व त्यामुळे हरकाली स्तंभित होऊन जाई. परतु या मुलीशी ती सलोखा करूं शकली नाहीं किंवा तिला आपलीशीहि करूं शकली नाही. सरयू कलहप्रिय किंवा वाचाळ, स्वार्थी अथवा निर्दय, ईर्षापरायण वा अभिमानी असती, तर हरकालीने स्वतःसाठी काही मार्ग शोधून काढला असता. पण सरयूने तिच्यावर इतकी दया केली होती की दुसऱ्याकडे दयेची भीक मागण्यास तिला अवसरच मिळेना. सरयू मनात ओळखून होती की, या घरची खरीखुरी मालकीण आपण आहो, हरकाली कोणी नव्हे. म्हणून

ती बाह्यत: आपण ‘ कोणी नव्हे ’ अशा मिषाने वागे. हरकालीला तिनें ‘ सर्वाधिकारिणी ’ बनवले होते. यामुळेच तर हरकाली आतल्या आत ईर्षेने होरपळून तडफडत होती.

सरयूने एकच स्थान पूर्णपणे स्वत:साठी राखून ठेवले होतें आणि त्याठिकाणी हरकाली कोणत्याहि प्रकारें प्रवेश करूं शकली नाहीं. आपल्या नवऱ्यासभोवती तिने अशी एक सूक्ष्म रेषा ओढून ठेवली होती कीं, ती ओलांडल्यावाचून चन्द्रनाथच्या अंगावरील वस्त्राला देखील स्पर्श करता येणे शक्य नव्हते. त्या रेषेबाहेर ती वाटेल ते करो, पण आत शिरण्याचा तिला अधिकार नव्हता. या पोरीने कोणत्या माया-मंत्राच्या बळावर आपल्या नवऱ्यातातले विष हरण केले तें धूर्त हरकालीला कळून चुकले.

अशाच रीतीने सहा वर्षांचा दीर्घावधि लोटला. अकरा वर्षांची असता पतिगृही आलेली सरयू आता सतरा वर्षांची झाली.

५

वयोवस्थेची जाणीव जशी पुरुषाना असते तशी स्त्रियाना नाही. उदा० — दहा, वीस, तीस, चाळीस, पन्नास, साठ इत्यादि. तीस वर्षांचा पुरुष वीस वर्षांच्या तरुणाकडे वडिल-कीच्या नात्याने पाहील. पण स्त्रियांच्या बाबतीत तसे नाहीं. त्या होईपर्यंत आपली ताई, वहिनी, आई किंवा आजी यांच्या-जवळ राहून त्या अल्पस्वल्प उमेदवारी करतात, स्त्री-जीवनात

ज्या गोष्टी शिकून घेणे आवश्यक असते त्या सर्व थोड्याफार शिकून घेतात. आणि मग एका दमात प्रथम श्रेणीत जाऊन बसतात. त्या अवस्थेत सोळापासून छपन्न वर्षापर्यंतच्या सर्व स्त्रिया सारख्याच. अर्थात् स्थानादि भेदामुळे या नियमात कुठे कुठे कमीजास्त फरक पडतो. पण बहुतेक ठिकाणी या नियमाचे उल्लंघन होत नाही. निदान चन्द्रनाथच्या गावात रहाणारी त्याच्या नात्यातील आजी हरिबाला हिचे आचरण असेच दिसून येई. एक दिवस दोन प्रहरीं आपल्या घराची मावळतीकडील खिडकी उघडून, उगी उभी राहून सरयू आकाशाकडे पहात होती. हरिबाला एका ताटात मिठाई आणि हातात जुईच्या फुलाची वेणी घेऊन अवचित तिच्यासमोर येऊन उभी राहिली. सरयूला वेणी माळून ती म्हणाली, “ आजपासून तूं माझी मैत्रीण झालीस बरं का ? म्हण पाहूं ‘ मैत्रीण ’

सरयू पेचात पडली. तथापि तिने स्मितपूर्वक म्हटले—बरं.

“ ताई, नुसतं ‘बरं’ म्हणून काम भागणार नाही. ‘मैतरणी’ म्हणून मला हाक मारली पाहिजेस. ”

याला आदर किंवा लाड काही म्हणा. पण सरयूच्या आयुष्यात असली गोष्ट कधी घडली नसल्यामुळे या आगंतुक आपुलकीला ती मनात थारा देऊं शकली नाही. वयाने आपल्या आजीएवढ्या असलेल्या बाईच्या गळ्यात गळा घालून ‘ मैतरणी ’ म्हणण्यास तिला लाज वाटू लागली. परंतु हरिबाला सोडीना.

यात काही नाविन्य किंवा अस्वाभाविक असू शकेल ही गोष्ट हरिबालेच्या कल्पनेपलीकडची होती. यामुळें जेव्हा तिने पाहिले कीं, सरयूच्या तोंडून हे प्रिय संबोधन बाहेर पडण्यास विलंब लागत आहे, तेव्हा ती गंभीर व म्लान होऊन म्हणाली, " बरं तर, दे माझी वेणी. मी दुसरीकडे जाते आपली. "

शरयू पेचात सापडली होती खरी, पण कुंठित मती झाली नव्हती. किंचित् हंसून मंजुळ स्वरात ती म्हणाली " काय, मैत्रीण शोधण्यास जाता ? "

हरिबाला काहीशी शांत होऊन म्हणते, " वा ! तूं तर चांगलीच बोलतेस. लोक म्हणतात कीं आमची सूनबाई मुकी आहे. "

सरयू हंसली.

हरिबाला म्हणाली, " बरं, ऐक. या गावात तुझी कुणीहि मैत्रीण नाहीं. मला माहीत आहे, थोरामोठ्याचं घर म्हणून, आणि तुझ्या मामीच्या तोंडाळपणामुळं कुणी तुजपाशीं येत नाहीं. आता मी येत जाईन. मात्र तुझपाशीं माझा स्नेह-संबंध असला पाहिजे. एवढ्याचसाठीं मी तुला आपली मैत्रीण केली. वृद्ध झाले आहे खरी, पण नुसती हरिनामाची जपमाळ घेऊन मला सबंध दिवस ढकलता येत नाहीं. मी रोज येत जाईन. "

सरयू म्हणाली, " हं, रोज या. "

हरिबाला गरजली, " 'या' काय? असं म्हण कीं, 'तूं रोज येत जा गडे.' बोल, 'तूं' म्हणता यायचं नाहीं तुला?"

सरयू हंसली नि म्हणाली, "क्षमा करा आजीबाई, मानेवर सुरी धरलीत तरी माझ्याच्यानं हे व्हायचं नाही."

" हरिबाला पण हंसून म्हणाली, "बरं, 'तूं' म्हणूं शकत नाहींस तर नको म्हणूं. मात्र 'तुम्ही' तरी म्हणावंच लागेल. बरं, आता बोल—' गडे, तुम्ही रोज येत जा."

सरयूने मान खाली वाकवून लाजत–हसत म्हटले, "गडे, तुम्ही रोज येत जा'"

जणूं एका मोठ्या काळजींतून हरिबाला सुटली. ती म्हणाली, "येईन हं."

दुसऱ्या दिवसापासून हरिबाला सरयूकडे बहुशः येऊं लागली. शेकडो कामे सोडून दिवसातून एकदा तरी ती आपली हजेरी लावून जायची. हा जोडलेला स्नेहसबंध दृढ होऊं लागला. आणि कालांतराने हरिबाला आपली समवयस्क नाही, किंवा तिच्या गळ्यात गळा घालून वागणे सर्वतोपरी अप्रशस्त हे सरयू विसरली.

या दोघींच्या दाट मैत्रीबद्दल हरकालीला काय वाटत होते ते सागता येत नाही. पण चन्द्रनाथला मात्र हें फार आवडलें. याविषयीं आपल्या पत्नीशी बहुधा त्याचे बोलणें निघे. आजीच्या या आकस्मिक नि त्याच्या दृष्टीने अत्यंत अस्वाभाविक मैत्रीमुळें

त्याला भारी आनंद होई. त्याचे एक कारण होते. चन्द्रनाथ आपल्या पत्नीवर खूप प्रेम करी. हृदयसर्वस्वाने तो प्रेम करत नसला तरी त्याचे अंतःकरण स्नेहशून्य नव्हते. तो स्वतःशीच म्हणे,—सगळ्याच्याच नशिबात सारख्या बायका नसतात. कुणाला दासी मिळते, कुणाला सखि, तर कुणाला स्वामिनी. माझ्या नशिबाने मला एक पुण्यवान्, पवित्र, साध्वी आणि स्नेहमयी दासी मिळाली आहे. आता त्याबद्दल खेद करण्यात लाभ कोणता? याशिवाय आणखीहि एक गोष्ट प्रायः नेहमी त्याच्या मनात यायची. ती म्हणजे सरयूच्या गत आयुष्याची करुण कहाणी. तिचे बाळपण फारच हालात गेले होते. या दु:खी मुलीचे सगळेच आयुष्य दुःखात जाणेहि संभवनीय होते. कुणा अभागी चारित्र्यहीनाच्या पदरी पडून ती रडत राहिली असती, किंवा दासीवृत्तीने राहून शत अत्याचार नि कष्ट सोसती. आणि तशा स्थितींत इतके विपुल रूप-यौवन असताना अधः-पतन होणें असंभवनीय नव्हते. तसे झाले असतें तर?

ही गोष्ट चन्द्रनाथच्या मनात उद्भवे तेव्हा तत्क्षणीच तो अथाग करुणेने सरयूचे लज्जित तोंड वर उचलून धरून विचारी, " सरयू, हे साग पाहूं तुला मी बघितलं नसतं, तर इतके दिवस तूं कुणाजवळ राहिली असतीस? "

या प्रश्नाला सरयू, काहींच उत्तर देत नसे. ती भयभीत होऊन नवऱ्याच्या छातीला बिलगे. चन्द्रनाथ प्रेमपूर्वक तिच्या

मस्तकावर आपला हात ठेवी. जणूं तिला धीर देऊन मनातल्या मनात तो म्हणे—तुला भय कसलं !

सरयू आणखी सरकून त्याला अधिकच बिलगायची. खरोखर, अशा गोष्टींनी ती फार घाबरी होई. चन्द्रनाथ देखील ही गोष्ट जाणूनच तिला आपल्या छातीशी ओढून घेई आणि म्हणे, "नाही हं सरयू, असं काही समजूं नकोस. तूं एका दुःखिनी-च्या घरीं जन्म कां घेतलास नकळे. पण तूं माझी जन्मोजन्मीची पतिव्रता पत्नी आहेस. जगात कुठंहि असतीस तरी मला तुझ्या जवळ आकर्षित होऊन यावंच लागतं. तुझ्याच आकर्षणामुळं मी काशीला गेलो होतो सरयू."

या वेळीं चन्द्रनाथच्या हृदयातून जो भाव-प्रवाह वहात असे त्याची तुलना सरयूचे सर्व प्रेम, स्नेह, सेवा आणि भक्ति एकवटल्यानेहि करता आली नसती. पण इतके असून सुद्धा एकाद्या दुःखिनीवर उपकार नि दया केल्याबद्दल जी तृप्ति लाभते, जो गर्व वाटतो, त्याच गर्वाने आत्मप्रसन्नतेचा कपटवेश धारण करून बालिका सरयूशीं चन्द्रनाथ माळ घालत असता त्याच्या शात हृदयात प्रवेश केला. आणि अत्यंत प्रयत्न करूनहि त्याला आता त्याचा उच्छेद करता येईना. त्याच्या हृदयातील एका अज्ञात नि अंधकारमय कोपऱ्यात तो पडून राहिला. आता तो गर्व डोकें वर काढूं बघे तेव्हा, चन्द्रनाथ सरयूला जवळ ओढून आपल्या छातीशीं कवटाळी आणि पुनः पुन्हा विचारी,

" सरयू, मला एका गोष्टीचं फार नवल वाटतं कीं, ज्याला इतके दिवस तूं बघतेस त्याला ओळखण्यास तुला अजूनहि विलंब कां लागावा ? मी तुला काशींत पहाताक्षणींच ओळखलं कीं तूं माझी आहेस. कितीतरी युगांपासून, किती कल्पापासून, जन्मजन्मांतरींची तूं माझी आहेस. कोण जाणें का आम्ही वेगळं पडलो होतो. आता पुन्हा एकरूप होण्यासाठी मिळालो आहोत."

सरयू त्याच्या वक्षस्थळी तोंड लपवून म्हणे, " कशावरून मी तुम्हाला ओळखूं शकले नाही ? "

उत्साहाच्या भरात चन्द्रनाथ सरयूचे लज्जित तोंड वर उचलून आपल्या दृष्टीसमोर धरून विचारी, " ओळखूं शकलीस ? मग इतकी भिऊन भिऊन का वागतेस ? मी तुझ्याशी काहीं वाईट रीतीने तर वागत नाही. मी तुझ्यावर स्वतःहूनहि अधिक प्रेम करत नाहीं का ? "

पुनश्च सरयू पतीच्या वक्षस्थळीं तोंड लपवी. आणि चन्द्रनाथ तिला विचारी, " सांग, भितेस का ? "

सरयूच्या तोंडून उत्तर निघत नसे. पतीला स्पर्श करून तोंडावाटे असत्य गोष्ट ती काढणार कशी ? आपल्याला भीति वाटत नाही असे ती कशी म्हणणार ? खरोखरच तिला फार भीति वाटे, आणि ती भीति किती सत्य, किती भेसूर होती ते तिच्याखेरीज दुसऱ्या कोणाला माहीत नव्हतें.

हं, तर काय सांगत होतो ? हरिबालेच्या येण्याने चन्द्रनाथला फार आनंद होई. सरयूला एक मैत्रिण मिळाली, आपल्या मनातील दोन गोष्टी जिला सांगता येतील अशी व्यक्ति लाभली हेच चन्द्रनाथच्या आनंदाचे कारण !

एके दिवशी दुपारभर सरयू हरिबालाची वाट पहात बसली. आकाश अभ्राच्छादित असून झिमझिम पाऊस पडत होता. हरिबाला आली नाही. सरयूला वाटले कीं पाऊस पडत आहे म्हणून ती आली नाही संध्याकाळ होत चालली. आजचा सारा दिवस तिने एकटे एकटेपणानेच ढकलला. हरकाली पण आज घरी नव्हती. मग जरा धीर करून सरयू नवऱ्याच्या अभ्यासाच्या खोलीत गेली. विशेष कारणावाचून या खोलींत कोणी पाऊल टाकत नसे. सरयू देखील यायची नाहीं. चन्द्रनाथनें पुस्तकावरील दृष्टि वर करून म्हटले, " आज तुझी सखी आली नाहीं वाटतं ? "

" नाहीं. "

" तरीच तुला माझी आठवण झाली असावी. "

सरयू किंचित् हंसली. अर्थ हा कीं आठवण तर नेहमीं असते. पण येण्याला धीर होत नाहीं. ती म्हणाली, " पाऊस फार पडतो आहे म्हणून आली नसावी. "

" छे, असं नाही. आज काही मंडळी काकाची धाकटी

मुलगी निर्मला हिच्या केळवणीसाठीं येणार. लवकरच तिचें लग्न आहे. त्याच तयारीत आजी गुंतली असेल."

सरयू म्हणाली, "हो तसच असेल."

काही वेळ उगी राहून चन्द्रनाथ म्हणाला "वाईट वाटतं, आम्ही परकी झालो. मामी कुठे आहे?"

"तिकडेच गेली असे दिसते."

चन्द्रनाथ उगी राहून विचार करूं लागला.

सरयू हळू हळू त्याच्याजवळ जाऊन एका बाजूला बसली आणि म्हणाली, "कसला विचार करता?"

चन्द्रनाथने हंसण्याचा प्रयत्न करत सरयूचा हात आपल्या हाती घेतला आणि तो सावकाश सांगूं लागला—"सरयू, विशेष असे काहीं नाही. विचार करत होतो कीं, निर्मलेचे लग्न आहे हे काकानी मला कळवलं देखील नाही, आणि मामीला बोलावून नेलं. आम्ही दोघेजणं निव्वळ परकी!

चन्द्रनाथच्या बोलण्यात कातरता होती. सरयू त्याला उद्देशून म्हणाली, "मला आश्रय देऊन तुम्ही अधिकच परकी झाला अहात. नाही तर इतक्यात सलोखा होऊन जाता."

चन्द्रनाथ हंसून म्हणाला, "छे, सलोखा होण्याची जरूर नाही. तुझ्याऐवजी काकाशीं सलोखा करण्याने मला काहीं विशेष सुख लाभले असते असे नाही. आम्ही आहोत ते उत्तम. लग्नापूर्वीं मी काकाचा सल्ला घेतला असता तर, मला नाही वाटत

मी कोणत्याहि प्रकारे तुला प्राप्त करूं शकतो. विघ्न मात्र अवश्य उपस्थित झाले असते. 'ही आमच्या कुळा-गोत्राला साजेशी आहे की नाही' हा प्रश्न निघून लग्न फिसकटलं असत.

सरयूचे अभ्यंतर कंपित झाले. त्या वेळी संध्याकाळ होऊन गेल्यामुळे घरात काळोख पसरला होता. त्यामुळे चन्द्रनाथ तिचा चेहरा पाहूं शकला नाही. परंतु त्याने आपल्या हातात घेतलेला तिचा हात कांपत असल्याकारणाने तिचे सारे मनोभाव चन्द्रनाथला समजून चुकले. चन्द्रनाथ हसून म्हणाला, "मी काकाचा सल्ला घेतला नाहीं ते बरं केल की वाईट हे आता तरी तुला समजलं ? "

थोडा वेळ उगी राहून सरयू म्हणाली, "कोण जाणे, पण तुम्हाला माझ्यासारख्या शेकडो-हजारो दासींचीहि उणीव पडली नसती."

चन्द्रनाथने सरयूचा कोमल हात दाबून म्हटले, "तें मला माहीत नाही. माझी एकच दासी आहे आणि तिच्या अभावाचा मी विचार करतो. शेकडो हजारोविषयी तुला इच्छा असेल तर तूं विचार कर."

दुसरे दिवशीं हरिबाला आली, पण तिची मुद्रा काही विलक्षणच दिसली. तिने नेहमींप्रमाणे बळेच गळयात गळा घालून आणि 'मैतरणी मैतरणी' म्हणून सरयूला त्रास दिला नाही, कीं खेळण्यासाठीं पत्ते आणण्याचा अथवा पुनः पुन्हा आर्जव

करून तिला राजी करण्याचाहि तिने यत्न केला नाही. ती म्लान मुखाने उगी बसून राहिली.

सरयू म्हणाली, " काल तुम्ही नाही आला गडे ? "

" हां गडे, काल की नाही मला फार काम होतं. त्या घरी निर्मलेच लग्न होणार आहे. "

" हो, ऐकलं खरं. सगळं नक्की ठरलं का ? "

हरिबालाने सरयूच्या प्रश्नाचे उत्तर न देता तिच्या चेहऱ्याकडे पहात म्हटले, " गडे, एक काहीं विचारूं ? अगदी खरं सांगशील ना ? "

" काय ? "

" खरं तेच सांगशील तर विचारते, नाही तर विचारण्यात काय फायदा ? "

सरयू जरा काळजीत पडली. म्हणाली, "कां, खरं कां नाहीं सांगणार ? "

" हे पहा गडे तुझा माझ्यावर विश्वास आहेना ? "

" हो, कां नसणार ? "

" बरं, तर हे सांग चन्द्रनाथ तुझ्यावर किती प्रेम करतो ? "

सरयू काहीशी लाजून म्हणाली, " माझ्यावर फार दया करतात. "

" छे, दयेच नाही विचारत. तुझ्यावर खूप, अगदी खूप खूप प्रेम करतो कीं नाहीं ? "

सरयू हंसली. म्हणाली, " हे मला काय माहीत की खूप प्रेम करतात किंवा नाही ? "

" खरंच का माहीत नाही तुला ? "

" अं हं. "

खरोखरच सरयूला हे माहीत नव्हते. हरिबाला जणूं काळजीतच पडली. मान वेळून ती म्हणाली, "नवरा आपल्यावर किती प्रेम करतो हे बायकोला माहीत नाहीं. बस्स, याचंच तर मला फार भय वाटतं. "

यावेळी हरिबालाच्या चर्येवर आतरिक शंका लपलेली होती. ती उमजून सरयू पण शंकित झाली. तिने विचारलें, " भय कशाचं ? "

" ते मग पुन्हा केव्हातरी सांगेन. "

काही वेळाने सरयूच्या हनुवटीला हात लावून हरिबाला कोमल कंठाने विचारते " काय ग, इतकं रूप, इतके गुण, इतकी बुद्धि असूनहि आजपर्यंत तूं हलकी-सलकीं कामं करत होतीस ? "

सरयू हंसली.

## ६

अजून एक गोष्ट उघडकीस आली नव्हती. हरिदयाळ-विषयी येणाऱ्या संशयात ती दडली गेली. दिसण्यात उच्चवर्णीय पण फाटकेतुटके कपडे घातलेला असा इसम दोन-तीन दिव-

सापासून येई व ब्राह्मण बाई सुलोचनादेवी हिच्याशी कानगोष्टी करून चालता होई. हरिदयाळच्या हे लक्ष्यात आलेले नाहीं, असा सुलोचनेचा समज होता. परंतु त्याना ते माहीत झाले होते.

आज दुपारी हरिदयाळ आणि कैलासकाका घरात बुद्धिबळानी खेळत होते. इतक्यात, अंगणामध्ये काही गडबड झालेली ऐकूं आली. कुणी एक व्यक्ति कोमल कंपित स्वराने दयेची याचना करत असून, दुसरा कुणी कर्कश स्वराने कटु शब्दानी तिला धिक्कारून धमकावत आहे. एक स्त्री आहे, दुसरा पुरुष हरिदयाळनी म्हटले, “ घरात काय गडबड चालली आहे ही ? ”

कैलासकाका म्हणाले, “ पहा संभाळ, शह लागला. ”

जरावेळ काहीं ऐकूं आलें नाहीं. परंतु थोड्याच वेळाने पुन्हा गडबड ऐकूं येऊं लागली. तेव्हा हरिदयाळ उठले आणि म्हणाले, “ काका, जरा थाबा, मी पाहून येतो. ”

कैलासकाकानीं त्याच्या धोतराचा सोगा ओढून म्हटलें, “ पहा, तुमच्यावर मात होत आहे बरं. ”

हरिदयाळ पुन्हा बसले. पण गडबड काहीं थाबेना. नाइलाजाने हरिदयाळ परत उठले. अंगणात येऊन पहातात तो, सुलोचना दोन्हीं हातानी त्या इसमाचे पाय धरून बसली आहे आणि तो पुन्हा पुन्हा जोरजोराने म्हणतो आहे—“ माझं ऐक. नपेक्षा सागितल तेच करीन. ”

सुलोचना विव्हळून म्हणते—“ मला क्षमा करा. एकदां माझा सत्यानाश केलातच. आता बाकी राहिलं आहे ते तरी नष्ट करूं नका. ”

तो म्हणतो, “ तुझी मुलगी मोठ्या घरी पडली; मग दोन हजार रुपये देणे शक्य नाही काय ? रुपये मिळताक्षणीच मी चालता होतो. ”

सुलोचना उत्तरली, “ तुम्ही दारूबाज नि दुराचारी अहात. दोन हजार रुपये तुमच्या हातात किती दिवस टिकणार ? पुन्हा याल नि रुपये मागाल. ते काही नाही. मी नाहीं रुपये द्यायची. ”

“ मी दारू पिणे सोडून देईन, कामधंदा करीन, आणि पुन्हा कधीही तुझ्याकडे रुपये मागायला येणार नाहीं. ”

सुलोचनेने याचे काहीं उत्तर दिले नाही. जमिनीवर कपाळ आपटून हात जोडून ती म्हणाली, “ माझ्यावर दया करा, रुपयासाठी सरयूची विनवणी करणं माझ्याने होणार नाही.

त्या दोघांपैकी कोणीहि हरिदयाळ जवळ येऊन उभे असल्याचे पाहिले नाही. म्हणूनच जोरजोराने या गोष्टी चालल्या होत्या. इतक्यात हरिदयाळ त्याच्याजवळ येऊन उभे राहिले. तेव्हा दोघांचीहि गाळण उडाली. त्या अनोळखी इसमापाशी जाऊन हरिदयाळनीं त्याला विचारले, “ कुणाच्या हुकुमानं या वाड्यात शिरलास ? ”

प्रथम तो इसम जरा गोंधळून उभा राहिला. परंतु आपले कृत्य कायद्याच्या दृष्टीने ठीक झाले नाही असे त्याच्या ध्यानी येताच पाय काढता घेण्यास तो तयार झाला. पण हरिदयाळनीं त्याचा हात घट्ट पकडला आणि दरडावून विचारले, " बोल, कुणाच्या हुकुमानं आलास ? "

पळून जाण्यास काहीच उपाय नाहीं असे पाहून त्याने किंचित् धीर करून म्हटले, " सुलोचनेकडे आलो आहे. "

त्याच्या तोंडाला दारूची भयकर घाण येत होती आणि त्याच्या साऱ्या शरीरावर नीचतेची अवकळा पसरली होती. हरिदयाळनी तिरस्कारपूर्वक ओठ दाबून पुन्हा मघाप्रमाणेच कर्कशस्वरात प्रश्न केला, " पण कुणाच्या हुकुमाने ? "

" तो विचारतो, " हुकूम कसला ? "

आता मात्र त्या माणसाच्या चेहऱ्यावरचा रागरंग पालटला होता. जणू अचानकच त्याला आठवले की, प्रश्नकर्त्यावर आपण दरारा बसवूं शकतो. या घरावरहि आपला काही हक्क पोचतो. अशा तऱ्हेच्या उत्तरामुळे हरिदयाळ फारच चिडून गेले आणि ओरडून म्हणाले, " बदमाष, दारूबाज, या क्षणीं तुला तुरुंगात डाबूं शकतों माहीत आहे ? "

त्या स्वारीने तोंड वेगाडून म्हटले, " हा हा, माहित हो का नसणार ? "

हरिदयाळ त्याला मारण्यास तयारच झाले. म्हणाले,

" माहीत आहे काय ? मग चल, आताच तुला पोलीसच्या ताब्यांत देतो. "

त्या इसमानें किंचित् हंसून असा हावभाव व्यक्त केला कीं, जणूं काही पोलिसच्या ताब्यात जाण्यास त्याची विशेष हरकत नाहीं. तो म्हणाला, " आताच घेऊन चलता ? "

हरिदयाळनी त्याला एक गचाडी देऊन म्हटले, "हो आत्ता. "

धक्का झेलून आणि स्वतःला सावरून तो गंभीरपणे म्हणाला, " ठाकूर, एकदम इतकी बहादुरी दाखवूं नका. पोलिसच्या ताब्यांत द्या नाही तर चौकीवर पाठवा. पण जरा सबूर करा. माहित आहे, मी तुम्हाला काशी सोडण्यास भाग पाडू शकतो. हे तुम्हाला माहीत आहे ?"

हरिदयाळ पिसाळल्यासारखे ओरडून म्हणाले, " अरे जा, पाजी कुठला. माझ्या काशीवासाला चाळीस वर्षे झालीं. आणि आता तूं मला काशी सोडायला लावणार ? "

हरिदयाळला वाटले हा इसम आपल्याला गुंडाचे भय दाखवीत आहे. पुष्कळ लोक अशा धमक्याना भितात; पण हरिदयाळ बऱ्याच वर्षांपासून काशींत रहात होते. म्हणून त्याना तें भय नव्हते. ते रागारागानें म्हणाले, " बेट्या माझ्याशी गुंडगिरी !"

" ठाकूर, गुंडगिरी नव्हे. तुम्ही मला पोलिसचौकीवर घेऊन चला. तिथंच सगळ्या गोष्टीचा खुलासा करीन. "

" कोणत्या गोष्टीचा खुलासा ? "

" जें काही मी जाणतो,—ज्यामुळं तुम्हाला काशीहून पळता पुरेवाट होईल, आणि सर्व लोकाना कळेल कीं तुम्हीं जातिभ्रष्ट, अब्राह्मण अहा. "

" मी अब्राह्मण ? "

" ठाकूरजी, रागावू नका. केवळ तुम्हीच जातिभ्रष्ट झाला असं नव्हे, तर आजपर्यंत जे जे सद्गृहस्थ विश्वासाने तुमच्याकडे उतरले, गेल्या तीन वर्षात ज्याना तुम्ही आपल्या घरी जेवू घातलं त्या सगळयाचीहि जात बाटली आहे. मी त्या सवाना ही गोष्ट कळवणार. "

आता मात्र हरिदयाळ भ्याले. भीतीचे खरे कारण समजण्यापूर्वीच त्याचा कर्कश स्वर मंदावला. तरी ते विचारतात, " मी लोकाची जात बाटवली ? "

" अर्थात्—आणि हे शाबित करण्याची जबाबदारी माझ्याकडे लागली. "

हरिदयाळनी थंड होऊन शातपणे विचारले, " अरे बाबा, तुझं म्हणणं काय ते स्पष्ट सागना ? "

त्याने मृदु हास्य करून म्हटले, " एकटेच ऐकणार, की, आणखीहि दोन-चार जणाना ऐकवणार ? मी म्हणतो शेजारपाजारच्या चार-दोन मंडळीला बोलवावं. त्याच्यासमोर ऐकलेल बरं. "

हरिदयाळनी त्याच्या हाताला धरून म्हटले, " बाबा रागावूं

नकोस. मी एकाए.... तुझ्याशीं फारच अन्यायानं वागलो. त्याचं काहीं मनामध्ये बाळगूं नकोस. चल आत जाऊं या."

दोघेहि एका खोलींत जाऊन बसले. हरिदयाळनीं विचारले. "हं, मग काय म्हणतोस?"

"ही सुलोचना आहेना, जिच्या हातचं तुम्हीं खाता, ती तुम्हाला कुठं सापडली?"

"इथंच सापडली. कुणा गरीबाची दुःखी मुलगी समजून मी तिला आश्रय दिला."

"मी असं नाहीं म्हणत की, रुपये–पैसेवालीला तुम्ही आश्रय दिला आहे. हे विचारतो कीं, ती कोणत्या जातीची आहे याची कधी चौकशी केली का?"

हरिदयाळचा चेहरा एकदम फिक्का पडला. ते म्हणाले, "ब्राह्मण-बाई, विधवा, नि शुद्ध आचरणाची. मग तिच्या हातचं खाण्यात दोष कसला?"

"ब्राह्मण-बाई आणि विधवा हे खरं. पण जी घर सोडून परपुरुषाचा हात धरून जाते तिला कुठं शुद्ध आचरणाची म्हणता येईल? आणि तिच्या हातचं अन्न चाखू शकतं?"

हरिदयाळनी जीभ चावून म्हटले, "शिव! शिव! वा, तिच्या हातचं अन्न कसं ग्रहण करणार?"

"मग हेच सांगायचं होतं मला. पंधरा–सोळा वर्षे झाली, सुलोचना तीन वर्षांच्या मुलीला कडेवर घेऊन घराबाहेर

पडली. आणि तिलाच आश्रय देऊन तुम्हीं स्वतःला व त्याबरोबर आणखी अनेकाना धर्मभ्रष्ट केलं आहे."

"याला पुरावा ?"

"पुरावा का नसणार ? त्याची फिकीर करूं नका. ज्याच्याबरोबर ही घरातून निघाली तो 'असीम प्रेमास्पद' राखाल भट्टाचार्य अजून जिवंत आहे."

हरिदयाळ थोडा वेळ त्याच्या चेहऱ्याकडे बघत राहिले. त्याना वाटले यांचेंच नाव राखाल असले पाहिजे. त्यानी विचारले, "तूं ब्राह्मण आहेस वाटतं ?"

त्याने आपल्या मळक्या उपरण्याखालून त्याहूनहि अधिक मळकट नि तुटके जानवें काढून हंसत हंसत म्हटलें, "छे हो, मी गवळी."

हरिदयाळ जरा सरकून त्याच्या आणखी जवळ बसले आणि म्हणाले, "पाहिलं तर वाटतं कीं, तूं चाभार असावास. अस्तु. नमस्कार."

त्याला राग आला नाहीं. तो म्हणाला, "नमस्कार. तुमचा अंदाज काही खोटा नाहीं. मला चाभार म्हणूं शकता, मुसलमान किंवा ख्रिश्चनहि म्हणूं शकता. जातपात मानीत नाहीं—मी परमहंस !"

"तूं मोठा पाखंडी आहेस."

तो म्हणाला, "या गोष्टीची जाणीव करून देण्याची

आवश्यकता नाहीं. कारण, यापूर्वी अनेक सद्गृहस्थांनीं असें सांगण्याची मजवर कृपा केली आहे. मी कसा होतों आणि आता कसा झालों हें जाणतों. पण राखालदास तो मीच."

हरिदयाळचा चेहरा क्रोधातिशयानें लालबुंद झाला. मोठ्या सायासानें त्यानी आपला मनोभाव दाबून म्हटलें, "बरं हे सांग, आता तूं काय करणार ? सुलोचनेला घेऊन जाणार?"

"छे, त्यामुळं आपल्या खाण्यापिण्याचे हाल होतील. मी इतका अधम नाही."

अत्यंत कष्टाने हरिदयाळनी हा उपहासहि गिळून टाकला. नंतर ते म्हणाले, "बरं, मग तुला काय पाहिजे, कशासाठीं इथं आलास तें सांगना ?"

"रुपये पाहिजेत. पैशाच्या फार अडचणींत आहें म्हणून आलों. दोन एक हजार मिळाले कीं गपचुप चालता होईन."

"इतके रुपये तुला कोण देणार ?"

"ज्याला गरज असेल तो. आपण द्याल, किंवा सुलोचनेचा जावई देईल. तो फार श्रीमंत आहे."

त्याचे हें धाडस पाहून हरिदयाळ स्तमित झाले. पण ते मनात समजले कीं, हा इसम पक्का धूर्त नि चतुर आहे. ते म्हणाले, "बाबारे, मी गरीब माणूस. इतके रुपये मी तर कधीं बघितलेसुद्धा नाहींत. एवढं खरं कीं, सुलोचनेचा जावई

देण्यास समर्थ आहे; पण तो देणार मात्र नाहीं. तूं अजून त्याला ओळखत नाहींस. दोन हजार रुपये राहूच दे, धमकी देऊन तू त्याच्याकडून दोन पैसे देखील काढूं शकणार नाहींस. तूं हुशार आहेस यात शंका नाही, पण तो तुझ्याहून अधिक हुशार आहे. म्हणून तूं कुठं दुसरीकडे खडा टाकून पहा. तिथ तुझी डाळ शिजणार नाहीं."

प्रथम थोडा वेळ राखाल हरिदयाळच्या तोंडाकडे बघत राहिला. मग हंसून म्हणाला, "त्याची चिंता मला.—यत्ने कृते यदि न सिद्ध्यति—"

हरिदयाळनी चटकन् त्याला मध्येच आडवून म्हटले, "थांब बाबा, देवभाषेला आणखी विटाळूं नकोस."

राखालने वेळ ओळखून म्हटले, "जशी आपली आज्ञा. मात्र आता अधिक वेळ मी थांबूं शकत नाही. मला त्याचा पत्ता सांगा."

हरिदयाळ म्हणाले, "पत्ता सुलोचनेलाच विचारना बाबा.'

"ती नाही सांगायची. आपणच सांगा जरा."

"आणि मी नाहीं सांगितला तर?"

राखाल शांतपणे म्हणाला, "छे, आपण अवश्य सांगाल. आणि नाही सांगितला तर काय करणार ते अगोदरच् बोलून ठेवल आहे."

हरिदयाळच्या तोंडाला कोरड पडली. ते म्हणाले, "बाबारे, मी तर तुझं काही केलं नाही."

" छे, आपण काहीं केलं नाहीं. आणि एवढ्याचसाठीं आता हे एक काम करण्यास मी आपल्याला सांगत आहे. आपण नाव-गाव सांगितलं कीं एकदा जावयाला आशीर्वाद देऊन येईन. मुलीलाहि पाहीन, बरेच दिवसांत तिला पाहिलं नाहीं. "

हरिदयाळ खरोखरच घाबरले. पण शाब्दिक साहस दाखवून म्हणाले, " मी तुला मदत करणार नाहीं. तुझ्या मनाला येईल ते कर. अजाणतेपणीं माझ्याकडून पापकर्म घडलं, त्या प्रीत्यर्थ आता प्रायश्चित्त घेईन. मला कोणत्या गोष्टींचं भय आहे मग ? "

" जर कोणत्या गोष्टीच भय नाही, तर आजच ही गोष्ट सगळ्या पंड्याच्या कानावर घालतो. मग जमेल त्याप्रमाणं पत्ता काढून सुलोचनेच्या जावयाकडे जातो आणि तिथंहि ही गोष्ट जाहीर करतो. बरं, ठाकूर नमस्कार, येतो."

तो खरोखरच उठून चालूं लागला तेव्हा हरिदयाळनी त्याचा हात धरून त्याला पुन्हा खालीं बसवले. आणि ते मृदु स्वरानें म्हणाले, " बाबारे, आता मला कळून आलं कीं, तूं सहजासहजीं कुणाला सोडणारा नाहींस. बरं, रागावूं नकोस. माझं ऐक. तूर्त ही गोष्ट अशीच राहूं दे आणखी पसरवूं नकोस. पाच-सात दिवसानीं पुन्हा ये. मग जमेल तसं करीन. "

" पण लक्षात ठेवा त्या दिवशीं देखील मला असंच वाटेला लावून काम भागणार नाहीं. "

हरिदयाळनी भेदक दृष्टीने राखालकडे पहात म्हटलें, "काय रे बाबा, तूं खरंच का ब्राह्मण-पुत्र आहेस ?"

" होय. "

हरिदयाळनी उसासा सोडून म्हटले, " आश्चर्यच वाटतं ! बरं, सात-आठ दिवसानी ये. मध्यंतरीं हें कुणाला सांगूं नकोस. समजलं ना ?"

राखाल ' हं ' म्हणून तेथून निघाला. पण दोन-चार पावलें जाऊन मागे फिरला आणि म्हणाला, " बरं, मला दोन रुपये द्या पाहूं. अरे कर्मा ! माझं पैशाचं पाकीटच कुठं हरवलं ! "

असें बोलून तो दात विचकून हंसला.

रागाच्या भरात हरिदयाळ त्याच्याकडे पाहूंसुद्धा शकले नाहींत. त्यानीं मुकाट्यानें दोन रुपये काढून त्याच्या हातावर टाकले. आणि ते कनवटीला लावून तो चालता झाला.

राखाल गेला, पण हरिदयाळ खूप वेळ तेथेंच निचेष्ट बसून राहिले. हजारो विंचवांनी दंश केल्याप्रमाणें त्याच्या सर्वांगाची आग झाली !

## ७

पण सुलोचना कुठें ? आज तीन दिवस झाले. हरिदयाळनी खाणेपिणें, झोंपणें, पूजापाठ, यात्रेकरूंची चौकशी इत्यादि सर्व कांहीं सोडून सबंध काशी पालथी घातली. पण त्याना सुलोचनेचा पत्ता लागला नाही. शेवटीं निरुपायानें ते

घरीं परत आले, आणि कपाळावर हात मारून म्हणाले, "विश्वेश्वरा! काय हें दुर्दैव! एका अनाथेवर दया करण्यास गेलों नि अंतीं या पापाचा भागीदार मात्र झालों."

गल्लीच्या टोकाशीं कैलासकाकांचें घर होतें. हरिदयाळनीं तेथें जाऊन पाहिलें, कुणी नव्हतें. त्यांनी हाक मारली, "काका आहेत का घरीं?"

कुणीच उत्तर दिले नाहीं तेव्हा हरिदयाळ आत गेले. पहातात तर, एका दिव्याच्या प्रकाशांत बुद्धिबळे समोर मांडून कैलास एकटेच बसले आहेत. त्यानीं विचारलें, "काका, एकटेच बुद्धिबळें खेळता?"

कैलास त्याच्याकडे बघून म्हणाले, "ये बाबा, जरा हा डाव बचाव."

वैतागून मनातल्या मनात चरफडत हरिदयाळनी म्हटले, —इकडे तर आपली जात बचेल असें दिसत नाही आणि हे सांगतात कीं, बुद्धिबळांचा डाव बचाव.

कैलासना अर्धें बोलणें ऐकूं आलें नि अर्धें ऐकूं आले नाही. त्यांनीं विचारलें, "काय म्हणत होतास बाबा?"

"म्हणत होतों, त्या दिवशींची सगळी हकीकत ऐकलीत ना?"

"कोणती हकीकत?"

" ती त्या दिवशींची,—आमच्या घरीं गडबड चालली होती त्या दिवशीची. "

" छे बाबा, मी नीट ऐकलं नाहीं काय ते. मला वाटतं ते भांडण जरा हळू हळू चाललं होतं नाहीं? पण त्या दिवशीं तुझ्यावर कशी मात झाली? "

मनातल्या मनात खजील होऊन हरिदयाळ म्हणाले " हो मात तर छानच झाली. पण त्या दिवशींची हकीकत तुम्हीं मुळींच ऐकली नाहीं? "

कैलासनी जरा विचार करून म्हटले, " छे, मी बहुतेक काहीच ऐकलं नाहीं. गोष्टी हळू हळू चालल्या होत्या. मग ऐकूं शकणार कसा? पण त्या दिवशीं खेळाला कसा रंग चढला होता आठवतं? तूं आपला वजीर वाटेल ते झाल तरी बचावूं शकला नसतास. हं, यालाच तर खेळ म्हणतात, बरं, जरा याला बचाव, पाहूं कसा बचावतोस. "

हरिदयाळनी वैतागून म्हटले, " वजीर जावो चुलींत. मला हे सांगा, त्या दिवशींची हकीकत तुम्हीं मुळीच ऐकली नाही? "

कैलासनीं एकदा हरिदयाळच्या वैतागलेल्या चेहऱ्याकडे पाहून विस्मयानें म्हटले, "मला हो काय माहीत? मला तर काही आठवत नाहीं."

थोडा वेळ उगी राहून हरिदयाळ गंभीरपणे म्हणाले,

" बरं, इहलोकीं कांहीं कर्म करा वा नका करूं. पण परलोक तरी मानतां ? "

" वाः, मानत कां नाहीं ? "

" मग परलोकार्थ तुम्ही एक तरी सत्कृत्य केलं आहे ? कधीं एक दिवस तरी मंदिरांत गेलां अहांत ? "

कैलास कांहींसे चकित होऊन म्हणतात, " वाः, हें काय विचारतोस दयाळ ? कधीं मी मंदिरांत गेलों नाहीं ? कितीदां गेलों आहें. "

हरिदयाळनी पहिल्याप्रमाणेंच गंभीरपणें बोलण्यास सुरुवात केली, " तुम्हाला काशींत राहून वीस वर्षे झालीं. पण तुम्ही वीस दिवस तरी देवदर्शन घेतलं असेल असं वाटत नाहीं. मग पूजापाठ राहूंदेच. "

कैलास तें नाकारून लगेच उत्तरले, " छे दयाळ, वीस दिवसांहून अधिकदां देवदर्शनास गेलों आहे. पण तूं जाणतोसच, मला कशी ती सवड होत नाहीं. म्हणूनच पूजा-पाठादि सारं राहून जातं. पहा तर खरं, सकाळ होतांच शंभू मिश्राबरोबर एक डाव खेळावा लागतो. तो मोठा वस्ताद खेळणारा. बस, एक डाव संपतां संपतां दुपार होते. तदुपरांत स्नानादिक आटोपून सैंपाकाला लागतों. जेवण उरकतां उरकता सांज होते. आणि मग त्यानंतर, गंगा पांडे—कांहीं म्हण तूं, त्याचा खेळहि तारीफ करण्याजोगा असतो.—त्या

दिवशीं त्यानें माझ्यावर मातच केली होती म्हणना. एका बाजूनें घोडा आणि दुसऱ्या बाजूनें हत्ती चालवून त्यानें मला पेंचात धरलं होतं. मला तर वाटलं कीं—"

"अहो काका, हें राहूंदे. दुपारच्या वेळीं काय करता सागा?"

"दुपारच्या वेळीं? गंगा पांडेबरोबर—त्याचे दोन हत्ती, आत्ताच पहाना—"

हरिदयाळनीं अत्यंत कंटाळून त्याना मध्येंच हटकलें व म्हटलें, "बस, राहूंद्या. दुपारीं गंगापांडेची आणि संध्याकाळीं मुकुंद घोषची बैठक. मग तुम्हाला सवड होणार कशी बरं?"

कैलास उगी राहिले. हरिदयाळ अधिकच गंभीर होऊन उपदेश करूं लागले, "पण आता आपले दिवसहि कांहीं अधिक उरले नाहींत, काका; परलोकाची तयारी केली पाहिजे. आणि त्याची कांहीं चिंता असावी. बुद्धिबळांचं बोचकं तर तिथं आपल्याबरोबर नेऊं शकणार नाहीं."

कैलास एकदम खो खो करून हंसूं लागले. ते म्हणाले, "छे दयाळ, बुद्धिबळाचं बोचकं बरोबर नेता येणार नाहीं असं वाटतं. आणि तूं मला तयारींत रहाण्याविषयीं सागतोस. मी तर तयारच होऊन बसलों आहे. ज्या दिवशीं बोलावणं येईल त्याच दिवशीं सर्व चीजवस्त दुसऱ्याना देऊन तडक चालता होईन. त्याची काळजी कशाला?"

" काहीं पैसाअडका नाहीं वाटतं ? कसलीच धास्ती नाहीं मनाला ? "

" छे, मुळींच नाहीं. ज्या दिवशी माझा कमल गेला, ज्या दिवशीं कमलचरणने माझ्या तोंडाकडे पहात पहात डोळे मिटले, त्याच दिवशीं संशय, भय इत्यादि सर्व उपद्रव त्याच्या मागोमागच लयाला गेले. ते कसे गेले हें मला एक दिवस-सुद्धा जाणवलं नाहीं, बाबा. "

असें बोलता बोलताच म्हाताऱ्याचे डोळे भरून आले.

हरिदयाळ म्हणाले, " बरं, आता या सगळ्या गोष्टी राहूंद्या. माझी एक गोष्ट ऐकता ? "

" हो, सागना बाबा. "

हरिदयाळनी त्या दिवशींची सगळी हकीकत सांगितली आणि शेवटीं विचारलें, " आतां याला उपाय काय ? "

ऐकत असताच कैलासजींचा सदा हंसतमुख दिसणारा चेहरा निस्तेज झाला. ते कातर स्वरांत म्हणाले, " असं व्हायचं नाहीं, हरिदयाळ. सुलोचना सति सावित्री आहे. "

" अगोदर मी देखील असंच समजत होतो. पण स्त्रियांच्या बाबतींत सगळं काहीं संभवनीय आहे. "

" छे, असं म्हणूं नकोस. मनुष्यमात्राकडून पाप-पुण्य घडतंच. स्त्री आणि पुरुष यांमध्ये मला काहीं भेद दिसत नाहीं. तुला आपल्या आईची गोष्ट आठवते ? अजीबात विसरलास ?"

हरिदयाळ खजील झाले नि वैतागलेहि. थोडा वेळ मान खाली घालून उगी राहिले. मग म्हणतात, " परंतु आता जात बुडणार त्याच काय ? "

कैलासनी सांगितले, " प्रायश्चित्त घे. अजाणतेपणीं एकादं पाप घडलं तर त्यासाठीं प्रायश्चित्त नाही का ? "

" आहे खरं, पण इथले लोक तर मला वाळींत टाकतील "

" टाकूंदे. "

हरिदयाळनी संतापून म्हटले, " काय बोललात, टाकूंदे ? काका, जरा विचार करून बोलत जा. "

" हो दयाळ, विचारपूर्वकच बोलत आहे. आता तुझं वयहि काहीं कमी नाही. पन्नासी उलटली असेल. इतके दिवस तुझी जात राहिली. आता बाकीच्या दोन-चार वर्षांसाठीं नाहीं राहिली म्हणून तुझा मोठासा तोटा काय होणार बाबा ? "

" यात तोटा काहींच नाहीं ? जात बुडाली, धर्म गेला, तर परलोकीं जाब काय देऊं ? "

" जाब हाच दे कीं, एका अनाथेला मी आश्रय दिला होता. "

हरिदयाळ उगी राहून विचार करूं लागले. ही गोष्ट त्याना मुळींच पटेना. जरा वेळाने ते म्हणाले, " मग त्याला सुलोचनेच्या जावयाचा ठिकाणा सांगूं ? "

" छे, मुळींच सांगूं नकोस. एक बदमाष नि दारुबाज इसम धाकदपटशा दाखवून तुझ्याकडूनहि पैसे काढील, आणि पुन्हा

एका भल्या गृहस्थालाहि बुडवील. आणि त्या पाजी इसमाला तूं सहाय्य करणार ! "

" तसं केलं नाहीं तर माझा सत्यानाश होईल ! माझ्याकडे एकहि यजमान येणार नाही. मग खाऊं काय ? "

कैलास म्हणाले, " अं हं, त्याची काळजी नको. सरकारच्या कृपेनं मला वीस रुपये पेन्शन मिळते. बस, एवढ्यामध्ये आम्ही दोघेहि काका-पुतणे काम भागवूं. खाऊ-पिऊं आणि बुद्धिबळानी खेळूं. घरातून कुठं बाहेर जाणारच नाही. "

हरिदयाळ अगदी वैतागले होते तरी कैलासच्या तोंडीं अशा प्रकारचे लहान मुलाला शोभण्यासारखें बोलणे ऐकून हंसले. ते म्हणाले, " काका, माझा भार आपण का घेता ? आणि मी देखील दुसऱ्याची भानगड आपल्या माथी घेऊन जात-धर्म का सोडूं ? त्यापेक्षा—"

कैलास म्हणाले, " ह, बरोबर. त्यापेक्षा उत्तम म्हणजे हेच कीं, त्याला ठावठिकाणा सांगावा. आणि एका दीन बालिकेला तिचा पति, संसार नि अन्न या सर्व गोष्टींपासून वंचित करून सडकं हाड-मांस चघळणाऱ्या कोल्ह्या-कुत्र्याच्या तोंडून स्वतः सुटावं. बर बाबा, तसं कर. पण मला विचारायला आलास ते ठीक केलं नाहीस. आता सल्ला घ्यायला आलाच आहेस, तर आणखी एक गोष्ट ऐक. या काशी नगरींत माता अन्नपूर्णेचं

राज्य आहे. इथं राहून तिच्या सति बालकाना सतावलंस तर परिणामीं तुझं हित होणार नाहीं.

हरिदयाळनी रागावून म्हटलें, " काका मला शाप देता होय ? "

" छे, तूं काशींतील पंडा, खुद्द देवाचं वाहन. आमचा शाप तुला बाधणारहि नाहीं. त्याचं भय बाळगूं नकोस. पण बाबारे, ज्या गोष्टींत तूं हात घालत आहेस ती इतकी निर्लिप्त नाहीं. सति-सावित्रीचं यमाला देखील भय वाटतं. बस, याच गोष्टीची मी तुला आठवण करून देतों. कारण, आम्ही पुष्कळ दिवस एकत्र बसून बुद्धिबळानी खेळलों आहोत. शिवाय, मी तुझ्यावर प्रेमहि करतो. "

हरिदयाळनी काही उत्तर दिले नाहीं. ते खिन्नपणे तेथून उठले.

कैलास म्हणाले, " काय बाबा, माझं ऐकणार का ? "

" वेडगळाची गोष्ट ऐकण्यास मलाहि वेडगळ बनलं पाहिजे."

कैलास गप्प राहिले. आणि हरिदयाळ चालते झाले.

बुद्धिबळाची पोटली बांधता बांधता कैलास विचार करूं लागले,—मला वाटतं त्याचंच म्हणणं बरोबर. माझ्या सल्ल्यानं खरोखरच जगाचा व्यवहार चालणार नाहीं. जेव्हा कुणीतरी मरतो, आणि माणसे मिळत नाहींत, तेव्हा लोक मला बोलावतात—खादा दिला पाहिजे. जेव्हा कुणी आजारी पडतो,

तेव्हा देखील लोक मला बोलावतात—रोग्याची सेवाशुश्रूषा केली पाहिजे. शिवाय, काहींजण बुद्धिबळें खेळण्यासहि बोलावतात. पण, माझं इतकं वय झालं तरी, आजपर्यंत कधीं कुणीहि माझा सल्ला घेण्यास आला नाहीं !

परंतु रात्रीं फार वेळ विचार करीत राहूनहि कैलास आपल्या मनाशीं नक्की काहीं ठरवूं शकले नाही. सूर्यप्रकाशाइतकी उज्ज्वळ आणि स्फटिकासारखी स्वच्छ गोष्ट लोकाना का पटत नाहीं, असली सोपी प्राजळ भाषा लोकाना कशी समजत नाहीं, हें त्याच्या लक्षात येईना.

त्याच रात्रीं, पुष्कळ विचारातीं हरिदयाळनी चन्द्रनाथचे काका मणिशंकर याना, चन्द्रनाथनें स्वेच्छापूर्वक एका वेश्येच्या मुलीशीं लग्न करून तिला घरीं नेले आहे अशा अर्थाचे, एक पत्र लिहिलें.

८

हरिदयाळनी सर्व हकीकत मणीशंकरला सविस्तरपणे लिहून कळवली होती, यामुळे त्याना साहजिकच वाटलें कीं, या बातमींत खोटे असें काहीं नाहीं. परंतु अशा प्रसंगीं काय करावे हें त्याना सुचेना. ही गोष्ट त्याना सुखद किंवा दुःखद कशीहि असो; पण ती होती फार मोठी यात शंका नाहीं. त्याना एकटयालाच हा भार वहाण्यात त्रास होऊं लागला. म्हणून त्यानीं आपल्या बायकोला एकातात ही सगळी हकीकत

सांगून म्हटलें,—“ तो माझा सल्ला घेता तर कधीं अशी गोष्ट का घडती ? मी कधी त्याचा असा विश्वासघात होऊं दिला असता ? काहीं असो, आता ही गोष्ट पटकर्णी होऊं देता कामा नये. अगोदर काय करायच ते नक्की ठरवलं पाहिजे.”

परंतु कोणत्याहि गोष्टीचा विचार करण्यास थोडा अवधि लागतो, दोन-चार दिवस थांबावें लागते. आणि स्त्रियाच्याने तर हे होणे अशक्य. यामुळेच हरिदयाळच्या पत्रातील आशय अगोदर दोघाचौघाच्या कानात पडला, व हळू हळू ही गोष्ट जाणणाऱ्याची संख्या वाढत गेली. ज्या दिवशीं मणिशंकरच्या मुलीच्या केळवणीसाठी मंडळी जमली होती, त्याच दिवशी ही गोष्ट हरिबालेच्याहि कानीं पडली एवढ्याचकरता ती भीत भीत चन्द्रनाथचे सरयूवर किती प्रेम आहे याची शहानिशा करण्यास आली होती. त्या दिवशीं स्त्रियामध्ये या गोष्टीची मोठ्या उत्साहाने चर्चा होऊन त्यानींच प्रथम ठरवले की, प्रेमाच्या सखोलतेवर सरयूचे भवितव्य अवलंबून आहे.

सगळयाजणी कुजबुजत. सगळीच्या चर्येवरून व्यक्त होत होते की, त्याच्या मृदु हृदयात एक प्रकारच्या पैशाचिक आनंदाचा झरा उमळला आहे. सगळयाजणीं खेद प्रगट करीत नि उसासे सोडीत ख-या, पण सगळींच्या मनात प्रच्छन्न इच्छा ही कीं, सरयूच्या भाग्यदेवतेने तिच्याकडे पाठ फिरवल्याबरोबर आपण फार वाईट वाटल्याचे दर्शवून ‘ हाय ’ म्हणूं. तशा पर्वतप्राय

दुःखाचे चित्र अत्यंत यत्नानें नि कुशलतेने एकमेकींच्या हृदयावर अंकित करण्याची त्या खटपट करीत होत्या. त्या उत्कंठेमुळे आज दोन दिवस त्याचा डोळा लागला नव्हता. एक आठवडा लोटला, तरी इतके दिवस आग केवळ धुमसत राहिली, पेटली नाही. ही गोष्ट बांध घातलेल्या प्रवाहाप्रमाणे स्त्री-मंडळातच फिरत राहिली. त्याचा अभिप्रेत संकल्प उच्छृंखळपणे दुथडी भरून तीव्र वेगाने वाहूं शकला नाहीं. त्यामुळेच सात दिवसांच्या या दीर्घावधीत त्याना लेशमात्र शांति लाभली नाहीं. पुरुषातहि ही गोष्ट निघे, पण तेवढ्या वेळेपुरतीच. कारण, चन्द्रनाथाला जाति-बहिष्कृत करण्याखेरीज दुसरीं कामे त्याच्या मागे होती. त्याना संसाराचा गाडा ओढावा लागे; पाय पसरून बसण्यास वेळ नव्हता. म्हणून कोणत्याहि गोष्टीचा निर्णय लागण्यापूर्वीच त्याची बैठक समाप्त होई. तशात एकादी यःकश्चित् गोष्ट घडली असती, चन्द्रनाथ गरीब असता तर, कदाचित् या गोष्टीचा निकाल लागता देखील. परंतु या प्रकरणात उघडपणे पुढाकार घेऊन चन्द्रनाथविरुद्ध उभा रहाण्यास कुणी धजेना. हें काम फक्त मणिशंकरच करू शकले असते. पण कोण जाणे का, ही गोष्ट ते काढत नसत. शेवटीं निरुपायाने शेजारपाजारच्या वृद्ध विधवानीं आणि सधवानींहि या कर्तव्यकर्मात लक्ष घातले. निरपराधी व्रजकिशोर व त्याची बायको हरकाली या उभयताना, त्याच्या-जाति-धर्माचे पालन

व्हावें या पवित्र हेतूने, त्यानीं अत्यंत दुःखपूर्वक जाणीव करून दिली कीं, सरयूची आई काशींतील वेश्या असल्याचे निर्विवाद सिद्ध झाले आहे, आणि अर्थात्, त्या मुलीच्या हातचे अन्नपाणी घेतल्यामुळे तुम्हा उभयता पतिपत्नीची जात नि धर्म बुडाला.

हरकाली विव्हळ होऊन प्रथम बघतच राहिली. मग म्हणाली, “ काय झालं ? ”

राममयच्या वयोवृद्ध आईनें हुंकारपूर्ण निःश्वास सोडून म्हटले, “ आणखी काय व्हायचं बाईसाहेब ? होणारं झालं ! सत्यानाश झाला ! ”

असे म्हणून त्या म्हातारीने सगळी कहाणी पुन्हा एकवार साद्यन्त निवेदन केली. तिच्या सांगण्यात ज्या थोड्याफार चुका राहिल्या त्या आसपासच्या दोनचार बायकांनी सुधारल्या. याप्रमाणें हरकालीला पक्के कळून चुकले की, खरोखरच तिचा सत्यानाश झाला. पण आपला नाश किती झाला, व दुसऱ्या एका माणसाचा किती याचा नीट विचार करण्यासाठी ती तेथून मुकाट्यानें उठली, आणि आपल्या खोलींत जाऊन दार बंद करून बसली. ज्या स्त्रिया स्वतः होऊन हे सत्कर्म करण्यासाठीं आल्या होत्या त्याना आपण केले तें योग्य की अयोग्य याचा उलगडा होईना. त्यामुळे सगळ्याजणीं चिंतित नि विषण्ण मुद्रेने एकीमागून एक तेथून पाय काढूं लागल्या. हरकाली खोलींत एकटीच बसली तेव्हा, ही बातमी शेवटपर्यंत

टिकते किंवा नाहीं याविषयीं तिला आशंका वाटूं लागली. तिला वाटले कीं, ही बातमी सोळा आणे खरी न उतरली तर उपायच नाहीं. पण माझें अदृष्ट सफळ होण्याची वेळ आली व इतक्या दिवसांनंतर देवाची माझ्यावर कृपादृष्टी वळली तर भाची अजून हातात आहेच. अद्यापि ती दुसऱ्याच्या घरीं गेलेली नाही—हीच तर योग्य संधि. वाटेल ते झाले तरी ह्या बाबतींत शेवटपर्यंत प्राण पणाला लावून प्रयत्न केलाच पाहिजे, याविषयीं तिला संदेह राहिला नाहीं. ती खिन्नपणें चन्द्रनाथच्या अभ्यासाच्या खोलीत जाऊन त्याच्या शेजारीं बसली.

हरकालीचा भीतिग्रस्त चेहरा पहाताच चन्द्रनाथने चिंतातूर होऊन विचारले, "काय झालं, मामी?"

हरकालीने आपले कपाळ बडवून स्फुंदत म्हटले, "बाळ चन्द्रनाथ, आम्ही गांजलेलो आहोत म्हणून का तूं आम्हाला आणखी दंड देत आहेस हा?"

चन्द्रनाथ कुंठित झाला. पुष्कळ विचारातींहि आपण काय केले ते त्याच्या लक्षात येईना.

हरकाली सांगूं लागली,—"आता बाकी काय राहिलं? घासभर अन्नापायीं आमची जातहि बुडाली, धर्महि बुडाला. बाबा, आमच्याकडे निर्वाहाचं असतं तर, तूं आमचा असा सत्यानाश करूं शकतास?"

थोडा वेळ उगी राहून चन्द्रनाथने अत्यंत शांतपणे विचारले, " झालं तरी काय ? "

पदराने उगाचच डोळे पुसून हरकाली म्हणाली, " माझ्या फुटक्या कपाळी लिहिलं होतं तेच झालं. अरे माझ्या सोन्या, तुला त्या सटवीनी भुरळ पाडून ही सगळी भानगड उभी केली. "

" मामी, तुझ्या पाया पडतो. जरा स्पष्ट सागना काय ते. "

" मी काय सागूं, तूं आपल्या काकांनाच जाऊन काय तें विचार. "

चन्द्रनाथ जास्तच वैतागला. म्हणाला, " काकानाच विचारलं पाहिजे, तर मग तूं हे काय करतेस ? "

" बाबा, आमचा सत्यानाश झाला म्हणूनच मी असं करते, दुसरं काय ? "

आपल्या मामा-मामीवर चन्द्रनाथची फार श्रद्धा होती पण अशा प्रकारच्या वागणुकीने मनुष्य साहजिकच वैतागतो, आणि तसेच त्याच्या बाबतीतहि झाले. त्याने फारच चिडून म्हटले, " जर सत्यानाश होत आहेच तर दुसरीकडे जाऊन रहा. आमच्या समोर असं करूं नकोस. "

तेव्हा चन्द्रनाथच्या आईची आठव काढून हरकालीने

आक्रोश आरंभला.—अग, तूं आम्हाला इथं बोलावून आणलंस, नि तुझा मुलगा आज आम्हाला घराबाहेर काढूं पहातोय !

चन्द्रनाथने अत्यंत कासाविस होऊन मामीचा हात पकडून म्हटले, " मामी, स्पष्टपणे सांगत नाहीस तोपर्यंत तुमचा कसा सत्यानाश झाला ते मी काय समजूं ? ' सत्यानाश ' ' सत्यानाश ' म्हणतेस; पण अजून स्पष्ट काय तें मात्र सांगितलं नाहींस. "

हरकालीनें पुन्हा एकदा डोळे पुसत म्हटले, " का बाबा, तुला काहींच माहीत नाही ? "

" छे. "

" तुझ्या काकांना काशीहून तुमच्या उपाध्यायानी एक पत्र पाठवलं आहे. "

" काय लिहिलंय त्यात ? "

हरकालीने आवंढा गिळून आणि मान खालीं घालून म्हटलें, " बाबा, काशींत तुला एकट्याला गाठून त्या सटवीनी फसवल आणि वेश्येशीं तुझं लग्न लावून टाकलं. "

चन्द्रनाथने डोळे ताणून प्रश्न केला, " कुणाचं ? "

हरकाली कपाळावर हात मारून म्हणाली, " तुझं. "

मामीच्या जवळ सरकून चन्द्रनाथने गंभीरपणे विचारलें, " वेश्येशी कुणाचं लग्न झालं ? माझं ? "

" हो, तुझं. "

" याचा अर्थ लग्नापूर्वी सरयू वेश्यावृत्तीनं रहात होती. मामी, तुला आठवत नाहीं वाटतं, ती दहा वर्षांची असतानाच या घरीं आली ते ? "

" तें मला नीटसं माहीत नाही चन्द्रनाथ, पण तिच्या आईची काशीत फार अपकीर्ति झाली आहे. "

" मग असं साग की, तिची आई वेश्यावृत्तीनं रहात होती. ती स्वतः तर वेश्या नव्हतीना ? "

हरकाली मनातल्या मनात खिन्न होऊन म्हणाली, " गोष्ट एकच, गोष्ट एकच, बाबा. "

चन्द्रनाथ कडाडून म्हणाला, " मामी, कुणाला काय सागत आहेस तूं ? वेड लागलं काय तुला ? "

हे धमकावणीचे बोलणे ऐकून हरकाली स्फुंदत म्हणाली, " गोष्टच वेड लागण्यासारखी, बाबा. आम्हा दोघांचा प्रायश्चित्त-विधि करवून दे. मग वाट मिळेल तिकडे आम्हीं चालते होऊं. यापेक्षा भीक मागून रहाणं बरं."

चन्द्रनाथहि क्रुद्ध होऊन म्हणाला, " हं, तेंच चांगलं. "

" मग जावं तर ? "

चन्द्रनाथ तोंड फिरवून म्हणाला—" हो, जा. "

तेव्हा हरकाली आपलें कपाळ बडवून म्हणाली, " हाय ग अभागे, शेवटीं तुझ्या नशीबात हेच होतं ना ? "

चन्द्रनाथने तोंड वळवून गंभीरपणे विचारलें, " अजूनहि तुला स्पष्ट काय तें सांगायचं नाहीं का ? "

" सगळं तर सांगितलं. "

" कांहींच सांगितलं नाहींस. तें पत्र कुठं ? "

" तुझ्या काकाकडे आहे. "

" काय लिहिलंय त्या पत्रांत ? "

" तेंच तर सांगते आहे. "

चन्द्रनाथ मागें फिरून एका खाटेवर बसला. लज्जातिशयानें आणि तिरस्कारानें तो नखशिखान्त कांपूं लागला. त्याचें सारें शरीर सुन्न होत चाललें. त्याच्या तोंडून केवळ एवढेंच बाहेर पडलें—" छीः ! "

हरकाली त्याच्या चेहऱ्याकडे पाहून मनांतल्या मनांत कांहींशी बावरली. अशा प्रकारची भीषणता नि कठोरता एकाद्या मृताच्या चेहऱ्यावरहि कुणी पाहिली नसेल. ती गपचुप तेथून गेली.

९

चन्द्रनाथने म्हटलें, " पाहूं कुठं आहे तें पत्र ? "

मणिशंकरनी निमूटपणें पेटींतून एक पत्र काढून त्याच्या हातांत दिलें. चन्द्रनाथने तें दोनदां साद्यन्त वाचून शुष्क कंठानें विचारलें, " याचा पुरावा ? "

" राखालदास स्वतःच येत आहे. "

" त्याच्याहि बोलण्याचा काय भरंवसा ? "

" ते मी नाहीं जाणत. आता तुला बरं वाटेल तसं कर. "

" तो कशाला येत आहे ? ही गोष्ट सिद्ध करण्यात त्याचा फायदा काय ? "

" फायद्याची गोष्ट या पत्रांत लिहिली आहे. दोन हजार रुपये पाहिजेत त्याला. "

चन्द्रनाथने मणिशंकरच्या चेहऱ्याकडे टक लावून पहात म्हटले, " ही गोष्ट बाहेर फुटली नसती तर भीति घालून तो रुपये वसूल करूं शकला असता. पण आता त्याच्या आशेवर पाणी फिरणार. तुम्ही माझ्यावर एक प्रकारं उपकारच केले म्हणायचे. माझे इतके रुपये वाचवलेत. "

मणिशंकर लाजून मेल्यापरी झाले. त्याना वाटले, मी ही गोष्ट फोडलेली नाहीं असें सागावे. परंतु लगेच त्याना आठवलें कीं, आपल्याकडूनच या गोष्टीचा परिस्पोट झाला आहे. आपण बायकोला ते न सागतों तर कुणाला कळते ना. एवढ्याचमुळे मान खाली घालून ते उगी बसले.

चन्द्रनाथ पुन्हा म्हणाला, " हा माझा गाव. आणि माझ्या गावात, माझ्या घरीं, एक कंगाल लम्पट भिक्षुक माझी मानखंडना करण्यासाठीं कसा येऊं धजतो ? मी आपल्याला विचारूं इच्छित नाहीं हे. पण काका, मला आपणास अवश्य विचारायचं आहे कीं, मी मेलो तर आपण सुखी व्हाल काय ? "

मणिशंकरनी जीभ चावून म्हटले, " शिव ! शिव ! चन्द्रनाथ, असं बोलूं नकोस बाबा. "

चन्द्रनाथ उत्तरला, " पुन्हा कधी असे शब्द उच्चारण्याची पाळीच येणार नाही. आपण मला पूज्य अहांत, आज माझ्या-कडून काहीं प्रमाद घडला असेल तर आपण मला क्षमा करावी. माझी इस्टेट इत्यादि आहे ती सगळी आपण घ्या, आणि ती घेऊन मजवर प्रसन्न व्हा. मी जातो. मासिकखर्चासाठीं मला थोडेफार पाठवा. देवाशपथ सागतो कीं, याहून अधिक मी काहीं मागत नाहीं. मात्र अशा रीतीनं माझा सत्यानाश करूं नका. "

बोलता बोलता चन्द्रनाथचा कंठ दाटून आला. त्यानें दातातळीं ओंठ दाबून मोठ्या सायासाने रडूं आवरले.

मणिशंकर उठून उभे राहिले आणि चन्द्रनाथचा उजवा हात घट्ट पकडून रडूं लागले. ते म्हणाले, " बाळ चन्द्रनाथ, माझ्या स्वर्गवासी ज्येष्ठ बंधूच्या वंशात तूंच तेवढा आहेस. मी तुझ्यापुढं पदर पसरतो, या वृद्धाचा तूं आणखी धिःकार करूं नकोस. "

चन्द्रनाथनें तोंड फिरवून आसवे पुसत म्हटले, " काका, मी तुमचा धिःकार करत नाहीं. या दारुण आपत्तीनंतर आता गाव सोडून जाण्याखेरीज मला अन्य मार्गच उरत नाही. एव-ढंच मला आपणास सागायचं आहे. "

मणिशंकरनी आश्चर्योद्गार काढून म्हटलें, " वा, गांव का सोडणार ? अजाणतेपणीं तूं हे लग्न केलंस, म्हणून विशेष लाजायाचं कारण नाहीं. मला वाटतं, याप्रीत्यर्थ एक प्रायश्चित्त घेतलं कीं पुरे. "

चन्द्रनाथ गप्प राहिला. मणिशंकर उत्साहित होऊन पुन्हा म्हणाले, " याला अनेक मार्ग आहेत. तिला सोडून गपचुप एक प्रायश्चित्त घे; आणि दुसरं लग्न करून प्रपंच चालव. एवढं केल्यानं सर्वतोपरी सुटका होईल. "

चन्द्रनाथच्या अंगावर शहारे उठले.

ही गोष्ट व्यवहारज्ञ मणिशंकरच्या चटकन् लक्षात आली. ते चन्द्रनाथकडे टक लावून पहात राहिले.

चन्द्रनाथ म्हणाला, " काका, मी कोणत्याहि प्रकारं तिला सोडूं शकणार नाही. "

मणिशंकर उत्तरले, " सहज सोडूं शकशील, चन्द्रनाथ. आज विश्रांति घे. उद्या शात चित्तानं याचा विचार केल्यावर हे काम अवघड नाहीं असं तुलाच वाटेल. इतःपर कोणत्याहि प्रकारं सुनबाईला घरांत ठेवणं योग्य नाहीं. "

" पण काहीं पुरावा मिळत नाहीं तोंपर्यंत तिला सोडण्या-विषयीं आपण मला कशी आज्ञा करता ? "

वृद्ध मणिशंकरनी जरा वेळ विचार करून म्हटले, " मी अशी युक्ति योजतों कीं, ज्यामुळं ही गोष्ट स्पष्टपणे शाबित

करण्याची पाळीच येऊं नये. पण तुला शेवटीं तिचा त्याग करावाच लागेल. तिला सोडून प्रायश्चित्त घेतलंस कीं सगळी भानगड मिटेल."

"कोण मिटवणार?"

"मी मिटवीन."

"पण नीट विचारपूस केल्याशिवाय—"

"इच्छा झाली तर मागाहून विचारपूस कर. परंतु मी खात्रीपूर्वक सांगूं शकतो की, यात मिथ्या काहीं नाहीं."

चन्द्रनाथ घरी येऊन आपल्या खोलीचें दार बंद करून पलंगावर पडला. मणिशंकरनी सागितलें आहे सरयूला सोडावे लागेल. पलंगावर पडल्या पडल्या शून्य दृष्टीनें वर पहात, झोपी गेलेला मनुष्य स्वतःशीं बरळतो त्याप्रमाणे, तो वारंवार एकच गोष्ट बडबडूं लागला—"सरयूला सोडावं लागेल, वेश्येची मुलगी आहे ती." हें त्याने कितीदा, किती प्रकारे आपल्याच तोडाने म्हटले आणि आपल्याच कानांनीं ऐकलें. परंतु काहीं केल्या त्याच्या मनाला ही गोष्ट पटेना. आपण सरयूचा त्याग केला आहे, सरयू घरीं नाहीं, दृष्टीसमोर नाही, दृष्टीपथातहि नाहीं, ती आतां आपली राहिली नाहीं—हें चित्र पुष्कळ प्रयत्नातींहि तो मनःचक्षूंसमोर उभे करूं शकेना. तथापि मणिशंकर म्हणतात कीं, हे काम कठीण नाहीं. हें काम कठीण आहे कीं सोपें, शक्य किंवा अशक्य, ते जाणण्याची

शक्ति माणसाच्या अंतःकरणात असते वा नसते इतके देखील त्याला निश्चित ठरवता येईना. तो मेल्यासारखा पडून राहिला आणि शेवटी झोपीं गेला. निद्रावस्थेत त्याने पुष्कळ स्वप्ने पाहिली. काही स्पष्ट होती, काही अस्पष्ट. त्या तंद्रीतच आपल्या साऱ्या शरीरामध्ये एक प्रकारची व्यथा थैमान घालत असल्याचेहि त्याला जाणवलें. साज होत चालली होती. त्याची झोप उडाली व तो उठून बसला. त्याची मानसिक अवस्था या वेळीं अशी झाली होती कीं, त्याच्या हृदयात मायाममतेला थारा नव्हता, किंवा क्रोध-तिरस्कार करण्याचेहि त्याच्यात त्राण उरले नव्हते. एका अव्यक्त नि अज्ञात लज्जेच्या भारानें त्याचे सबंध शरीर आणि मन हळू हळू अवश नि अवनत होऊन विनाशपंथाला लागलें.

त्याच वेळी नोकराने दिवा पेटवून आणला व दार खडखडावले. चन्द्रनाथनें चटकन् उठून दार उघडले आणि तो खोलीत येरझारा घालूं लागला. डोळ्यावर दिव्याचा प्रकाश पडल्यामुळे त्याची मोहनिद्रा आपोआप निवळली, व त्याला एकाएकीं शंका आली की, हे खरे असेल काय ? सरयूला स्वतःला हे माहीत आहे का ? त्याची सरयू जाणूनबुजून त्याचाच असा सत्यानाश करील या गोष्टीवर चन्द्रनाथचा कांहीं केल्या विश्वास बसेना. तो त्वरेने खोलींतून बाहेर पडून सरयूच्या शयनगृहात पोचला.

साजवात लावून सरयू बसली होती. नवऱ्याला येताना पाहून ती ससंभ्रम उठून उभी राहिली. तिच्या चेहऱ्यावर भयाचे किंवा उद्वेगाचे चिन्ह दिसले नाहीं. असे दिसलें कीं, तिच्या शरीरात बिंदुमात्रहि रक्त नाही. चन्द्रनाथने एकदम विचारले, " ऐकलंसना सगळं काहीं ? "

सरयू मान हलवून म्हणाली,–" हं "

" सगळं खरं तर ? "

" हो, खरं. "

चन्द्रनाथने पलंगावर थबकण मारली.–" मग इतके दिवस बोलली का नाहींस ? "

" आईनं मना केल होतं, आणि आपणहि कधी विचारलं नाही. "

" तुझ्या आईवर मी उपकार केले त्याची फेड तुम्ही अशा रीतीनं केली होय ? " सरयू निमूटपणे मान खाली घालून उभी राहिली.

चन्द्रनाथ पुन्हा बोलूं लागला–" आता समजलं तूं इतकी भिऊन भिऊन कां वागत होतीस ते. तुझ्यावर इतकं प्रेम करूनहि तूं सुखी का झाली नाहीस ते आता कळलं. मागच्या सगळ्या गोष्टीचा आज खुलासा झाला. कदाचित् एवढ्याचसाठी तुझी आई काही केल्या इकडे येण्यास कबूल झाली नाहीं, होयना ? "

सरयू मानेच्या खुणेनेच म्हणाली—हं.

क्षणात साऱ्या गत गोष्टींची चन्द्रनाथला आठवण झाली. तो काशीवास, ती चिरशुद्धमूर्ति सरयूची विधवा आई, तिचे ते कृतज्ञ नि सजल दोन डोळे, स्नेहपूर्ण नि शात बोलणे. चन्द्रनाथ पिघळून म्हणाला, “ सरयू, मला सगळ्या गोष्टी स्पष्टपणे सागूं शकशील का ? ”

“ ह, सागूं शकेन. नवद्वीपाजवळ माझ्या मामाचं घर. राखाल भट्टाचार्याचं घर मामाच्या घराशेजारींच होतं. लहानपणापासूनच आईला तो आवडे. एकदा दोघाच्या लग्नाचीहि गोष्ट निघाली होती. पण तो हीन कुळातला असल्यामुळं लग्न होऊं शकलं नाहीं. माझ्या वडलाचं घर हाली शहरामध्ये होत. मी तीन वर्षाची असताना ते वारले. आणि मला घेऊन आई नवद्वीपाला आली. त्यानंतर मी पाच वर्षांची असताना माझी आई मला घेऊन—”

चन्द्रनाथनें विचारलें, “ पुढं काय ? ”

“ काहीं दिवस मथुरेत राहिलों, वृंदावनला राहिलों, आणि मग काशीस आलो. त्याच वेळीं राखालनं दारू पिण्यास सुरुवात केली. आईपाशीं थोडे दागदागीने होते. त्यासाठीं नेहमीं भाडणतंटा होऊं लागला. शेवटीं एके रात्रीं ते सर्व दागिने चोरून तो पळाला. त्या वेळीं आईजवळ एक पै देखील शिल्लक राहिली नव्हती. आम्ही सातआठ दिवस भीक मागून

कसाबसा निर्वाह केला. त्यानंतर पुढं काय घडलं ते तुम्हीं जाणताच."

चन्द्रनाथचें मस्तक जणूं भडकलें. अधोमुख सरयूकडे क्रूर दृष्टिक्षेप करून तो म्हणाला, "शिव! शिव! तूं अशी आहेस नि तुझी आई तशी! सर्व समजून उमजूनच तूं माझा घात केलासना! तूं इतकी महापापिष्ठा असशील असं मला कधीं स्वप्नात सुद्धा वाटलं नाहीं!"

सरयूच्या डोळ्यातून टपटप आसवे गळूं लागली. ती मान खालीं घालून निमूटपणें उभी राहिली.

परंतु चन्द्रनाथने तिच्याकडे पाहिलें नाही. त्यानें जास्तच कठोर होऊन विचारलें, "बरं, आता याला इलाज काय?"

आसवे पुसून सरयू हळूच म्हणाली, "आपण सांगा."

"तर मग जवळ ये."

सरयू जवळ आली. चन्द्रनाथनें तिचा हात मुठीत घट्ट पकडून म्हटले, "लोक सांगतात की, तुझा त्याग करावा. परंतु मला इतका धीर होत नाहीं. तुझ्यावर माझा भरंवसाहि राहिला नाहीं. माझा विश्वास उडाला."

तत्क्षणीं सरयूच्या फिक्कट चेहऱ्यावर एक प्रकारची लाली चमकली. तिचे अश्रूंनी डबडबले आणि निस्तेज डोळे क्षणात लखाखले. तिने विचारले, "आपल्याला माझा भरंवसा राहिला नाहीना?"

" छे, मुळींच नाहीं. तूं वाटेल ते करशील."

सरयूने पतीच्या तोंडाशी आपले तोंड नेऊन निश्चल स्वराने विचारलें, " आपण माझे कोण हे जाणताच. एक दिवस आपण मला म्हणाला होता कीं, आपल्या तोंडाकडे नीट पहा. आज मी पण सांगते, आपण एकवेळ माझं तोंड चांगलं निरखून पहा. मी इलाज सांगते, ऐकाल ?"

" हो, ऐकेन. बोल, कोणता इलाज ?"

" मी विष घेतलं तर, इलाज होईल काय ?"

चन्द्रनाथची मूठ अधिकच आवळली, जणूं सरयू कुठे पळून जाऊं नये. तो म्हणाला, " हं, हा इलाज कबूल आहे. तूं विष खाऊं शकशील ?"

" हो, खाऊं शकेन."

" अगदीं सावधपणे ? अगदी गुप्तपणे ?"

" हं, तसंच करीन."

" आजच ?"

सरयू म्हणाली, " बरं, आजच."

नवरा उठून जात आहे असे पाहून तिने त्याचे दोन्ही पाय धरून म्हटले, " मला आशीर्वादसुद्धा दिला नाही ?"

चन्द्रनाथ वर पाहून उत्तरला, " आतांच नाही. तूं गेलीस, तुझं मृत शरीर जळून खाक झालं, कीं मग आशीर्वाद देईन."

सरयू त्याचे पाय सोडून म्हणाली, "बरं, तसं करा."

चन्द्रनाथ जाऊं लागताच ती पुन्हा एकदा उठली आणि दरवाजात पाठमोरी उभी राहून त्याला अडवून म्हणाली, "मी विष खाल्ल्यानं आपल्यावर तर काही संकट कोसळणार नाहीना ?"

"बिल्कुल नाहीं."

"कुणी कोणत्याहि प्रकारचा संशय घेणार नाहीना ?"

"लोकाना संशय तर येईलच. पण रुपये चारून त्यांचीं तोंडं बंद करीन !"

"मी आपल्या बिछान्याखाली एक पत्र ठेवून जाते, ते सगळ्याना दाखवा."

चन्द्रनाथने जवळ येऊन सरयूच्या माथ्यावर हात फिरवत म्हटले, "असंच कर. पत्र नीट लिही आणि खाली स्पष्ट अक्षरात आपली सही कर. त्यामुळं तुझा खून केल्याचा आळ माझ्यावर येणार नाहीं. आणखी एक गोष्ट—आतून दारं-खिडक्या चांगल्या लावून घे, किंचित् शब्द देखील ऐकू येऊं नये. मला ऐकू येऊं नये, कीं—"

सरयू दरवाजातून बाजूला झाली, व पुन्हा एकदा जमिनीवर माथा टेकून तिने नवऱ्यास नमस्कार केला. आणि त्याची पद-धूळ माथ्याला लावून ती म्हणाली, "बरं, आता जा—"

हे सांगत असताच तिच्या मनात न जाणे कसली शंका

आली. तिने नवऱ्याचा हात धरून म्हटले, " जरा आणखी थांबा." मग दिवा जवळ नेऊन तिने त्याचा चेहरा नीट न्याहाळला आणि तेव्हा ती दचकली. चन्द्रनाथच्या दोन्ही दृष्टींत, वेड्याच्या दृष्टीप्रमाणे, एक तीव्र ज्योत लखाखली !

चन्द्रनाथने विचारले, " माझ्या डोळ्याकडे काय बघतेस ? "

सरयू किंचित् उगी राहून उत्तरली, "काही नाहीं. बरं, जा."

हळू हळू चन्द्रनाथ बाहेर निघून गेला. जाता जाता तो बडबडला,—हेच ठीक ! हेच ठीक ! आजच !

## १०

त्या रात्री सरयू आपल्या खोलीत येऊन विव्हळूं लागली. मनातल्या मनात ती म्हणाली,—मी कोणत्याहि प्रकारं विष खाऊ शकणार नाहीं. एकटीच असते तर जीव देऊ शकते. पण आता मी एकटी नाही, आई आहे ना ! आई होऊन भ्रूणहत्या कशी करूं ? म्हणून ती जीव देऊं शकली नाही. तथापि आपले सुखाचे दिवस संपले याबद्दल तिला तिळमात्रहि शंका उरली नाही.

मध्यरात्रीच्या सुमारास चन्द्रनाथ आपल्या पत्नीच्या खोलींत आला, आणि सर्व काही ऐकून घेऊन त्याने उन्मत्त आवेगाने तिला छातीशी कवटाळले. पुनः पुन्हा तो सागूं लागला, " नको ग सरयू, तूं असलं कृत्य कधीहि करू नकोस." परंतु यापरते तिला कोणतेहि आश्वासन तो देऊं शकला नाही. या हतभागिनीला

आपले लज्जित तोंड लपवून बसता येईल असा एकादा कोनाकोपरा देखील स्वतःच्या विस्तीर्ण वाड्यात त्याला शोधूनहि सापडला नाहीं. आणि उभ्या गावात जिच्या आश्रयाला राहून आपल्या तप्त अश्रुराशींतील एक तरी बिंदु पुसता येईल अशा ममतेची तिला अणुमात्र कल्पना होईना. खूप रडूनसवरून तिने सात दिवसाच्या अवधीची भीक मागितली. भाद्रपदातील हे अखेरचे सात दिवस नवऱ्याच्या आश्रयाला राहून काढल्यावर ती सदाची निराश्रिता नि रस्त्यावरील भिकारीण होणार. भाद्रपदात घरातून कुत्र्या-मांजरांनासुद्धां हाकून लावत नसतात; कारण, कुटुंबियाचे अकल्याण होते. आणि एवढ्याचमुळे सरयूची विनवणी मान्य करण्यात आली.

एके दिवशीं तिने नवऱ्याचा हात धरून म्हटले, " माझ्या नशीबात असेल ते मी भोगेन. त्यासाठीं तिळमात्रहि वाईट वाटून घेऊं नये. मजसारख्या अभागिनीला घरात घेऊन फार त्रास सोसला; पण आणखी सोसूं नका. मला निरोप देऊन पुन्हा प्रपंच चालवावा. मी थाटलेल्या संसाराचं मातेरं करूं नये. "

चन्द्रनाथ मान वाकवून उगा राहिला. बरे-वाईट उत्तरच त्याला सुचेना. हं, एवढें मात्र तो समजून चुकला कीं, सरयू आता वाचाळ झाली, फाजील बोलूं लागली. इतके दिवस तिला जी भीति वाटे ती उरली नाहीं. परवापर्यंत तोंड झाकून नकली मुखडा घालून ती वावरत होती. तो नकली मुखडा सरकून

पडेल व खरी गोष्ट उघडकीला येईल या भयाने हलकीशी झुळूक लागली तरी ती कावरीबावरी होई. आता तिची भीति गेली. ती निर्भयपणे बोलते. या जीवनात तिजपाशी जे काही होते,—तिचा नवरा, तिचे सर्वस्व,—त्यावर समाजाच्या कोर्टानें डिक्री बजावून लिलाव पुकारला. तेव्हा आता ती ऋणमुक्त, सर्वस्वहीन संन्यासिनी झाली. म्हणूनच ती आताशी नवऱ्या-बरोबर धिटाईने बोलते. मित्राप्रमाणे, शिक्षकाप्रमाणे उपदेशद्वारा निर्भयतापूर्वक आपले मत व्यक्त करते. त्या रात्रीच दोघानीहि परस्पराला क्षमा केली. आणि विषप्राशन करण्यासाठी भर दिल्यामुळे चन्द्रनाथला आलेल्या आत्मग्लानीनें तर सरयूचे सारे दोष झाकले गेले.

दुसरे दिवशीं सकाळींच हरकाली एका कागदावर तिकीट लावून आपल्या नवऱ्याकरवी काय लिहवीत होती नकळे. मध्येच व्रजकिशोरनी विचारले,“हे लिहिल्यानं काय होणार ?”

हरकाली दम भरून म्हणाली, “ नखभर देखील अक्कल असती तर असं विचारलं नसतं. मागंसुद्धा एकदा तुम्ही माझं ऐकलं नाहीं, म्हणूनच हे सगळं घडलं. आता पुन्हा कधीं कोणत्याहि गोष्टीत आपलं शहाणपण चालवूं नका !”

हरकाली जे जे सागत गेली ते सर्व व्रजकिशोरनी समजूत-दार मुलाप्रमाणे लिहिले. लिहिणे झाल्यावर हरकालीने त्याच्या

हातून कागद घेऊन साद्यंत वाचला, आणि मान हालवून ती म्हणाली, " बरं लिहिलंय ! "

भावडे व्रजकिशोर उगी राहिले. तिसऱ्या प्रहरी तो कागद घेऊन हरकाली सरयूकडे आली व म्हणाली, " सूनबाई, या कागदावर आपली सही कर पाहू. "

कागद हातीं घेऊन सरयूने हरकालीला विचारले, कशासाठी मामी ? "

" मी सांगते तसं करना, सूनबाई ! "

" मला हे देखील कळतां उपयोगी नाहीं की, याच्यावर मी सही का करावी ? "

हरकाली तोंड फुगवून म्हणाली, " मुली, तुझ्या हिताचच तर आहे हे सगळं. आता तूं इथं रहाणार नाहीस. मग तूं कुठं नि कशी आहेस याची चौकशी करायला काही आम्ही जात नाहीं. म्हणून तुला वाटेल तिथं वाटेल तशी रहा; तुझ्या खर्चासाठी दरमहा पांच रुपये मिळत जातील. वाईट का हे ? "

सरयूला आपले हिताहित कळत होते. या हितैषिणीच्या हृदयात आपल्या कल्याणाची इच्छा कितीशी आहे हे पण तिनें जाणले. परंतु ज्याच्या प्रासादाचा सज्जा कोसळून नदीत पडला आहे तो थोडेसे लाकूडसामान किंवा विटा—दगड वाचवण्यासाठीं नदीबरोबर जसा झगडूं इच्छित नाही, तसेच सरयूला वाटले. तरीहि तिने एकवेळ हरकालीकडे दृष्टि फेकली. हरकाली मनः-

पूर्वक जिचा तिटकारा करी, धाक बाळगी, ती हचि दृष्टि. आज देखील ती या दृष्टीला आपली दृष्टि भिडवूं शकली नाहीं. तिने खाली पहात म्हटले—सूनबाई !

" हं, सही करते द्या मामी. " सरयूनें टाक घेऊन त्या कागदावर स्पष्टपणे सही केली.

आज आश्विनातील द्वितीया. आजच सरयूचा जाण्याचा दिवस. पहाटेपासून मुसळधार पाऊस पडत होता. आजहि हिच्या जाण्यात विघ्न येते की काय अशी हरकालीला धास्ती वाटू लागली.

सरयू दिवसभर घरातील हरएक चीजवस्त जागच्या जागी ठेवत होती. मौल्यवान कपडे वगैरे तिने कपाटात बंद केले. दागदागिने लोखंडाच्या पेटीत ठेवून तिला कुलूप ठोकले. आणि मग नवऱ्याला बोलावण्यास माणूस पाठवून तिने विव्हळत जमिनीवर लोळण घेतली. गृहत्याग करण्याची वेळ जसजशी जवळ येत चालली तसतसा तिचा क्लेश असह्य होऊं लागला. ज्याप्रकारे गेले सात दिवस ढकलले तसाच आजचा दिवसहि ढकलेल असे तिला वाटेना. आज अंतिम दिवशी आपला धीर खचून जाताना मारूनझोडून घालवलेल्या भिकारणीसारखी आपली स्थिति होते कीं काय, अशी तिला भीति पडली. ज्या स्वाभिमानाचे आजपर्यंत प्राणापलीकडे तिने रक्षण केले होते त्याचा त्याग करण्यास तिचे मन सर्वतोपरी तयार होईना.

चन्द्रनाथ येताक्षणींच सरयू आसवे पुसून उठून बसली. ती म्हणाली, " या, आज माझा जाण्याचा दिवस. "

त्या वेळीहि तिच्या पापण्या ओल्या होत्या. चन्द्रनाथ दुसरीकडे पहात बसून राहिला. सरयूने त्याच्या जवळ जाऊन म्हटले, " ह्या चाव्या घ्या. दुसर लग्न करीपर्यंत कुणालाहि देऊं नका. "

चन्द्रनाथ दाटून आलेल्या गळयाने म्हणाला, "ठेव कुठं तरी."

सरयूने चन्द्रनाथला ओढून त्याचे तोंड आपल्याकडे फिरवले आणि ती सस्मित म्हणाली, " रडण्याचा प्रयत्न करत अहा होय ? "

हे बोलणे चन्द्रनाथला फार झोंबले. तत्क्षणींच त्याच्या डोळयातील आसवे पुसून सरयू आदरपूर्वक म्हणाली, " नीट आठवा, आजपर्यंत मी आपली थट्टा केलेली नाहीं, म्हणून आज जाता जाता थोडीशी थट्टा करून घेतली. रागवूं नका हं. "

ती पुन्हा म्हणाली, " जे काही होतं ते सगळं कपाटात बंद करून ठेवल. पहा, माझी एक देखील वस्तु हरवता कामा नये. "

चन्द्रनाथने पाहिले निराभरणा सरयूच्या हातात चार-पाच कांचेच्या बांगड्याशिवाय आणखी काहीहि नाही. सरयूच्या या मूर्तीं त्याच्या डोळयात शूळ खुपसला. पण तो काय बोलणार ? दोन दागिने घालून जा असे सांगून त्या देवतेचा

आज तो अपमान कसा करणार ? सरयूने डोक्यावरचा पदर माथ्यावर ओढून त्याला नमस्कार केला, त्याची पदधूळ माथ्याला लावली आणि ती म्हणाली, " माझ्या जाण्यामुळं निरर्थक कष्टी होऊ नका. आपलं यात काहीहि अंग नाही हे मी जाणते. "

चन्द्रनाथ अद्यापपर्यंत कसेतरी सहन करून उगी होता. पण आता त्याच्याने राहवेना, तेथून त्याने पळ काढला.

सध्याकाळपूर्वीच गाडी सुटते. स्टेशनवर गेले पाहिजे. पाऊस लागतो आहे. घरातील जुना कारभारी फडक्यात दोनएक चिरगुटे बाधून घेऊन कोचवानाशेजारी बसला. त्या वेळी सीतेची कथा त्याला आठवली. आणि त्याच्या डोळ्यातून आसवे ओघळूं लागली. आसवे पुसून तो स्वतःशीच म्हणाला,— " हे देवा, मी नोकर पडलो म्हणूनच का मला ही शिक्षा देत आहेस ? "

जानेवेळी सरयूने हरकालीचे मनोगत जाणून तिला बोलावले आणि नमस्कार केला. तिची पदधूळ माथ्याला लावून ती म्हणाली, " मामी, माझी ही पेटी तपासून घ्या. "

हरकाली काहीशी चकित झाली. म्हणाली, " छे छे, राहूं दे. "

इतक्यात पत्र्याची पेटी उघडी पडली व तिने हरकालीची दृष्टि आकर्षित करून घेतली. मोह आवरून धरणे तिला अशक्य होतें. तिरकस नजरेने तिने बघितले—पेटींत दोनएक जोडया

साधे कपडे, दोनतीन पुस्तके, कागदात गुंडाळलेले दोन फोटो आणि एकदोन अवांतर वस्तु होत्या. सरयू म्हणाली, " बस, एवढंच. "

हरकाली तेथून हळूच निसटली.

संध्याकाळपूर्वीच सरयू गाडीत जाऊन बसली. कोचवानने गाडी हाकली. गाडी फाटकाच्या बाहेर पडताच वेगाने धाऊं लागली. घराच्या दुसऱ्या मजल्यावरील खिडकी उघडून मणिशंकरनी हे सर्व पाहिले. आज एकाएकींच त्याना वाटले की, ठीक झाले नाही हे !

## ११

सारी रात्र मणिशंकरना नीज आली नाही. त्याच्या दोन्ही कानात धावणाऱ्या गाडीचा आवाज घुमत होता. पहाटेसच ते पलंगावरून उठून बाहेर आले. पहातात तर, पुढील दारी एक अत्यंत कंगाल वेशातील अनोळखी इसम डुलक्या घेत बसला आहे. ते जवळ जाताच तो उठून उभा राहिला व म्हणाला, " मी एक वाटसरू आहे. " मणिशंकर तेथून जाऊं लागले, तेव्हा त्याने मागून विचारले, "अहो, मणिशंकर बाबूंच घर हेच का ?"

त्यानी वळून म्हटले—" हो हेच. "

" त्याची केव्हा भेट होऊं शकेल ते आपण सांगूं शकता काय ? "

" माझंच नाव मणिशंकर. "

गोंधळून नमस्कार करत तो म्हणाला, " मी आपल्याकडेच आलो आहे."

मणिशंकरनी त्याला नखशिखान्त न्याहाळून विचारले, " तूं काशीहून आलास काय ? "

" हो. "

" हरिदयाळनं पाठवलं का ? "

" होय. "

" रुपयासाठीं आलास ? "

" होय, होय ! "

मणिशंकर हंसून विचारतात, " मग माझ्याकडे कशाला ? तुला काय वाटलं मीच रुपये देणार ? "

त्या इसमाने मान हालवून म्हटले, " छे, हरिदयाळनी सांगितलं आहे की, आपण मला रुपये मिळण्याची व्यवस्था करून घाल. "

कपाळाला आठ्या घालून मणिशंकर उत्तरले, " बरं, मी करतो व्यवथा. आत ये. "

दोघेजणहि एका खोलींत जाऊन दार बंद करून बसले. मणिशंकरनी विचारले, " मग काय, ते सगळं अगदी खरं ?"

" हो, सगळं खरं. "

असे म्हणून त्या इसमाने पुष्कळशी पत्रें काढलीं. मणिशं-

करनी ती सगळीं समग्र वाचून म्हटले, " पण यात सुनेचा काय दोष ? "

" छे, तिचा दोष नाही. परंतु आईच्या दोषामुळं मुलगीहि दूषित झाली आहे. "

"परंतु जी स्वत: दोषी नाही तिला विपत्तीत का ढकलतोस ?"

" काय करूं, दुसरा उपायच नाही. पैशासाठी सगळं काही करणं भाग पडतं ! "

मणिशंकरनी थोडावेळ विचार करून म्हटले, " हे बघ बाबा, प्रस्तुत गोष्ट जगभर पसरली तर माझी फार नाचक्की होईल. चन्द्रनाथ माझा पुतण्या. "

राखालदास मान हालवून खंबीरपणे म्हणाला, " माझा त्याला निरुपाय ! "

" हे तर तुझ्या चर्येवरूनच दिसतं. बर, समज मी स्वत: तुला रुपये दिले तर कसं काय ? "

" फारच उत्तम. मग चन्द्रनाथकडे जाण्याची मला तसदी पडणार नाहीं. "

" पण रुपये हातीं पडताच गाव सोडून जाशील नि कुणापाशी ही गोष्ट बोलणार नाहीस इतकं निश्चित ना ? "

" हो, निश्चित. "

" किती रुपये पाहिजेत ? "

" निदान दोन हजार ! "

मणिशंकरनी बाहेर येऊन आपला कारभारी लक्ष्मीनारायण यास बोलावले आणि दोनतीन गोष्टी सांगितल्या. नंतर पुन्हा आत जाऊन त्यानी पेटी उघडली व तिच्यातून हजारा हजाराच्या दोन नोटा काढून त्या राखालदासच्या हातावर ठेवीत म्हटले, "इथून दहा कोसावर सरकारी तिजोरी आहे. तिथंच जाऊन या नोटा मोड. आणखी कुठं मोडूं शकणार नाहींत. आणि परत कधींहि या बाजूला फिरकूं नकोस. तुझ्यावर माझी मर्जी नाहीं, म्हणून पुन्हा कधींहि इकडच्या बाजूला येण्याची गोष्ट काढलीस तर माघारा जिवत जाणार नाहीस. अगोदरच बजावून ठेवतो."

राखालदास चालता झाला. धावतपळत तिसऱ्या प्रहरीं शहरामध्ये जाऊन पोचला. त्या वेळीं तिजोरी बंद होती, म्हणून याचे काम होऊं शकले नाही. दुसरे दिवशी अगदीं वेळेवर तिजोरीत जाऊन राखालदासने त्या दोन्ही नोटा खजीनदारास दिल्या व म्हटले, "मला याचे सुटे रुपये पाहिजेत."

खजीनदाराने त्या दोन्ही नोटा उलटसुलट करून पाहिल्या आणि त्याला बसण्यास सांगितले. नंतर तो बाहेर जाऊन फौजदाराला घेऊन आला. राखालदासकडे बोट दाखवून तो म्हणाला, "या चोरीच्या नोटा आहेत. जमीनदार मणिशंकर बाबूंचा माणूस सांगतो कीं, काल सकाळी एक इसम भीक मागण्याच्या

मिषाने त्याच्या वाड्यात शिरला आणि नोटा चोरून पळाला. नोटाचे नंबर जुळतात. ”

राखालदास म्हणाला, “ मला या नोटा खुद्द मणिशंकरनीच तर दिल्या ! ”

खजीनदार उत्तरला, “ बरं, हे कोर्टात जाऊन सांग. ”

राखालदास पोलीसअधिकाऱ्याला म्हणाला, “ या नोटा ज्याच्या आहेत त्याना विचारल तर सगळ्या गोष्टीचा खुलासा होईल. ”

ज्या दिवशी मुन्सफ-कोर्टात खटला सुनावणीस निघाला त्या दिवशी मणिशंकरनी तेथे येऊन शपथेवर सांगितले की, आपण जन्मात आजपर्यंत या माणसाला पाहिलेले नाहीं. या दोन्ही नोटा आपल्याच पेटीत होत्या, आपण कुणाला दिल्या नाहीत. राखालने आपल्या बचावासाठी बऱ्याच गोष्टी सादर केल्या. त्यापैकी काही कोर्टाने लिहून घेतल्या; आणि काही मणिशंकरच्या वकीलाने धुडकावून लावल्या. तात्पर्य, राखालच्या बोलण्यावर कोणीहि विश्वास ठेवला नाहीं. कोर्टाने त्याला दोन वर्षे सक्त-मजूरीची सजा ठोठावली !

## १२

हरिदयाळच्या घरात आता जुनी दासी देखील राहिली नव्हती. ब्राह्मणबाई तर बेपत्ताच. सरयूने त्या घरी प्रवेश केला तेव्हा तेथे कोणीहि नव्हते. सारे घर खायला आल्यासारखे

भासलें. चन्द्रनाथच्या कारभाऱ्याने रडत रडत विचारले, "बरं, मी जाऊंना ?"

सरयू त्याला नमस्कार करून मान खाली घालून उभी राहिली. कारभारी तसाच आसवे ढाळीत गेला—हरिदयाळ घरी येईपर्यंतसुद्धा तो थांबू शकला नाही—त्याला इच्छाहि नव्हती.

सध्याकाळी हरिदयाळ घरी परत आले. दालनात सरयू बसली होती तिला पाहून त्यांनी विचारले,—कोण ?

सरयू नमस्कार करून उभी राहिली. तिने म्हटले—मी.

हरि०—सरयू ?

हरिदयाळ अचंबित होऊन पहातात तर सरयूच्या अंगावर एकहि दागिना नाही. ती नेसलेली साडी अगदीच साधी. तिच्या सोबत नोकरचाकर कोणी नाही. जवळच एक लहानशी पेटी मात्र पडली होती. सगळे कांहीं त्याच्या ध्यानी आले. तोंड वेंगाडून ते म्हणाले, " जे समजत होतो तेच झालं. त्यांनी हाकून लावलंना ? "

सरयू अगदी गप्प राहिली. तिने काहीच उत्तर दिले नाहीं.

तेव्हा हरिदयाळ अत्यंत कर्कश स्वरात म्हणाले, " आता तुला इथं रहाता येणार नाही. एकदा आश्रय देऊन चांगला धडा शिकलो आहे. बस, आता आणखी नाहीं. "

सरयूने खालच्या मानेने विचारले, " आई कुठं ? "

" थेरडी गेली पळून. मला आपत्तींत ढकलून निसटली. जसं तिचं शील तशीच तिची चालचलणूक. "

क्रोधभराने हरिदयाळच्या अंगाचा तिळपापड झाला. त्यानी एकदम टोमणा मारला—" मला नाही माहीत कुठ गेली. असेल कुठंतरी मजा करत ! "

सरयूने तेथेच थबकण मारली. अखेर ती आपल्या आईपाशी म्हणून परत आली होती.

हरिदयाळ सांगूं लागले, " तुला आपल्या घरात थारा देऊन मी स्वतःची जात गमावूं इच्छित नाही. तुला जो इतक्या आदराने घेऊन गेला होता तो शेवटी रहाण्यासाठी एक झोपडी देखील बांधून देऊं शकला नाहीं; म्हणूनच आमच्याकडं पाठवून दिली वाटतं ? तूं चालती हो येथून. "

तेव्हा सरयूला रडे कोसळले. ती रडत रडत म्हणाली, " दादा, आई नाही, मग जाऊ कुठं ? "

पण हरिदयाळमध्ये आता माया-ममता उरली नव्हती. त्यानी साफ सांगितले—" काशीसारख्या नगरीत जागा मिळणं कठीण नाही. तुला सोईवार अशी वाटेल ती जागा शोधून काढ. "

हरिदयाळ त्या वेळी भडकले होते म्हणूनच असे बोलूं शकले.

सरयू पक्के समजून चुकली कीं, नवऱ्यानेच जर आपल्याला घरात रहाण्यास जागा दिली नाही तर हरिदयाळ का देतील ?

अर्थात् याबद्दल त्याना कोणत्याहि प्रकारे दोप देता येत नाहीं. पण तिला उभे रहाण्यासहि कुठे ठिकाण नव्हते. पतिगृही तर ती थोड्या दिवसासाठीं पाहुण्याप्रमाणे गेली होती, ती आज तिकडचा निरोप घेऊन परत आली. तिचे आदरातिथ्य करणारा सद्‌गृहस्थ या जगांत आपला अतिथि कुठे गेला तें आता ढुकूनहि पहाणार नाही. या वेळीं तिला होणाऱ्या मानसिक यातनामुळे तिच्या डोळ्यातून अश्रूंची संततधार सुरू झाली. या सोळा वर्षांच्या वयातच तिच्या साऱ्या हौशी फिटल्या होत्या. आई नाहीं, बाप नाहीं, नवऱ्याने टाकलेले. उभे रहाण्यास कुठे ठिकाण नाहीं. आहे केवळ कलंक, लज्जा आणि विपूल रूप-यौवन. ते घेऊन जिवंत रहाता येईल, पण सरयूला ते अशक्य. आपलें वय काय व आणखी किती आयुष्य उरलें याचाच ती विचार करीत होती. कितीहि असो, परंतु आज जणूं नूतन जन्म-दिन होता तिचा. बाळपणीच तिने फार कष्ट-क्लेश झेलले होते, तरी इतका भारी अपमान नि दुर्लौकिक कधीं तिला भोगावा लागला होता काय ? हरिदयाळ उत्तरोत्तर उर्मटपणे बोलूं लागले. आता तर कडाडलेच—“ तूं अजून इथं कशाला बसली आहेस ? ”

सरयूने अत्यंत व्याकूळ होऊन विचारले, “ कुठ जाऊं ? ”

“ मला काय माहीत ? ”

दाटून आलेल्या कंठस्वरानें सरयू म्हणाली, " दादा, आजची रात्र—"

" चल्, चालती हो. क्षणभरहि इथं राहूं नकोस ! "

सरयू उठून उभी राहिली. आता तिच्यात जरा धैर्य उत्पन्न झाले. तिने विचार केला—शेकडो अपराधाच्या क्षमेची ज्याच्याकडे भीक मागण्याचा हक्क होता त्याच्याकडे मी भीक मागितली नाही, मग दुसऱ्याकडे का मागूं ? मनातल्या मनात ती म्हणाली—आणखी काहीं नसलं तरी काशीची गंगा अजून कोरडी पडलेली नाहीं. आणि ती समाजालाहि भीत नाहीं कीं तिची जातहि बुडत नाही. ती एका दुःखी अबलेला अशा संकटप्रसंगी खुशाल आपल्या पोटांत घेईल. मला आणखी कुठं आश्रय मिळणार नसेल तर न मिळो. तिथं अवश्य मिळेल !

सरयूला तेथून जावेंसे वाटले, पण हालवेना. ती पुन्हा बसली.

हरिदयाळजींच्या मनात विचार डोकावला—उभ्या आयुष्यात कधींहि अशा विपत्तीमध्यें पडलो नाही आपण. त्याच्या घशाला कोरड पडत चालली. वाचा बंद होईल या आशंकेने ते जोर करून ओरडले, " हांकलल्यावांचून तूं जाणार नाहीस असं दिसतं ! हो चालती. "

इतक्यात एकाएकीं बाहेरून हांक ऐकूं आली—बाबाजी !

हरिदयाळ गडबडले. बहुतेक कैलासकाका आलेसे वाटते.

तत्क्षणीच एका हातात बुद्धिबळाची पोटली व दुसऱ्या हातात गुडगुडी घेऊन कैलासचन्द्रांनी घरामध्ये प्रवेश केला. ते एकदम आत आले नव्हते. बराच वेळ बाहेर उभे राहून हरिदयाळचे धिक्कारणे नि शिव्या-गाळी ऐकत होते. म्हणूनच ते आले तेव्हा त्याच्या हातात बुद्धिबळाची पोटली व गुडगुडी होती तरी चर्येवर हास्य दिसले नाही. ते सरळ सरयूपाशी जाऊन उभे राहिले आणि म्हणाले, " सरयू, कधीं आलीस आई ? "

सरयूने कैलासना ओळखून नमस्कार केला.

कैलासनी आशीर्वाद देऊन म्हटले, " चल आई, चल. आपल्या या मुलाकडे न येता इथं कशाला आलीस, आई ? " इतके बोलून कैलासचन्द्रांनी हातातील गुडगुडी खाली ठेवली आणि सरयूची पेटी बगलेत मारून ते म्हणाले, " चल आई, साज होत आहे. " कैलासचन्द्र हे अशा रीतीने बोलून गेले की, जणूं तिला नेण्यासाठीच ते आले आहेत.

सरयूच्या काहीच लक्षात येईना. ती उगी बसून राहिली.

कैलासनी पुन्हा म्हटले, " तुला आपल्या वृद्ध मुलाच्या घरी चलण्यास लाज का वाटावी ? माझ्या घरी तुला कुणीहि अपमानकारक बोलणार नाही. आम्ही दोघंहि माय-लेक सुखानं राहूं ! चल आई, उशीर करूं नकोस. "

तथापि सरयू उठू शकली नाहीं.

हरिदयाळनी ओरडून विचारले, " काका, करता काय ?"

" काहीं नाही, बाबाजी " असे म्हणून कैलास सरयूच्या अगदी जवळ आले. तिचा हात धरण्याच्या बेतात ते आहेत असे दिसले. त्यानीं अत्यंत व्याकुळ होऊन म्हटले, " चलना आई, ऊठ. अपशब्द ऐकत इथं उगाच कशाला बसून राहिली आहेस ? "

सरयू उठून उभी राहिलेली पाहून हरिदयाळ कैलासना विचारतात, " काका, हिला तुम्ही आपल्या घरीं नेणार का ? "

कैलासनी उत्तर दिले, " हे बाबा, हिला रस्त्यावर बसव-ण्यास नेतो आहे ! "

हा टोमणा ऐकताच हरिदयाळनी चिडून म्हटले, " पण काका, हे बरं करत नाही तुम्ही. पुढं काय होईल याचा जरा विचार करा. "

कैलासचन्द्रानी हरिदयाळला मुळींच उत्तर न देता सरयूस म्हटले, " लवकर चलना आई. नपेक्षा हा आणखी काय बोलेल याचा नेम नाहीं. "

सरयू घराबाहेर पडली. कैलासचन्द्रहि खांद्यावर पेटी उचलून तिच्या पाठोपाठ चालूं लागले.

हरिदयाळनी मागून विचारलें, " काका, शेवटी तुम्ही देखील आपली जात सोडणारना ? "

कैलास पाठी न वळता उत्तरले, " होय बाबा, तूं घेत असलास तर देऊं शकतो ! "

" आजपासून तुमचा-आमचा अन्नोदकव्यवहार आटोपला म्हणायचा ? "

आता मात्र कैलासचन्द्र मागे वळून उभे राहिले, आणि म्हणाले, " दयाळ, कधी कुणाच्या तरी घरीं कैलासकाका पानं चाटायला गेला आहे ? "

" नसाल गेला, तरी पण मी तुम्हाला सावध करतो. "

कैलासाच्या कपाळाला आठ्या पडल्या. इतकीं वर्षे ते काशीत रहात आहेत, पण आजच प्रथम रागवताना दिसले. ते म्हणाले, " हरिदयाळ, यात्रेकरू यजमानाना संतुष्ट करून उदरनिर्वाह करणारा मी काय काशीतील पंड्या आहे ? मला तूं भीति कसली दाखवतोस ? मला जे योग्य वाटलं तेच आजपर्यंत मी करत आलो व अजूनहि जे योग्य दिसेल तें करणार ! त्याची तुला काळजी नको. "

हरिदयाळ काहीसे खिन्न होऊन म्हणाले," मी तर तुमच्याच भल्यासाठी—"

" राहूं दे बाबा. जर गेली पंचावन्न वर्षे तुझी सल्लामसलत घेतल्यावाचून मी काढली, तर बाकी उरलेलीं दोन-चार वर्षे पण मला काढता येतील. जा बाबा, घरात जा. "

हरिदयाळ परतले.

आपल्या घरी पोंचताच कैलासचन्द्रांनी पेटी खालीं ठेवून अगदी सहजरीत्या म्हटले, " आई, हे सगळं घरदार तुझं,

आणि मी तुझा मुलगा. या म्हाताऱ्याकडे जरा लक्ष असू दे. बाकी सगळा संसार तूं चालव. यापरतं आणखी काय सागू ? ”

कैलासना आणखी काही सांगावयाचे होते की काय नकळे. परंतु सरयूने खूप वेळपर्यंत आसवे पुसत पुसत विचारपूर्वक ठरवले की, आपल्याला तर आणखी काहीच सागावयाचे नाही.

सरयूला आसरा मिळाला.

## १३

शरद् ऋतूंतील प्रात:कालीन स्निग्ध-सुगंधित वायुलहरी चन्द्र-नाथच्या खोलीतून खेळत तेव्हा, सारी रात्र जागून काढल्यामुळें त्याला झोप येई. आणि मग कोवळे सूर्यकिरण त्याच्या तोंडावर पडले की, त्याची झोप उडे. परंतु झोपेचा भर कोणत्याही प्रकारे ओसरत नसे. त्याच्या पापण्या मिटू पहात. तरी तो बळेच बिछान्यातून उठून बाहेर येई. सबंध दिवस काही काम-धंदा नाही, करमणुकीच्या साधनाचा अभाव, उत्साहाचे वावडे कष्ट किंवा क्लेश बहुतेक नसल्यासारखेच आणि सुखाची इच्छा तर साफ सोडून दिलेली. ज्याप्रमाणे एकाद्या शीर्णकाया नदींतून मोठी थोरली ओझ्यानें लादलेली नाव इकडून तिकडे हेलकावे खात, वाकडीतिकडी होत संथपणे जात असते, त्याप्रमाणें त्याचे दिवस एका सूर्योदयापासून दुसऱ्या सूर्योदयापर्यंत ढकलूं लागले. चहूं दिशाना पसरलेल्या काळ्या ढगानीं आपल्या सुखजीवन सूर्याला मध्यान्हींच लोपून टाकलें

असून त्याच ढगाआड एक दिवस तो अस्त पावणार, या जन्मी पुन्हा कधी त्याचे दर्शन होणार नाही, हे त्याला पक्के कळून चुकले. त्याच्या नीरव निर्जन वाड्यातील निराशेची काळी छाया दिवसेदिवस अधिकाधिक निबिड होत चालली. आणि तो तेथे बसल्या बसल्या आळसाने डोळे मिटून काळ कढू लागला.

हरकाली म्हणत होती की, येत्या आषाढात चन्द्रनाथचे दुसरे लग्न करूं. पण चन्द्रनाथ अगदी उगी राही. त्याचे हे मौन संमतिसूचक कीं असंमतिसूचक याचा निर्णय लावण्या-साठी आपल्या नवऱ्याबरोबर ती तर्क-वितर्क करत बसे. मणिशंकरना विचारले तर ते म्हणत, चन्द्रनाथच्या अनुमति-वाचून या बाबतीत काहीच बोलता येत नाही.

यंदा कार्तिकात दुर्गापूजा होती. मणिशंकरबाबूंच्या दिवाण-खान्यातून निघणारे सनईचे सूर प्रातःकाळपासूनच ग्रामवासियाना आनंदोत्सवाची वार्ता पोचवीत होते. चन्द्रनाथची झोप उडाली. डोळे मिटून बिछान्यावर पडल्या पडल्याच सनईतून निघणारे सूर तो ऐकत होता. परंतु त्यापैकी एकाहि सुराने त्याला सुखविले नाहीं. उलट हळू हळू निबिड काळ्या मेघाची छाया त्याच्या हृदयाकाशाला व्यापूं लागली. आता आपल्याच्याने येथे राहवणार नाहीं असे एकाएकीं प्रथम आजच त्याला वाटलें. एक:

नोकरास बोलावून तो म्हणाला, " माझं सामानसुमान बांध. मी आजच अलाहाबादला जाणार. "

हरकालीला ही खबर कळली तेव्हा ती धावतच आली. व्रजकिशोरहि येऊन त्याची समजूत घालूं लागले. इतकेंच नव्हे, स्वत: मणिशंकरनी येऊन त्याला आग्रहपूर्वक सांगितले की, आज षष्ठीच्या दिवशी घरातून जाणे योग्य नाही.

पण चन्द्रनाथने कुणाचेंच ऐकले नाही.

दुपारी हरिबाला आली. सरयू गेल्यापासून ती आली नव्हती.

चन्द्रनाथ तिला पाहून म्हणाला, " आजी, आज अचानक तूं कशी आलीस ? "

त्याच्या प्रश्नाचे उत्तर न देता हरिबालेनें विचारले, "आज कुठं बाहेरगावीं चाललास का ? "

" हो. "

" पश्चिमप्रांती जाणार ? "

" होय. "

हरिबालेने कसला तरी विचार करून प्रश्न केला, "म्हणजे आणखीहि कुठं जाणार आहेस का ? "

हरिबालेचा रोख ओळखून चन्द्रनाथ म्हणाला, " छे!"

जे काहीं सांगायला हरिबाला आली होती ते सांगण्यास तिला लाज वाटूं लागली आणि धीरहि होईना. तरी पण जरा

वेळ उगी राहून उसनें धैर्य आणून ती म्हणाली, "का बाबा, तिची तूं काही व्यवस्था केली नाहीस ?"

हरिबाला आल्यापासून चन्द्रनाथ नि हरिबाला या दोघाच्याहि मनात सरयूविषयीचा विचार चालू होता. त्यामुळेच या लहानशा गोष्टीवरूनहि त्या दोघाचे डोळे भरून आले. स्वतःला आवरून दुसरीकडे पहात चन्द्रनाथ म्हणाला, "व्यवस्था ती आणखी काय करणार, आजी ?"

" काशीत ती आहे कुणाजवळ ?"

" मला वाटतं, आपल्या आईजवळ असावी."

" असेल, पण—"

चन्द्रनाथने तिच्याकडे पहात विचारले, " पण काय ?"

हरिबाला किंचित् उगी राहून मृदु स्वराने म्हणाली, "बाबा, रागवू नकोस—"

चन्द्रनाथ गुपचुप तिच्याकडे पाहूं लागला.

हरिबाला पूर्ववत् विनयी मृदु स्वराने म्हणाली, "बाबा, तिला काही खर्चाला पाठवत जा. सध्या तर ती एकटीच आहे. परंतु चार दिवसानी—"

ते उमजूनहि जणूं न उमजल्याप्रमाणे चन्द्रनाथने विचारलें, " चार दिवसानी काय ?"

चन्द्रनाथसमोर आपल्या डोळ्यातील दोन मोठाली टिपें पुसत ती म्हणाली, " तिच्या गर्भात जे आहे, देव करो नि तें वाचो-जगो, मग—"

चन्द्रनाथ नखशिखान्त रोमांचित झाला! त्याने चट्दिशी म्हटले, " आजी, षष्ठी का आज ?"

" हो बाबा."

" तर मग, आज—"

" नाहीस जात ?"

" असंच म्हणतो."

" चांगली गोष्ट. असंच कर. पूजा संपली कीं मग मनाला येईल तिकडे जा. तूर्त दोन-चार दिवस घरीच रहा."

कोण जाणे कसे चन्द्रनाथनें तिचे ऐकले.

दुर्गापूजा झाल्यावर एके दिवशीं चन्द्रनाथने आपल्या कारभाऱ्यास बोलावून विचारलें, "सरकार महाशय, तिला काशीत पोचवून आलात तेव्हा हरिदयाळना कांही म्हणाला का ?"

कारभाऱ्याने उत्तर दिले, " त्याची भेटच झाली नाही."

जणूं भीत भीतच चन्द्रनाथने विचारले, "भेट झाली नाही ? मग तिला कुणाकडे सोडून आलात ? तिची आई तरी भेटली होती ?"

मान हालवून कारभारी म्हणाला, " नाहीं, त्या वेळी घरात कुणीच नव्हतं."

" कुणीच नव्हतं ? त्या घरात कुणी रहातात किंवा नाहीं

याची तरी चौकशी केलेत ? हरिदयाळ ते घर सोडून दुसऱ्या घरात रहायला जाणे पण शक्य आहे. ”

कारभारी म्हणाला, “तेवढी चौकशी केली. दयाळ घोषाल तेथंच रहातात. ”

चन्द्रनाथ निश्वास सोडून थोडा वेळ उगी राहिला. मग पुन्हा विचारतो, “ आतापर्यंत किती रुपये पाठवलेत ? ”

“ रुपये वगैरे मी काहींच पाठवलेलं नाही. ”

विस्मय, वेदना नि उत्कंठा यानीं गोरेमोरे होऊन चन्द्रनाथने विचारले, “ का ? ”

कारभारी फारच ओशाळून म्हणाला, “ मामानी सागितलं होतं की, महिना पाच रुपये पाठवले म्हणजे पुरे. ”

हे उत्तर ऐकताच चन्द्रनाथच्या अंगाची लाही लाही झाली. तो म्हणाला, “ महिना पाच रुपये का ? पैसा काय मामाचा आहे ? आता काशीच्या पत्त्यावर दरमहा पाचशे रुपये पाठवत चला ! ”

“ जी आज्ञा ” म्हणून कारभारी काहीसा चकित् होत्साता चालता झाला.

ही हकीकत हरकालीने ऐकली तेव्हा तिने कपाळाला आठ्या घालून म्हटले, “ त्याला खूळ लागलंय ! ”

तिने कारभाऱ्याला बोलावून आणले व आडूनच ती खदखदा हंसली. कारभाऱ्याने तिच्या हंसण्याचा रोख ओळखला.

हरकालीने विचारले, " सरकार महाशय, किती रुपये पाठवायला सागितले हो ? "

" महिना पाचशे. "

आतून पुन्हा व्यंगोक्तिपूर्ण हास्यध्वनि ऐकूं येताच कारभारी गोंधळला. खूप वेळ हंसून झाल्यावर हरकाली गंभीरपणे म्हणाली, " आमच्या बाळाला राग आला की, काही सुचत नाही मग. त्या अभागिनीचं नशीबच असं. मी दरमहा पाच रुपये देण्यास सागितलं म्हणून तो रागवलाय. तरीच तुम्हाला तो म्हणाला कीं, दरमहा पाचशे रुपये पाठवा! सरकार महाशय, समजलं ना मी काय म्हणते ते ? चन्द्रनाथ तिला एक पै देखील पाठवूं इच्छित नाही ! "

प्रथम ही गोष्ट कारभाऱ्याच्या नीटशी लक्षात आली नाहीं. पण जो जो आपल्या मनाशीं तो विचार करूं लागला तो तो त्याला असेच वाटले की, हरकालीचे म्हणणे रास्त आहे. जिला घराबाहेर हाकून लावण्यात आले, तिला इतके रुपये स्वेच्छापूर्वक कोण देईल ?

पुष्कळ विचार केल्यावर कारभारी म्हणाला, " मग आपण सागाल तसं करतो. "

" आणखी काय सागूं मी ? तुम्हाला इतकी क्षुल्लक गोष्ट देखील समजूं नये ? "

कारभारी चकित होऊन उत्तरला, " असंच करतो. "

" ह तसंच करा. आपण तिला महिना पाच रुपये पाठवत जा. चन्द्रनाथने दिले नाही, तर माझ्या हिशोबातून पाच रुपये पाठवा. "

हरकालीला दरमहा पन्नास रुपये चालू खर्चासाठी मिळत.

कारभारी चलता चलता म्हणाला, " बरं, पाठवत जाईन. "

चन्द्रनाथ घरी नव्हता. अलाहाबादेस गेला होता. कारभाऱ्याला अगोदर वाटले की, चन्द्रनाथला पत्राने विचारावें; परंतु त्याने पुन्हा विचार केला, अशक्य अशा बाबीसंबंधी निरर्थक पत्रव्यवहार करून आपला मूर्खपणा दाखविण्यात हाशील काय ?

## १४

उपरोक्त गोष्टीला दोन वर्षे झाली. या दोन वर्षात इतर काही परिवर्तन घडले असो वा नसो, पण कैलासकाकांच्या जीवनात फार मोठे परिवर्तन घडून आले. ज्या दिवशीं त्याचा कमल गेला, त्याच्या कमलचरणने ज्या दिवशी अंतिम उच्छ्वास घेऊन डोळे मिटले, त्या दिवशी कैलासचन्द्राच्यामते विशाल विश्वानेच डोळे मिटले. परंतु सरयूच्या लहानग्या बाळाने त्याना पुनरपि या जगातील स्नेहमय जटिल मार्गावर आणून सोडले. दीर्घ कालानंतर त्या दिवशीं त्यांचे लहानसे डोळे अश्रूंनी भरून गेले. डोळे पुसत ते म्हणाले, " आमच्या घरीं विश्वेश्वर आलेत. " अजून तो फार लहान होता. ' विशू ' म्हणून त्याला

कोणी हांक मारली तर तो ओ देऊं शकत नसे; पण पहात मात्र राही. अद्यापपर्यंत तो सरयूच्या किंवा लखियाच्या आईच्या कडेवर, नाहीतर अंथरुणात पडून असे. परंतु ज्या दिवशी आपल्या चंचल पायानीं उंबरठा ओलांडण्यास तो शिकला, त्या दिवशी त्याला समजून आले की, दुधापेक्षा पाणीच चागले! हे समजल्यापासून स्वच्छ नि अस्वच्छ अशा सर्व प्रकारच्या भाड्याना निःशंकपणे तोंड लावून, सरयूला चकवून, तो यथास्थित पाणी पिऊं लागला. त्याच दिवसापासून त्याला पक्के माहीत झाले की, आपल्या शुभ्र मृदु पोटावर नि चेहऱ्यावर कोळशाची पूड किंवा धूळ माखली तर शरीराची शोभा फारच खुलते. आणि त्याच दिवसापासून त्याने सरयूच्या कडेवर बसण्याचे सोडून कैलासचन्द्राच्या कडेवर कायमचे आसन पटकावले. सकाळी कैलासचन्द्र हाक मारत—विशू! तोंड बाहेर काढून विशू म्हणे—दादू! कैलासचन्द्र म्हणत, "चल दादा, शंभू मिश्राबरोबर डाव खेळून येऊं." चट्दिशीं बुद्धिबळाची पोटली हातात घेऊन विशू बोले—"तला!" आणि दोन्ही बाहू पसरून कैलासचन्द्राच्या गळ्याला तो घट्ट मिठी मारी. त्या वेळी कैलासचन्द्राना फार आनंद होई. सरयूला हाक मारून ते म्हणत, "आई, आमचा विशू पक्का खेळणारा होणार बरं!" सरयू गालातल्या गालात हंसायची. विशू हातात बुद्धिबळाची पोटली घेऊन वृद्ध कैलासचन्द्राच्या कडेवर बसून

खेळण्यासाठी बाहेर जाई. वाटेत कुणीतरी थट्टेने विचारी, “ काका, म्हातारपणी तुम्हाला आणखी हे दोन हात फुटले का ?”

म्हातारा गालातल्या गालात हंसून म्हणे, “ होय बाबा, माझ्या दोन्ही हातात आता ताकद राहिली नाही. अगदी सुकून गेले. म्हणूनच हे दोन नवे हात फुटले. त्यामुळं संसार-वृक्षावरून खाली पडायला होणार नाही ! ”

“ म्हाताऱ्याला बोलण्यात कुणी हरवूं शकणार नाहीं. ” असे म्हणत तो मनुष्य चालता होई.

शंभू मिश्राच्या घरी बुद्धिबळानी खेळण्याच्या बैठकीत श्रीमान् विश्वेश्वरलाहि एक जागा ठरलेली होती. आजोबाच्या मांडीवर बसून लाल रंगाचे झबले हालवीत तो गंभीरपणे पहात राही. जणूं वेळ आली तर एकाद दुसरा डाव दाखवण्यास तो तयार असे.

आपले आजोबा एकेक करून हस्तिदंती मोहरे मारूं लागले की, विश्वेश्वर मोठ्या उत्साहाने त्या मोहऱ्याना दोन्ही हातानी पोटाशी घट्ट कवटाळी. त्याचे सगळयात अधिक लक्ष लाल रंगाच्या वजीरावर असे. वजीर हाती येईपर्यंत तो आतुरतेने त्याच्याकडे पहात राही. अधूनमधून त्याची मागणी करून म्हणे, “ दादू, तो ! तो ! ” खेळण्याच्या नादात अन्यमनस्क होऊन कैलासचन्द्र म्हणत, “ थाब दादा ! ” कधी कधी तो इकडे तिकडे सरके तेव्हा कैलासचन्द्राचे लक्ष मध्येच त्याच्या-

कडे तर मध्येच खेळाकडे गेल्यामुळे त्या गडबडीत त्याचा एकादा मोहरा मारला जाई. मग कैलासचन्द्र मागे वळून म्हणत, "ये दादा, आम्ही हरत आहो बघ. येना, पळत ये." विश्वेश्वर दुडदुड धावत येई आणि पुन्हा आपल्या जागेवर बसे. त्याबरोबर म्हाताऱ्याचा उत्साह द्विगुणित होत असे. खेळ आटोपला की, लाल रंगाचा वजीर हातात घेऊन आजोबाच्या कडेवर बसून तो घरी येई.

अशा अभिनव प्रकारे कैलासचन्द्राचे दिवस जाऊं लागले. आणि त्याच्या जुन्या नियमात खड पडत चालला. पहिल्याप्रमाणे बुद्धिबळाच्या पोटलीची ते इतकी फिकीर करीनात. आता ती घरातील एका कोन्यात बहुधा पडलेली असायची. शंभू मिश्रला रोज सकाळी भेटण्यास त्याना सवड होईना. गंगा पाडे-बरोबर दुपारचे खेळणे बहुतेक बदच झाले होते. संध्याकाळीं मुकुंद घोषच्या बैठकींतहि पूर्वीप्रमाणे मंडळी जमेना. मुकुंद घोष बोलावून बोलावून थकला. पण कैलासचन्द्र काहीं केल्या रात्रीच्या वेळीं त्याना भेटूं शकेनात. त्या वेळीं ते दिव्याच्या उजेडात बसून आपल्या नव्या शिष्याला बुद्धिबळानीं खेळण्यास शिकवत. ते म्हणत, "विशू घोडा अडीच घरं चालतो."

विशू गभीरपणे म्हणायचा—"घोला !"

"हं घोडा."

"घोला तालवूं ?"

" हं, घोडा चालव. अडीच घरं चालव."

विश्वेश्वराच्या मनात निराळाच विचार येई. तो म्हणे, " गाली पन ताल्वूं ?"

कैलासचन्द्र हताश होऊन प्रतिवाद करत, " छे दादा, हा घोडा गाडी ओढत नाही! तो घोडा वेगळा."

त्या वेळी सरयू जवळ असली तर, आपल्या चिरंजीवाची तीव्र बुद्धि पाहून तोडाला पदर लावून हंसत चालती होई.

विशू आपल्या इवल्याशा बोटाने संकेत करून म्हणे—तो! म्हणजे तो लाल रंगाचा वजीर मला द्या. वृद्ध कैलासचन्द्राना कळेना की, इतक्या सगळ्या वस्तु असता लाल रंगाच्या वजीरावरच याचं एवढं लक्ष का?

पण विशूची मागणी कोणत्याहि प्रकारे अमान्य होणे शक्य नव्हते. कैलासचन्द्र प्रथम दोन-तीन फालतू मोहरे देऊन त्याला भुरळ पाडण्याचा प्रयत्न करत. पण विशू चलाख, तो नसे फसत. त्या वेळीं इच्छा नसूनहि त्याने मागितलेली वस्तु त्याच्या चिमुकल्या हातात देऊन ते म्हणत, " बघ कुठं हरवूं नकोस हं, दादा."

" का?"

" वजीर हरवला तर कुठं खेळ होऊं शकतो?"

" नाही होत?"

" छे, मुळींच नाही."

विशू गंभीरपणे म्हणायचा, " दादू, वजील ? "

" हो दादा, वजीर ! "

एक दिवस भोलानाथच्या घरी कथा होती. कैलासचन्द्र म्हणाले, " विशू, चल दादा, कथा ऐकून येऊं. " विशू पचा पैरण घालून, कपाळाला तीट लावून, केस विंचरून, 'दादू'च्या कडेवर बसून कथा ऐकण्यास गेला. कथेकरी बुवानी राजा भरताचे उपाख्यान लावले होते. हरणाचे एक पाडस त्या महापुरुषाच्या कुशींत कसे शिरलें, नुकताच जन्मलेला तो मृग-शिशु कातर दृष्टीने त्याच्याकडे आसऱ्याची भीक मागण्यास कसा आला, आणि त्या निराश्रिताला भरत राजाने आश्रय दिला इत्यादि फारच करुण स्वराने ते गात होते. त्या वेळीं विशू काहींसा सरकून दूर झाला होता, त्याला जवळ ओढून कैलासचन्द्रानी आपल्या मांडीवर बसवले !

कथेकरी बुवानी पुन्हा गाण्यास सुरुवात केली.—त्या पाडसाने कशा प्रकारे हळूंहळूं दिवसेदिवस भरत राजाचा तुटलेला स्नेहरज्जू जोडण्यास आरंभ केला, शतशः छिन्नविच्छिन्न झालेल्या त्याच्या माया-श्रृंखलेने पुन्हा कशा प्रकारे त्याला ते वेढूं लागले, भरत राजाचीं नित्यकर्मे, पूजापाठ नि ध्यान-समाधीहि चालू असता मध्येच येऊन ते त्याचे चित्त कर्मे वेधून घेई, राजा ध्यानमग्न असता त्या निराश्रित पाडसाची सजल करुण दृष्टि त्याच्या मनश्चक्षूंसमोर कशी उभी राही इत्यादि.

मग ते मोठे होत चालले. क्रमाक्रमाने झोपडी सोडून अंगणात, अंगण टाकून पुष्पवाटिकेत, तदुपरात अरण्यात, नि अरण्यापासून दूर अंतरावर असलेल्या जागी ते स्वच्छंदपणे हिंडूंफिरू लागले. त्याच्या परतण्याची वेळ होऊन गेली व ते आले नाहीं म्हणजे भरत राजा उत्कंठित होऊन मोठ्याने साद घालत असे—'ये! ये! ये!' हा कथाभाग वर्णून श्रोतृवृंद शोकाकुल होईल अशा करुण रवाने गात कथेकरी बुवा पुढे म्हणाले की, एक दिवस अरण्यातील पशु अरण्यामध्ये निघून गेला. त्याला मनुष्याचे दुःख जाणवले नाही. वृद्ध भरताने मोठ्याने साद घातली—'ये ! ये ! ये !' पण कुणी आला नाही, कुणीहि त्याच्या व्याकुल हाकेला ओ दिली नाही. मग त्याने साऱ्या अरण्यभर शोधले. प्रत्येक गिरिकंदरात, प्रत्येक वृक्षातळी प्रत्येक लताकुंजात त्याने स्फुंदून स्फुंदून साद घातली—'ये ! ये ! ये ! ' पण कुणी आला नाही. एक दिवस, दोन दिवस, तीन दिवस झाले. तरी कुणीहि नाही आला. प्रथम त्याचे खाणेपिणे नि निजणे थांबले, मग पूजा-पाठ बंद पडला, आणि नंतर त्याची ध्यान-समाधि इत्यादि सर्व त्या लडिवाळाच्या मागे मागे अरण्यातील भलसलत्या वाटेने मोकाट भटकूं लागली.

कथेकरी बुवा पुढे गाऊं लागले—मृत्यूची भीषण छाया जमीनविर लोळणाऱ्या भरताच्या शरीरावर अधिकार गाजवित आहे. त्याचा कंठ दाटून आला असून त्याचे दुःखित, उत्तप्त

नि तृषित ओठ मंदपणे कांपताहेत. जणूं अजूनहि ते साद घालन असावेत–' परत ये ! परत ये ! परत ये ! '

कैलासचन्द्र विश्वेश्वरला छातीशी घट्ट कवटाळून मोठ्याने रडूं लागले. त्याचे अंतःकरण कंपित झाले आणि विव्हळून म्हणाले—' ये ! ये ! ये ! '

वृद्ध कैलासचन्द्राचे हे रडणे तेथे जमलेल्या मंडळींपैकीं कुणालाहि अस्वाभाविक वाटले नाही. कारण, सर्व वयातीत माणसाचे कांहीं ना कांहीं हरपले होते. आणि सर्वांची अंतःकरणे शोकाकुल होऊन साद घालत होती—' परत ये ! परत ये ! परत ये ! '

कैलासचन्द्र आसवे पुसता पुसता विश्वेश्वरला कडेवर उचलून म्हणाले, " चल दादा, घरी जाऊ या. फार रात्र झाली. "

विशू कडेवर बसून घरी जाण्यास निघाला. अधिक वेळ एकाच जागी बसल्यामुळे त्याला झोप येत होती, तो वाटेतच झोपी गेला.

घरी पोचताच कैलासचन्द्रांनी त्याला सरयूसमोर कडेवरून उतरून म्हटले, " घे आई, तुझी वस्तु तुजपाशीच ठेव ! "

आज म्हाताऱ्याचे डोळे भरून आलेले सरयूने पाहिले.

गेली दोन वर्षे चन्द्रनाथचा आपल्या घराशी संबंध नव्हता. मात्र, पैशाची गरज लागे तेव्हा आपल्या कारभाऱ्यास तो पत्र लिही आणि कारभारी त्याच्या पत्त्यावर पैसे रवाना करी.

त्याला कधीं कधी हरकाली खेदपूर्ण पत्र पाठवी. व्रजकिशोरहि पत्रद्वारे परत येण्याचा आग्रह करीत. मणिशंकरनी देखील एकदोन पत्री लिहिले कीं, आपली प्रकृति हळूहळू ढासळत चालली असल्यामुळे एक वेळ तुला पहाण्याची इच्छा आहे.

असल्या गोष्टीकडे चन्द्रनाथने अगोदर लक्षच दिले नाहीं. पण 'शक्य असेल तर एकदा इकडे ये, तुझ्याशी मला काहीं बोलायचं आहे' असे हरिबालेचे पत्र आले तेंव्हा त्याच दिवशी सामानसुमान बांधून तो गाडीत चढला.

हरिबालेने सरयूविषयीं काही सांगितले, तिचे एकादे पत्र किंवा हस्ताक्षर दाखवले आणि त्यामुळे गत सुखाचा आभासहि मिळाला तर,—हं तसे झाले तरी काय—काहीं नाही, असा चन्द्रनाथच्या मनाचा गोंधळ उडाला. तथापि लवकर घरी यावेसे त्याला वाटले. परंतु ज्या आशेने एवढ्या दूर तो आला होता ती फोल ठरली. हरिबालेला भेटीअंती त्याने विचारले, "आजी, आणखी नाही का काही बोलायचं?"

"एवढंच, आणखी काही नाही बाबा."

निराश होऊन चन्द्रनाथ म्हणाला, "मला इतकी तसदी देऊन उगाच का बोलावलंस तर?"

"घरीं न येणं शोभतं का तुला?"

उसासा सोडून हरिबाला पुढें म्हणाली, "बाबा, होणारं

होतं ते होऊन गेलं. आता पुन्हा प्रपंचात लक्ष घातलं नाहीस तर, आमच्या दुःखाचा भार आम्ही कुठं हलका करावा ?"

विरक्तपणे तोंड फिरवून चन्द्रनाथने उत्तर दिले, "ते मी काय सांगू ?"

पण मणिशंकर काही केल्या सोडीनातच. त्याचा हात धरून ते म्हणाले, "बाबा, मला क्षमा कर. त्या दिवसापासून मी कोणत्या खाईत होरपळतो आहे ते एक अंतर्यामीच जाणे."

चन्द्रनाथ घोटाळ्यात पडला. तरी काही बोलू शकला नाही.

मणिशंकर पुन्हा सांगू लागले,—"आता तू दुसरं लग्न करून गृहस्थधर्म चालवावा. तुला पसंत पडेल अशी एक मुलगी मी पाहून ठेवली आहे. केवळ तुझं मत ऐकावं एवढ्यासाठी अजून नक्की केलं नाही. एक बायको निवर्तल्यावर कुणी दुसरं लग्न का करत नसतात ?"

चन्द्रनाथ हळूच म्हणाला, "अगोदर हे तर कळू दे की, पहिली बायको निवर्तली. मग पहाता येईल."

"शिव ! शिव ! बाबा, असं म्हणू नकोस."

चन्द्रनाथ चुप्प राहिला.

मणिशंकर अकस्मात् रडू लागले आणि म्हणाले, "मला वाटतं मीच तुला संसार-विमुख केलं. माझं हे दुःख मरणोत्तरहि मिटणार नाहीं."

बराच वेळ विचार करून चन्द्रनाथ म्हणाला, " सोयरीक कुठं ठरवलीय ? "

मणिशंकर आसवें पुसून उठून बसले व म्हणाले, " कलकत्याला. तूं स्वतः एकदा पाहून ये. "

" बरं, उद्याच जातो. "

मणिशकर आशीर्वाद देऊन म्हणाले, " हं, असंच कर. तुला पसंत पडली तर मला पत्र पाठव. घरच्या सगळ्या मंडळीस घेऊन मी कलकत्याला येतो. "

जरा वेळ उगी राहून मणिशंकर पुन्हा म्हणाले, "चन्द्रनाथ, आता फार दिवस मी वाचणार नाहीं. तूं पुन्हा संसारी नि सुखी झालेला पाहून संतोषानं मरेन. "

दुसरे दिवशीं चन्द्रनाथ कलकत्याला गेला. व्रजकिशोर मामा पण बरोबर होते. वधूला पाहून झाल्यावर व्रजकिशोर म्हणाले " मुलगी तर दिसण्यात प्रतिलक्ष्मी आहे ! "

चन्द्रनाथने तोंड फिरवले. त्याने आपले मत दिले नाहीं.

परत स्टेशनवर येऊन तिकीटे काढून दोघेहि गाडींत बसले. व्रजकिशोरनी विचारले, " बाळ, पसंत पडली ना ? "

चन्द्रनाथ मान हालवून उत्तरला, " अं हं ! "

व्रजकिशोर जणूं आकाशातून खाली कोसळले. ते म्हणाले, " अशी सुंदर मुलगी असून देखील नापसंत ? "

पुन्हा मान हालवून चन्द्रनाथ म्हणाला, " हं. "

व्रजकिशोर स्वतःशींच म्हणाले की, सरयूला आपण पाहिलेलं नाहीं.

ठरलेल्या स्टेशनावर गाडी उभी राहिली तेव्हा व्रजकिशोर खाली उतरले. चन्द्रनाथने अलाहाबादचे तिकीट काढले होते.

व्रजकिशोरनी विचारले, " मग तूं किती दिवसानी परत येशील ? "

चन्द्रनाथ म्हणाला, " काकाना माझा नमस्कार कळवून सागा कीं, लवकर परतण्याची त्याची इच्छा नाही. "

हा निरोप ऐकून कपाळावर हात मारून मणिशंकर म्हणाले, " वाटेल ते होवो. माझी प्रकृति सुधारताच मी स्वत जाऊन सुनेला आणतो. समाजाच व्यर्थ भय बाळगून माझ्यानं चिरकाल नरकवास सोसवणार नाही. आणि समाज तो कसला ? आम्ही स्वतःच समाज ! "

हे ऐकून हरकाली दात ओठ खात म्हणाली,—' साठी बुद्धि नाठी ! ' मग तिने कारभाऱ्यास बोलावून विचारले, " चन्द्रनाथशी काय काय बोलण झालं हो ? "

" मला एवढंच विचारलं की, आजपर्यंत काशीला किती रुपये पाठवले ? "

" बस, फक्त हेच विचारलं, आणखी कांहीं नाहीं ? "

इतके बोलून रुद्ररूपधारी हरकाली चालती झाली.

## १६

चन्द्रनाथने अलाहाबादचे तिकीट काढले होते, पण वाटेत आपला बेत एकदम बदलून तो काशीला उतरला.

त्याच्या बरोबर दोन नोकर होते. त्यानी भाड्याची गाडी ठरवली आणि वर सामानसुमान चढवले. परंतु चन्द्रनाथ गाडींत बसला नाही. " तुम्ही डाक बंगल्यात जाऊन उतरा व माझी वाट पहा " असे नोकराना बजावून दुसऱ्या रस्त्याने तो पायीच निघाला. चालण्याचा त्याला त्रास होऊं लागला. तोंड कोरडे नि फिक्के पडले. तो पाऊल पुढे टाकी तेव्हा त्याला वाटे की, आपले प्रत्येक पाऊल आपल्याच हृदयावर पडतें आहे. तथापि तो चालतच होता, थांबला नाही. हळूंहळूं हरिदयाळचे घर जवळ येत चालले. हा सगळा भाग त्याच्या चांगला परिचयाचा होता. गल्लीच्या वळणावरचे ते लहानसे मिठाईचे दुकान अजून जसेच्या तसेच होते. त्या दुकानाचा मालक तशाच दोंदानिशीं पाटावर बसून भजी तळत होता. चन्द्रनाथ जरा उभा राहिला. दुकानदाराने त्याच्याकडे पाहिले, पण साहेबी पोषाख केलेल्या माणसास भजी विकत घ्या असे तो सांगूं शकला नाही. त्याच्याकडे एकदा नजर फेकून तो आपल्या कामाला लागला.

चन्द्रनाथ पुढें चालला. पण गल्लीच्या वळणावर येताच काहीं केल्या त्याचे पाऊल पुढे पडेना. काशीतील त्या

अरुंद गल्लीत नावाला देखील हवा नव्हती. श्वासोच्छ्वास करण्यात देखील त्याला त्रास होऊं लागला. तो दोन एक पावले पुढे जाई आणि उभा राही. पुन्हा चालूं लागे, परत थबके. रस्ता काही केल्या संपेनाच. आणि मनातून त्याला वाटत होते की, काही केल्या हा रस्ता संपू नये. न जाणो रस्ता संपल्यावर काय दृष्टीस पडेल ! अखेर तो हरिदयाळच्या घरासमोर येऊन टेपला. बराच वेळ उभा राहिल्यावर हाक मारावी असें त्याला वाटले. पण घसा कोरडा पडला होता. शेवटी अडखळत अडखळत हाक मारून तो थांबला. त्याने घड्याळ काढून पाहिले, नऊ वाजून गेले होते. पुन्हा धीर करून त्याने हाक मारली—ठाकूर, अहो दयाळ ठाकूर ! पण उत्तर नाही. रस्त्याने जाणाऱ्या लोकानी मागे वळून चन्द्रनाथच्या साहेबी पोशाखाकडे बघितले. चन्द्रनाथने परत हाक मारली—दयाळ ठाकूर !

या खेपेला आतून कुणीतरी बाई म्हणाली, " ठाकूर घरीं नाहीत. "

उत्तर देणारी एक बंगाली मोलकरीण होती.

ती बाहेरच्या दरवाजापर्यंत आली व चन्द्रनाथचा साहेबी पोशाख पाहून दाराआड झाली. परतु आपल्याच भाषेत त्याला बोलताना तिने ऐकलें तेव्हा ती भिऊन न पळता आडूनच म्हणाली, " ठाकूर घरी नाहीत हो."

" किती वेळानं येतील ? "

" दुपारपर्यंत येतील. "

चन्द्रनाथ घरात आला. आनंद, शंका नि लज्जा या त्रयीच्या संमिश्रणाने त्याच्या हृदयात खळबळ उडाली. त्याला वाटले होते कीं, घरात सरयू असणारच; परंतु आत गेल्यावर त्याला तेथें कुणीहि दिसले नाहीं. त्याने विचारले, " घरात आणखी कुणी नाही का ? "

" नाहीं. "

" मंडळी गेली कुठ ? "

" मंडळी कोण ? "

" एक स्त्री— "

" इथं तर माझ्याखेरीज आणखी कुणी रहात नाहीं. "

" एक लहान मुलगा होता ना ? "

" छे, इथं कुणीहि नाहीं. "

जिन्याच्या पायरीवर बसून चन्द्रनाथने विचारले, " मग ती मंडळी गेली कुठ ? "

मोलकरीण विचारात पडली. ती उत्तरली, "इथं कुणी मंडळी नाही, फक्त पंडाजी नि मी रहातो. गेल्या महिन्यात इथं कुणी यात्रीहि आला नाही."

चन्द्रनाथ स्तब्धपणे खाली पाहूं लागला. त्याच्या मनात कोणते विचार चालले होते ते एक तोच जाणे. खूप वेळानंतर त्याने पुन्हा विचारले, " तूं इथं किती दिवसापासून आहेस ?"

" सुमारं दीड वर्षापासून."

" तरी तूं इथं कुणाला बघितलं नाहींस ? एक गोरी स्त्री आणि तिच्या कडेवर एक तान्हा मुलगा किंवा मुलगी,—कदाचित् ती एकटीच असेल—काय, यापैकी कुणालाच तूं पाहिलं नाहीस ? "

" मी तर कुणालाच नाही पाहिलं."

" कुणाकडून काहीं गोष्ट निघालेलीहि ऐकली नाहीस ?"

" छे. "

चन्द्रनाथने मग अधिक काही विचारले नाही. तो उगा बसून हरिदयाळच्या येण्याची वाट पाहूं लागला. तो समजून चुकला की, सरयू आता या जगात नाही. तथापि ती हकीकत ऐकून घेऊन मग जावे या हेतूने तो थांबला. एकेक मिनिट एकेका वर्षासारखे त्याला भासूं लागले.

दोनप्रहरनंतर हरिदयाळ घरी आले. चन्द्रनाथला पाहून प्रथम ते चकित झाले. पण मग शुष्क कंठाने म्हणाले, " चन्द्र बाबू, आपण होय ! केव्हा आलात ?"

चन्द्रनाथ अडखळत म्हणाला, "बराच वेळ झाला. मंडळी कुठं ?"

" हं, मंडळी—ती मंडळी—"

चन्द्रनाथ कापत कापत उठून उभा राहिला. अंगातील सगळे बळ प्राणपूर्वक एकवटून त्याने स्वतःला सावरले आणि विचारले, " ती कधीं वारली ?"

" कोण कधी वारली ?"

कोरड्या पडलेल्या गळ्याने अडखळणाऱ्या आवाजात चन्द्रनाथ ओरडून विचारतो, " सरयू कधी वारली ? "

आता त्याचे बोलणे हरिदयाळच्या लक्षात आले. ते म्हणाले, " वारली नाही ती, सुखरूप आहे."

" आहे ? कुठं—"

" कैलासकाकाऱ्या घरी. "

" कुठं रहातात ते ? "

" गल्लीच्या टोकाला फणसाच्या झाडाखाली त्याचं घर आहे."

चन्द्रनाथ डोके धरून बसला. बराच वेळ उगी बसल्यानतर त्याने शातपणे विचारले, " ती इथं का राहिली नाही ? "

हरिदयाळना वाटले की आपण काही अयोग्य कृत्य तर केलं नाही, मग व्यर्थ लाज बाळगण्याचं कारण काय ? तेव्हा धीर करून ते म्हणाले, " आपण देखील जिला आपल्या घरात थारा देऊं शकला नाही, तिला मी कसा ठेवून घेणार ? मलाहि चार लोकाशी व्यवहार करावा लागतो. "

हरिदयाळचे बोलणे चन्द्रनाथला अगदी योग्य वाटले. पुन्हा काही विचार करून तो म्हणाला, " ती कैलासकाकाच्या घरी कशी गेली ? "

" ते स्वतःच तिला घेऊन गेले. "

" ते कोण ? "

" एक काशीवासी दुःखी ब्राह्मण. "

" सरयू त्याना अगोदरपासून ओळखत होती ? "

" हो, चागलीच ओळखत होती की. "

" त्याचं वय काय बर ? "

स्वतःशींच हंसून वृद्ध हरिदयाळ म्हणाले, " मला वाटतं साठएक वर्ष असेल. ते सरयूला 'आई' म्हणून हाक मारतात ! "

" तिथं आणखी कोण रहातात ? "

" एक मोलकरीण, सरयू नि विशू. "

" विशू कोण ? "

" सरयूचा मुलगा. "

चन्द्रनाथ उठून उभा राहिला आणि म्हणाला, "बरं, जातो."

हरिदयाळनी त्याला आडवले नाहीं. तो गेला. गल्ली संपते तेथवर जाऊन त्याने एकाला विचारले, " कैलासकाकाचं घर कोणतं आपल्याला माहीत आहे ? "

त्या माणसाने एका घराकडे बोट दाखवले. चन्द्रनाथ तडक आत गेला. त्याला समोर कुणीच दिसले नाही. पडवींत एक गोजिरवाणा गुटगुटीत बालक परातीतील पाणी उसपून आपलें सारे अंग भिजवीत होता. आणि अधूनमधून परातींतील पाण्यामध्ये पडलेले स्वतःचे प्रतिबिंब कसे कापते नि हंसून हंसून वाकुल्या दाखवते ते खुषींत येऊन पहात होता.

चद्रनाथनें चटकन् त्या मुलाला उचलून वर घेतले व तो माजघरात गेला. मुलाला आश्चर्य किंवा भय काहींच वाटले नाहीं. अनोळखी माणसाकडे जाणे त्याला नवीन नव्हते असेच दिसले. त्याने चन्द्रनाथच्या नाकावर आपला इवलासा कोमल हात ठेवून विचारले, " तुमी कोन ? "

चन्द्रनाथने अत्यंत प्रेमपूर्वक त्याचा पापा घेऊन म्हटले, " मी बाबा. "

" बाबा ? "

" हो, बाबा. आणि तूं कोण रे ? "

" मी ? बिशू ! "

आपल्या घड्याळाचा छडा काढून चन्द्रनाथने त्याच्या गळ्यात अडकवला. आणि खिशातून चाकू, पेन्सील, पैशाचे पाकीट, जे काही मिळाले ते काढून त्याच्या हातात दिले. चिरंजीवाच्या हाती देण्यास त्याला शोधूनहि आपल्यापाशी आणखी काही मिळाले नाही.

खूपशा वस्तू एकदम मिळाल्यामुळे बिशू आनंदित होऊन म्हणाला—" बाबा ! "

चन्द्रनाथने त्याचे इवलेसे तोड आपल्या तोंडाशी धरून म्हटले—" बाबा ऽ ऽ ! "

इतक्यात, लखियाच्या आईने कोलाहल केला. एक साहेब घरात शिरला असून बिशूला कडेवर घेऊन इकडे तिकडे फिरतो

आहे असे दृश्य अचानकच तिला खिडकींतून दिसलें. आणि त्याबरोबर एका दमात सैपाकघराकडे तिने धूम ठोकली. घरीं कैलासचन्द्र नव्हते. आज पुष्कळ दिवसानी ते विश्वनाथाच्या दर्शनास गेले होते. सरयू पण नुकतीच थोड्या वेळापूर्वी दर्शनाहून येऊन सैपाकाला लागली होती. लखियाच्या आईने धापा टाकत तिला म्हटले,—बाई !

" काय ग ? "

" घरात की नाहीं एक साहेब घुसलाय् आणि तो विशूला कडेवर उचलून फेऱ्या घालतोय्. "

सरयूने चकित होऊन " अग पण आहे कोण ? " असे विचारत दरवाजातूनच त्याला पहाण्याचा प्रयत्न केला परंतु ती पाहूं शकली नाहीं.

लखियाची आई तिच्या पदराला धरून ओढत म्हणते, " अहो, तुम्ही नका जाऊं तिकडे, बाबूजींना येऊं दे."

सरयूने तिचे ऐकले नाहीं, तिला खरंच वाटेना. किंचित् पुढे होऊन ती पहाते तर, लखियाची आई सागते आहे त खोटे नाही. साहेबी पोशाखात असलेला एक मनुष्य येरझारा घालीत विश्वेश्वरशी हळूहळू गोष्टी करतो आहे. धीर करून ती खिडकीपाशी गेली. ज्याला नुसत्या सावलीवरून ती ओळखायची त्याला आजहि तिने निमिषात ओळखलें—हा तर आपला प्रियकर चन्द्रनाथ !

ती चट्‌दिशीं पुढे झाली आणि डोक्यावरील पदर खांद्यावर ओढून त्याच्या पायावर डोके टेकून तिने नमस्कार केला व ती बाजूला उभी राहिली.

चन्द्रनाथ म्हणाला—सरयू !

## १७

आता पति–पत्नीच्या गोष्टी चालल्या होत्या.

चन्द्रनाथ म्हणाला, " फार बाळलीस अगदीं ! "

सरयू त्याच्या चेहऱ्याकडे पाहून काहीशी हंसली. जणूं ती म्हणाली,—यात आश्चर्य कसले ! चन्द्रनाथ पुन्हा विशूला घेऊन खेळण्यात गुंग झाला. सरयूने त्याच्या बुटाच्या फिती सोडल्या, एकेक करून त्याच्या अंगावरील कोट, शर्ट वगैरे उतरले, पंख्याने त्याला वारा घातला, आणि ओला टॉवेल आणून त्याचे पाय पुसले. हे सर्व तिनें इतक्या व्यवस्थितपणे केले कीं, जणू तिचा हा नित्यक्रम असावा, रोजच ती याप्रमाणे करते. या जन्मी ज्याच्या दर्शनाची आशाच नव्हती तो आज अचानक इतक्या दिवसानी स्वतः आला ही किती आनंदाश्रु ढाळण्याजोगी, किती दीर्घ उसासे सोडण्यासारखी गोष्ट. पण तसे काही झाले नाही. सरयू अशा सहज रीतीने वागली कीं, जणूं तिचा प्रियकर रोजच तिच्याकडे येत असतो, तसा आजहि आला आहे. कदाचित् आज त्याला जरा उशीर लागला, थोडयाशा वेळाने तो आला एवढेच.

परंतु चन्द्रनाथचे वागणे काहीं निराळ्याच प्रकारचे दिसले.

तो विशूबरोबर बोलण्यांत इतका मग्न झाला होता कीं, जसें कांहीं घरांत दुसरें कुणी नाहींच. जरा अस्वाभाविक दिसलें ते. त्या लहानशा घरांत अल्पमति विश्वेश्वराखेरीज आणखी कोणी नव्हतें म्हणून बरें. कोणी असता तर हेंच समजता कीं, चन्द्रनाथ स्वतः पकडला गेला असून तें लपविण्यासाठीं तो मुद्दाम तोंड फिरवून मुलाशीं गोष्टी करण्यांत गुंग झाला आहे.

सरयू म्हणाली, "बाळ, खेळ जा."

विशू खाटेवरून उतरत होता, त्याला चन्द्रनाथनें खालीं उतरून ठेवलें. विशूनें आपल्या आईला चन्द्रनाथास नमस्कार करतांना नुकतेंच पाहिलें होतें. म्हणून तिच्याप्रमाणेंच बापाला वांकून नमस्कार करून तो पळाला. चन्द्रनाथनें हात पुढें करून त्याला पकडूं पाहिलें, पण इतक्यांत तो पळून त्याच्या हाताबाहेर गेला देखील.

सरयू चन्द्रनाथच्या छातीवर हात ठेवून म्हणाली, "शरीरांत कांहींच राहिलं नाहीं. आजारी होतां कां?"

"छे, आजारी नव्हतों."

"मग काळजींत होतां?"

तिच्या तोंडाकडे पहात चन्द्रनाथनें विचारलें, "तुला काय वाटतं?"

सरयूनें या प्रश्नाचें कांहीं उत्तर न देतां दुसरीच गोष्ट

काढली—" उशीर होत आहे, चला आघोळ करून घ्या. " ती म्हणाली.

चन्द्रनाथने विचारले, " घरधनी कुठं ?"

" ते आज विश्वनाथाच्या देवळात पूजा करण्यास गेले आहेत. संध्याकाळी येतील असं वाटतं."

" तूं त्याना कोणत्या नावानं हाक मारतेस ?"

" पूर्वीपासून थोरले काका म्हणत आले, त्याच नावानं अजूनहि हांक मारते. "

चन्द्रनाथनें पुन्हा आणखी काही विचारलें नाहीं.

सरयूने विचारलें, "बरोबर कुणी गडीमाणूस आलाय् का ? "

" हरि नि मधू आलेत, ते डाक बंगल्यात उतरले आहेत."

" त्याना इकडे आणण्यास बहुतेक धीर झाला नसावा ? "

चन्द्रनाथने उत्तरच दिले नाही.

* * *

तो जेवण्यास बसला तेव्हा पुढ्यात पुऱ्यानी भरलेले ताट पाहून त्याला आश्चर्य वाटले. रागाने ताट दूर सारून तो म्हणाला, " हे काय ? आपलेपणा दाखवते आहेस की थट्टा करत आहेस ?"

सरयू काहीशी चकित् झाली नि खिन्नपणे म्हणाली, "कां, नाहीं खाणार ? "

कांहीं वेळ उगी राहून चन्द्रनाथने विचारलें, " मी दुपारी कधीं पुऱ्या खात असतो ? "

सरयू मनांतल्या मनांत गोंधळून उगी राहिली.

चन्द्रनाथ म्हणाला, " आज प्रथमच तूं मला जेवायला वाढत आहेस असं नव्हे. मला वाटतं, मी काय खातों हें देखील तूं विसरलीस."

सरयूचे डोळे भरून आले. ती मनांत म्हणाली,—ते दिवस तर गेले. ती उत्तरली " भात जेवणार ? पण–"

" पण काय ? थंडगार झालाय् का ? "

" थंड नाहीं झालेला, इथं पण मी भात रांधते. "

" घरीं देखील रांधत होतीस कीं ? "

किंचित् उगी राहून सरयू म्हणाली, " माझ्या हातचा भात चालेल ? "

चन्द्रनाथनें मान खालीं घातली. त्याला अजूनपर्यंत हा विचारच शिवला नव्हता कीं, सरयू परकी झाली आहे; तिच्या हातचें अन्न चालूं शकत नाहीं. सरयूच्या बोलण्यांत एक प्रकारची तीव्र ज्वाला होती. चन्द्रनाथ जरा वेळ गपचुप बसून राहिला. परंतु मग हळूच म्हणाला, " सरयू, अशा दुपारच्या वेळीं माझ्या डोळयांना पाणी आलेलं पाहिल्याशिवाय तुझं समाधान होणार नाहीं का ? "

सरयू चट्दिशीं उठली व म्हणाली, " बरं, घेऊन येते हं."

आंत जाऊन ती खूप रडली. मग आंसवें पुसून तिनें पाण्यानें

तोंड धुतले. पण आसवाची सर ओसरेनाच. पुनः पुन्हा ती आसवे पुसत होती, काहीं केल्या स्वतःला आवरूं शकेना. परंतु नवरा उपाशी बसला हे लक्षांत येताच ताट घेऊन ती बाहेर आली. पुष्कळ दिवसापूर्वी ती जशी त्याच्या जवळ बसून त्याला आग्रहपूर्वक जेवूं घाली, तसेच आजहि तिने त्याला जेवूं घातले, आणि त्याचे जेवून झाल्यावर ताट घेऊन पुन्हा एकदा मनसोक्त रडण्यासाठी ती सैपाकघरात गेली.

दोन वाजून गेले होते. चन्द्रनाथच्या कुशीत विश्वेश्वर स्वस्थ झोपला होता. इतक्यात सरयू तेथे आली.

चन्द्रनाथने विचारले, "आटोपलं का सगळं काम ?"

"काम नव्हतंच काही. अजून थोरले काका मात्र आले नाहीत." सरयू म्हणाली

नंतर तिने घरच्या गोष्टी काढल्या. आपल्या घराची प्रत्येक खोली, प्रत्येक वस्तु, मामा—मामी, नोकर—चाकर, कारभारी, सखि हरिबाला, शेजारी—पाजारी जे म्हणून कोणी होते त्या सर्वाविषयीची हकीकत तिने विचारून घेतली. सरयूला या गोष्टी जाणण्यापासून फायदा नाही, किंवा ही हकीकत सागण्यात चन्द्रनाथला त्रास होत असला पाहिजे, थोडी लज्जा, घृणा, काहीसा संकोच वाटत असावा, असे इतका वेळपर्यंत त्या दोघांपैकी कुणाच्याहि लक्षात आले नाही. एकजण मोठ्या आनंदाने प्रश्न करत जाई, नि दुसरा उल्हासानें

उत्तरे देई. वाटे, दोघेहि जणूं मित्र–मित्रच.–दीर्घ विरहानंतर आज त्याच्या भेटीगाठी पडल्या.

अचानक सरयूने विचारले, “ लग्न कुठं केलंत ? ”

अगदी हंसण्यासारखीच गोष्ट होती जशी काहीं !

चन्द्रनाथ म्हणाला, “ पश्चिम प्रांती. ”

“ पत्नी कशी आहे ? ”

“ तुझ्याचसारखी ! ”

या वेळी सरयूच्या काळजात कळ उठली. ती स्वतःला सावरूं शकली नाही. बसली होती ती आडवी पडली. तिचा चेहरा एकदम पांढराफटफटीत झाला !

चन्द्रनाथ घाबऱ्याघुबऱ्या पलंगावरून खालीं उतरला व तिच्या जवळ गेला. तिचा हात धरून तिला उठवण्याची त्याने शिकस्त केली. पण सरयू अगदी निचेष्ट पडली होती. तेव्हा तिच्या उशाशी बसून तिचे डोकें आपल्या मांडीवर घेऊन त्याने विव्हळत तिला हाक मारली—सरयू !

सरयूने डोळे उघडले आणि क्षणमात्र नवऱ्याकडे पाहून पुन्हा मिटले. तिचे ओठ थरथर कापले. अस्पष्टपणे ती काहीतरी म्हणाली, जे नीटसे समजले नाहीं.

चन्द्रनाथ फारच घाबरून पाणी आणण्यासाठी ओरडूं लागला. लखियाची आई जवळच होती ती चटकन् पाणी घेऊन आली. पण तिने भ्याल्यासारखे मुळींच दाखवले नाहीं.

ती म्हणाली, " बाबूजी, थोड्या वेळानंतर ती बरी होईल. तिला कधी कधीं असं होतं. "

सरयूच्या तोंडा–डोळ्यावर पाणी शिपडून तिला पंख्यानें वारा घालण्यात आला. आणि तेवढ्यांतच विशूने येऊन एक-दोनदा तिच्या डोक्याचे केस ओढत म्हटलें—आई !

तशी सरयू शुद्धीवर आली. ती लाजून डोक्यावरचा पदर सारखा करत उठून बसली. लखियाची आई आपल्या कामाला गेली. त्या वेळीं चन्द्रनाथचा चेहरा भीतीमुळे काळानिळा झाला होता.

सरयू हंसली. अत्यंत क्षीण नि सुमधूर हास्य करून तिने विचारले, " का, घाबरून गेलात वाटतं ? "

चन्द्रनाथच्या डोळ्यात उभे राहिलेले अश्रु गालावरून ओघळले. हातानी आसवे पुसत तो म्हणाला, " मला वाटलं कीं, सगळा कारभार आटोपलाच. "

सरयू स्वतःशीच म्हणाली—तुमच्या मांडीवर डोकं होतं, पण ते भाग्य या हतभागिनीला कसचं लाभतं ? नंतर ती उत्तरली, " मला कधी कधी असंच होतं. "

चन्द्रनाथ म्हणाला, " हं, ते तर पहातोच आहे. पूर्वी होत नसे, पण आता होऊं लागले हे देखील मला कळते. "

इतके बोलून बराच वेळपर्यंत चन्द्रनाथ गप्प राहिला. मग त्याने आपल्या खिशातून मोहोर केलेला चाव्याचा झुबका

काढून सरयूच्या पदराला बांधत म्हटले, " हा आपला चाव्याचा झुबका घे. माझ्या स्वाधीन करून गेली होतीस, तो आज मी तुला परत करतो. बघ कधीं याचा उपयोग केला आहे की काय. "

आपला चाव्याचा आवडता झुबका मोहोर करून ठेवल्या-मुळे त्यावर गंज चढला आहे हे पहाताच तो हातात घेऊन सरयू म्हणाली, " तिला का नाहीं दिलेत हा ? "

चन्द्रनाथचा पांढराफटफटीत पडलेला चेहरा क्षणांत निर्मल हास्याने टवटवीत झाला. प्रेमभराने त्याचे दोन्ही डोळे डबडबले. तरी स्वतःला सावरून तो म्हणाला, " तिलाच दिला कीं, सरयू ! "

सरयूला नीटसे समजले नाही हे. नवऱ्याच्या तोंडाकडे किंचित् साशंकपणे पाहून ती सविनय म्हणाली, " नव्या पत्नीची गोष्ट विचारते. दुसरी नवी पत्नी आली ना, तिला का नाही दिलेत ? "

आता मात्र चन्द्रनाथ स्वतःला आवरून धरूं शकला नाही. एकदम दोन्ही हात पुढे करून त्याने सरयूचे तोंड आपल्या हृदयाशीं घट्ट कवटाळले. आणि तो म्हणाला, " तिलाच दिला बरं, सरयू ! दोनदोन बायका नाहीत माझ्या, एकच आहे हं. आणि ती कधीं जुनी नाहीं व्हायची. या काशीहून विश्व-नाथाच्या प्रसादपुष्पाप्रमाणं तिला आपल्या हृदयाशीं मी धरून

नेली तेव्हा ती जशी नवी होती, तशीच आजहि विश्वनाथाच्या चरणावरून तिला नेण्यास आलो असता ती नवी आहे ! ”

*  *  *

संध्याकाळी दिवेलावणी केल्यावर बाळाला घेऊन सरयू नवऱ्याच्या पायाजवळ येऊन बसली व म्हणाली, “ थोरल्या काकाना भेटल्यावाचून जाता येणार नाही. आजची रात्र तरी इथं राहिलच पाहिजे. ”

चन्द्रनाथ म्हणाला, “ असंच चिन्ह दिसतंय. आज जाणं घडत नाहींसं वाटतं. ”

बऱ्याच वेळापासून सरयूला चन्द्रनाथशी काहीतरी बोलायचे होते. पण इतका वेळ संकोचवश ती तोंड उघडूं शकली नव्हती; तशात सवडहि झाली नाही. आता ती म्हणाली, “ आपल्याकडे लाज कसली—”

सरयूच्या तोंडाकडे पहात चन्द्रनाथ स्तब्ध बसून राहिला. सरयू म्हणाली,“आपल्याला एक पत्र पाठवण्याचा विचार होता.”

“ मग का नाहीं पाठवलंस ? मी तुला मना केलं नव्हतं काही. ”

क्षणभर विचार करून सरयू म्हणाली, “ भीति वाटे, कदाचित् रागवालबिगवाल. बरं, पुन्हा कवीं येणं होईल ? ”

“ तूं सांगशील तेव्हा. ”

सरयूला अगोदर वाटले कीं, मग तेव्हाच काय ते बोलावें.

परंतु लगेच तिच्या मनात शंका डोकावली की, माणसाच्या शरीराचा नेम काय? आताच नाही बोलून टाकले तर, कदाचित् पुढे कधीहि बोलणे होणार नाहीं. हे परत येतील, पण तोपर्यंत माझी राखरांगोळी होऊन मी कुठल्या कुठे नाहींशी झालेली असेन. असा विचार करून ती पुन्हा म्हणाली, " आपल्याकडे लाज कसली—"

" हे तर मी ऐकलं. पुढं काही बोलशील की नाहीं ? "

किंचित् उगी राहून सरयू म्हणाली, " आता मी जगं् इच्छित नाही. असलं जिणं मला नाही आवडत ! "

चन्द्रनाथ तत्क्षणीच उमगला की, हे बोलणे थट्टेचें नाहीं. त्याने नीट निरखून पाहिले. सरयूचा चेहरा पुन्हा विवर्ण पडत चालला होता. तेव्हा दचकून त्याने विचारले, " सरयू, तुला कसली व्यथा तर जडली नाही ना ? "

उदासपणे हंसून सरयू म्हणाली, " हे मला नाही सांगता यायचं. माझ्या छातीत कधीमधी कळा उठतात खऱ्या. "

चन्द्रनाथने विचारले, " आणि ही घेरी ग ? "

सरयू हंसून म्हणाली, " छे, तिच्यात काहीं अर्थ नाही. "

चन्द्रनाथ मनात म्हणतो,—होणारं झालं. पण आता माझं सर्वस्व वेचून मी तुला बरी करीनच.

सरयू म्हणाली, " एका गोष्टीची मी भीक मागते, घालाल का ? "

" काय पाहिजे ? "

" मला स्वत:साठी काही नको. पण मी वारल्याची बातमी ऐकाल तेव्हा—"

आणि तिनें विशूला आणून चन्द्रनाथच्या पायाशीं ठेवलें व ती पुढे म्हणाली, " तेव्हा एकवेळ येऊन या बाळाला न्यावं ! "

चन्द्रनाथने झटकन् विश्वेश्वरला उचलून त्याचा गोड पापा घेतला.

इतक्यात, बाहेरून कैलासचन्द्रानी हाक मारली,–" विशू दादा ! "

बापाच्या कडेवरून चटपट खालीं उतरून विश्वेश्वर म्हणाला—" दादू ! "

सरयूहि उठून उभी राहिली व म्हणाली, " ते आले हं"

थोड्याच वेळात कैलासचन्द्र विश्वेश्वरला कडेवर घेऊन घराच्या चौकात आले. चन्द्रनाथ पण माजघरातून बाहेर आला. कैलासनी पूर्वीं कधी त्याला पाहिले नव्हते. पाहिले असतें तरी कदाचित् ओळखूं शकले नसते. म्हणून ते त्याच्याकडे बघत राहिले. नातवाने कैलासना त्याची ओळख करून दिली. तो म्हणाला—बाबा !

कैलासना नमस्कार करून चन्द्रनाथ उभा राहिला. आशीर्वादपर हात पुढे करून कैलासचन्द्र त्याला म्हणाले, " ये बाबा, बस. "

## १८

पण जेव्हा चन्द्रनाथ वृद्ध कैलासचन्द्राना म्हणाला, "उद्या या मंडळीला मी आपल्याबरोबर नेतो" तेव्हा कैलासचन्द्राच्या काळजात जणूं एकदम शेकडो तोफा सुटल्यासारखा आवाज झाला! त्यानी स्वत: काय उत्तर दिले ते देखील त्याचे त्यानाच ऐकूं आले नाही. परतु चन्द्रनाथने ऐकले,—अस्फुट रुदन करीत खूप दुरून कुणीतरी म्हणाला की, याहून अधिक सुखद गोष्ट ती कोणती बाबा?

सरयूनेहि हे ऐकून आनंद दर्शविला नाही. तिच्या दोन्ही डोळ्यातून आसवे ओघळूं लागली. नवऱ्याच्या पायावर डोके टेकून ती म्हणाली, "आपली पदधूळ देऊन या हतभागिनीला इथंच ठेवून जा, बरोबर नेऊं नका."

चन्द्रनाथ विचारतो, "का ग?"

सरयू काही उत्तर देऊं शकली नाही, ती विव्हळून रडूं लागली. पुन: पुन्हा तिच्या दृष्टीसमोर वृद्ध कैलासचन्द्राचा कातर चेहरा उभा राहूं लागला.

काही वेळ उगा राहून चन्द्रनाथ म्हणाला, "तूं माझी आहेस. मी तुला नेऊं इच्छित असेन तर, तुझी इच्छा नसूनहि व्यर्थ. विशूला सोडून मी राहूं शकणार नाहीं."

आता अधिक काहीं बोलण्यास सरयूला जागाच उरली नाहीं.

दुसरे दिवशीं सकाळींच नेहमीप्रमाणे विश्वेश्वरला कडेवर

घेऊन आणि बुद्धिबळाची पोटली हातात धरून कैलासचन्द्र शंभू मिश्राच्या घरी गेले. त्याना हाक मारून ते म्हणाले, "मिश्रजी, आज माझा मोठ्या आनंदाचा दिवस हो! आज विशू दादा की नाही आपल्या घरी जाणार. आता हा थोर झाला; म्हणून माझ्या घरकुलात याला ठेवून घेता येत नाही."

मिश्रजीनीहि यावर आनंद व्यक्त केला.

कैलासचन्द्रानी पट पसरून त्यावर बुद्धिबळे लावली आणि ते म्हणाले, " या, असे समोर बसा. आज तुमच्यावर दोन डाव करून दाखवतो ! "

पण खेळ सुरू होताच एकेक करून कैलासचन्द्राचे सगळे मोहरे मारले जाऊं लागले. जेव्हा हत्ती चालवण्याचा त्याचा विचार असे, तेव्हा उंटच चालवून मोकळे होत. आणि उंट चालवण्याचे मनात असता, घोडा चालवून पार. अशा प्रकारे खेळण्यात फारच धादळ उडूं लागली. मिश्रजी म्हणाले, " बाबूजी आज आपलं मन ताळ्यावर नाही, म्हणूनच फार चुका करत अहा. "

एक हार लावून घेतल्यावर कैलासचन्द्रानी आणखीहि एक हार लावून घेतली. मग खेळ आटपून ते बुद्धिबळाची पोटली बाधूं लागले. पण त्यानी लाल वजीर बाधला नाहीं. तो विशूच्या हातात देऊन ते म्हणाले, "घे दादा, हा वजीर मी तुला देतो. आतां पुन्हा कधींहि तुझ्याकडे हा मागणार नाहीं. " घरीं येत

असता वाटेत जो कोणी भेटला त्याला ही आनंदाची बातमी त्यांनी सांगितली.

वृद्ध कैलासचन्द्र आज सारी कामे मोठ्या उत्साहाने करत होते. परंतु ते सारखे वावरत असूनहि कामे अर्धवट रहात. बुद्धि-बळाच्या खेळाप्रमाणे सगळ्या कामातहि त्यांच्याकडून फार चुका होऊं लागल्या. जसजसा दिवस ढळत चालला तसतसे चुकांचे मान अधिकच वाढत गेले. त्यांच्या या चुका पाहून सरयूला आपल्या डोळ्यातील टिपे कितीदातरी हळूच पुसावी लागली. पण म्हाताऱ्याच्या चर्येवरचा उत्साह मावळला नाहीं. इतकेच नव्हे, त्यांना आडबाजूला बोलावून त्यांच्या पायाची धूळ माथ्याला लावून सरयू स्फुंदून स्फुंदून रडूं लागली तरी, त्यांनी आपली आसवे गिळली व हंसतमुखाने तिला आशीर्वाद दिला. ते म्हणाले, “ आई, रडूं नकोस. माझ्या—थोरल्या काकाच्या—आशीर्वादानं राणी होशील बरं ! कधी काशीला आलीस तर या झोपडीची वाट चुकून कुठं दुसरीकडे जाऊं नकोस हं. ”

सरयूच्या रडण्याला अधिकच उमाळा आला. ज्या दिवशी ती निराश्रित नि भिकारीण होऊन काशीत आली होती, त्या दिवशीची हृदयद्रावक स्थिति पुनः पुन्हा तिच्या मनासमोर उभी राहूं लागली.

ती म्हणाली, “ थोरले काका, मला माहीत आहे आम्हाला सोडून तुम्ही राहूं शकणार नाही. कारण,— ”

कैलासचन्द्र म्हणाले, " आई, माझे आता दिवसच कितीसे उरले ? " आणि मग ते स्वतःशीच म्हणतात,—या खेपेला मात्र मला यमाचं बोलावणं आलं आहे खरं. इतक्या दिवसानंतर कुठं तप्त प्राण थंडगार होण्याचा उपाय लाभला म्हणायचा !

सरयू आसवे पुसत विव्हळून म्हणाली, " आमच्यात दयामाया नाही— "

म्हातारा तिला मध्येच अडवून म्हणाला, " शिव ! शिव ! आई, असं बोलूं नकोस. मी तुला उत्तम जाणतो. "

रात्रीं दहा वाजता सर्वजण स्टेशनवर गेले. गाडीची वेळ हळूहळू जवळ येत चालली.

विश्वेश्वर झोपला होता ; पण त्या वेळींहि लाल वजीर त्याने आपल्या छातीशी घट्ट धरलाच होता. वृद्ध कैलासचन्द्रानी त्याला हालवून हालवून जागे केले. ताबडतोब झोपेतून उठवल्यामुळे तो रडण्याच्या बेतात होता. परंतु कैलासचन्द्रानी त्याच्या तोंडाजवळ तोंड नेऊन जेव्हां म्हटलें—" विशू दादा ! " तेव्हां तो हंसला नि म्हणाला—" दादू ! "

" अरे माझ्या दादा, कुठं चाललास तूं ? "

विशू म्हणाला, " दातो. " पुन्हा लाल वजीर दाखवून तो म्हणतो, " वजील ! "

कैलासचन्द्र म्हणाले, " हो दादा, वजीर कुठं हरवूं नकोस बरं ! "

तो हस्तिदंती वजीर जपून ठेवण्याबद्दल कैलासचन्द्रानी कितीदातरी विशूला आठवण दिली. त्याने पण मान हालवून म्हटले, " नाई हलवणाल वजील ! "

गाडी आल्यावर सरयू कैलाचन्द्राची पदधूळ माथ्याला लावून गाडीत चढली. म्हाताऱ्याचा आतरिक आशीर्वाद थरथरणाऱ्या ओठावाटे बाहेर पडूं शकला नाही. आतल्या आंतच राहिला !

गाडी सुटण्यास आता अधिक वेळ नाहीं असें पाहून कैलासचन्द्रानी विश्वेश्वरला चन्द्रनाथकडे दिले आणि म्हटले—दादू !

—दादू !

—वजीर.

विशूनें वजीराकडे पाहून हंसत म्हटले,—दादू, वजील !

—हरवूं नकोस हं.

—नाई !

आता मात्र म्हाताऱ्याच्या शुष्क डोळ्यांतून टिपे गळाली. गाडी चालू झाली तेव्हा त्यानी डब्याच्या खिडकींत तोंड घालून सरयूला म्हटले: "बरं, आई जातो." आणि पुन्हा एकदा त्यानी मोठ्यानें हाक मारली—ओऽ दादूऽऽ !

पण गाडीच्या खडखडाटांत नि लोकाच्या कोलाहलात विश्वेश्वरला ती हाक पोचली नाहीं. गाडीचा आवाज ऐकूं

येईपर्यंत कैलासचन्द्र आपल्या जागेवरून रेसभरहि ढळले नाहींत. नंतर ते सावकाश घरी परत आले.

१९

घरी पोचल्यावर चन्द्रनाथला जी थोडीफार भीति वाटत होती ती मणिशंकर काकाच्या सांगण्याने मिटली. ते म्हणाले " बाबा, प्रायश्चित्त असतं पापक्षालनासाठी. पण जिनं पापच केलेलं नाही तिला प्रायश्चित्ताची आवश्यकता काय ? सुनेचा काही दोष नाही. उगाच प्रायश्चित्ताची गोष्ट काढून तिचा अपमान करूं नकोस. " मणिशंकर काकाच्या तोंडी हे बोलणे अगदी नवीनच दिसले. चन्द्रनाथ चकित होऊन पहात राहिला. ते पुन्हा म्हणाले, " काही ना काहीं दोष, काही ना काही लाजेकाजेची गोष्ट प्रत्येक घरीं आहे हे पहाता पहाताच मी म्हातारा झालो. मनुष्याला आपल्या दीर्घ जीवनात कितीतरी चालावं लागतं. या दीर्घ जीवनपथात कुठं चिखल, कुठं शेवाळ, तर कुठं उंचसखल असतं. आणि म्हणूनच लोक पाय घसरून पडतात, बाबा. पण ते आपली ही फजीती सांगत नाहीत, फक्त दुसऱ्याविषयी बोलतात. दुसऱ्याचे दोष, दुसऱ्याविषयीच्या लज्जास्पद गोष्टी घसा फोडून ते सांगतात; का, तर केवळ स्वतःचे दोष लपविण्यासाठी. त्याना वाटतं की, दुसऱ्याविषयीच्या कोलाहलात आपल्या लाजिरवाण्या गोष्टी उघडकीस येणार नाहींत " चन्द्रनाथ निमूटपणे ऐकत होता. जरा वेळ थांबून

मणिशंकर पुन्हा म्हणाले, " परक्याला आपलासा पण करता येतो, परका पण मानता येतो. परंतु, जो आपलाच आहे त्याला कोण परका लेखूं शकेल ? इतके दिवस मी आंधळा होतो, पण आज विशूने मला डोळस केलं. त्याच्या पुण्याईनं सगळं पवित्र झालं. आज द्वादशी. पूर्णिमेच्या दिवशी तुझ्या घरीं जेवायला येण्याचं मी सगळ्या गावकऱ्याना आमंत्रण दिलं आहे. पूर्वी दादा होते तेव्हा तेच सर्व कार्य करत, त्यामुळं मी कधींच काहीं करूं शकलो नाहीं. म्हणून माझ्या मनातून विशूचं पुन्हा उद्यावण करावं असं आहे."

थोडा विचार करून चन्द्रनाथ म्हणतो "पण समाज—"

मणिशंकर हंसून म्हणाले, " समाज आम्हीं, समाज तूं. आणखी कोणी या गावात तरी नाही. ज्याच्यापाशीं संपत्ति आहे तोच समाज-पति ! मला वाटलं तर मी तुझी जात बाटवूं शकतो, तुला वाटलं तर तूं माझी जात बाटवूं शकतोस. समाजाची पर्वा करूं नकोस. आणखी एक गोष्ट सागतो— जी अजूनपर्यंत सागितली नाही, कदाचित् कधींहि सागितली नसती. पण मला वाटतं आता तुझ्याकडे ती गोष्ट काढल्यान काहीं तोटा होणार नाहीं. तुला राखालदास भट्टाचार्यांची गोष्ट आठवते ? "

" हो, हरिदयाळच्या पत्रात त्याची हकीकत वाचली होती."

" आमच्या कुटुंबात लाज मानण्यासारखी घडलेली एकादी

गोष्ट फक्त तोच शाबीत करूं शकला असता. पण आता तो कसलीच गोष्ट काढणार नाहीं. मी त्याला कैदेत घातलं होतं; थोडे दिवस झाले तो सुटून. आता कुठं गेला कोण जाणे. मात्र, पुन्हा इकडच्या बाजूला फिरकणार नाही एवढं खास. ''

नंतर राग्वालची सगळी कहाणी मणिशंकरनी निवेदन केली. ती ऐकून चन्द्रनाथचे डोळे भरून आले.

पूर्णिमेस सर्व लोकाना जेवण घालण्यात आले. सबंध गावात कोणी कसलीच गोष्ट काढली नाही. मणिशंकर बाबूंची वागणुक पाहून सर्वांना खात्री पटली की, उगीचच एक कंडी पिकवण्यात आली होती; कदाचित् ती एक जमिनदारी चलाखी असेल !

हरकाली आपल्यापुरता निराळा सैपाक करून जेवली. आता ती मंडळी या गावात राहाणार नाहीं, आपल्या घरीं जाणार, हरकाली म्हणाली, “ प्राण गेला तरी बेहत्तर. पण मी आपला धर्म कोणत्याहि कारणाने सोडूं शकत नाही. ''

ही गोष्ट बरीवाईट कशीहि असो. चन्द्रनाथने त्यांना पन्नासाऐवजी शंभर रुपये दरमहा देण्याचे ठरवलें.

× × ×

उत्सव समाप्त झाल्यावर नाच-गाणे थांबले तेव्हा रात्रीं फार उशीरा चन्द्रनाथ खोलींत येऊन पहातो तर, दागदागिन्यानी नखशिखान्त सजलेली राजराजेश्वरीसारखी सरयू माडीवर झोपीं

गेलेल्या मुलाला घेऊन आपल्या वाटेकडे डोळे लावून जागत बसली आहे.

आज पूर्णिमा होती.

चन्द्रनाथ म्हणाला,—“ छान ! छान ! ”

गालातल्या गालात हंसून सरयू म्हणाली, “ सखि काहीं केल्या सोडीनाच आज ! ”

## २०

त्या रात्री एक एक पाऊल मोजत वृद्ध कैलासचन्द्र घरीं परत आले. तुळशीवृंदावनाच्या सोप्यावर अजून पणती तेवत होती, तरी चहूंकडे त्याना भेसूर अंधःकार भासला. अद्याप-पर्यंत येथे सगळेजण होते, पण आता कोणी नाही ! मातीची पणती मात्र तेवत आहे. परंतु आता तिचे आयुष्यहि संपत आले. सरयू आपल्या हातानी ही पणती लावून गेली.

कैलासचन्द्र येऊन पलंगावर पडले. त्याचे दोन्ही डोळे झोपेच्या भराने मिटत होते. पण मध्येंच त्याना वाटे कीं, जणूं कुणीतरी हाक मारत आहे,—दादू ! त्याना स्वप्न पडले,— भरत राजा त्याच्या छातीवर मृत्यु-शय्या अंथरून आपल्या क्षीण ओठानी कापत कापत म्हणतो आहे—परत ये ! परत ये ! परत ये !

सकाळ झाल्यावर ते पलंगावरून उठले आणि बाहेर येताच

त्यानीं नेहमींच्या संवयीनुसार हाक मारली—विशू ! मागाहून त्याना आठवले कीं, विशू तर नाही, आपल्या घरीं गेला तो !

मग बुद्धिबळाची पोटली घेऊन ते शंभू मिश्राच्या घरी गेले. त्याना हाक मारून ते म्हणाले, " मिश्रजी, आमचा दादा गेला हो ! "

दादावर सर्वांचे प्रेम होते. मिश्रजीनाहि वाईट वाटलें. कैलासचन्द्र पट पसरून बुद्धिबळे लावूं लागले तेव्हा मिश्रजीनी त्याना विचारले, " बाबूजी, तुमचा तो वजीर काय झाला ? "

कैलासचन्द्र दीर्घ उसासा सोडून म्हणाले, " अरे हो मिश्रजी, तो तर विशू घेऊन गेला. त्याला वजीर भारी आवडे. मुलगाच तो, काही केल्या ऐकेना. "

आपण स्वतःच्या इच्छेनेच विशूला तो वजीर देऊन आपली प्राणप्रिय बुद्धिबळे खंडित केली हे सांगण्यास कैलाचन्द्राना लाज वाटली.

मिश्रजींनी विचारले, " मग दुसरीं बुद्धिबळे काढूं का ? "

" हं, काढा. " कैलासचन्द्र म्हणाले

खेळात कैलासचन्द्र हरले. शंभू मिश्र त्याच्याबरोबर फार दिवसापासून खेळणारे, पण कधी त्याना हरवूं शकले नव्हते. आज कैलासचन्द्र हरण्याचे कारण त्याच्या सहज लक्षात आले. ते म्हणाले, " बाबूजी, विशू तुमची सारी विद्या आपल्याबरोबर घेऊन गेला हो. "

बाबूजीच्या चेहऱ्यावर खिन्न हास्याची रेषा चमकली. ते म्हणाले, " या, आणखी एक डाव खेळून पाहूं. "

" अच्छा. "

खेळता खेळता मध्येंच शह देऊन कैलासचन्द्र ओरडले— विशू !

शंभू मिश्राना हंसूं आले. ते म्हणाले, " इथं तर शह लागलाय, विशू कुठं आहे ? "

दोघेजणहि हंसले !

शंभू मिश्र शह देऊन उद्गारले, " घ्या काका, या खेपेला तुमच्या दोन प्यादा मेल्या. "

कैलासचन्द्र गडबडून म्हणाले, " बाळ ये, लवकर ये रे."

आणि ते जणूं वाट पहातच बसले. त्याना आशा होती की, बस—आता एक सान नाजूक शरीर आपल्या पाठीवर येऊन पडणार. ते उशीर लावत आहेत असे पाहून शंभू मिश्र म्हणाले, " या खेपेला वाटेल ते झालं तरी तुम्ही प्यादी बचावू शकत नाही. " वृद्ध कैलास दचकले व म्हणाले, " हो, हेच तर दोन मोहरे मारले गेले कीं ! "

आणि नंतर खेळ आटोपला. मिश्रजी जिंकले, पण खूष झाले नाहींत. पट मोहरे वगैरे बाजूस सारून ते म्हणाले, "आता पुन्हा कधीतरी खेळूं. आज तुमची तब्येत ठीक नाहीं, मनहि ठिकाणावर नाहीं. "

कैलासचन्द्राना घरीं परत येण्यास दुपार झाली. त्यानी विचार केला कीं, विशू नाहीं मग व्यर्थ घाई कशाला ?

घरीं आल्यावर ते पहातात तर, लखियाची आई सैपाकघरात एकटी बसून सैपाकाची तयारी करत आहे. आज त्याना स्वतःच राधले पाहिजे आणि स्वतःच भोजन केले पाहिजे. स्वस्थपणे मनाला येईल तेव्हा जेवणार. काहीं घाई नाहीं, कुणाची कटकट नाहीं, विश्वेश्वरच्या खोड्याचीहि भीति नाहीं, किती स्वतंत्र !—पण हे सर्व त्याना आवडले नाहीं. सैपाकघरात येऊन पहातात तर मूठभर तादूळ, दोनतीन बटाटे, दोन पडवळे, थोडीशी डाळ,—त्याच्या डोळ्यात आसवे उभीं राहिली. दोन वर्षामागच्या गोष्टी त्याना आठवल्या. तेव्हा याप्रमाणेच केवळ स्वतःसाठी त्याना सैपाक करावा लागे. हीच लखियाची आई सैपाकाची सगळी तयारी करून देत असे. त्या वेळी विशू आलाहि नव्हता कीं गेलाहि नव्हता.

फणसाच्या झाडाखाली त्याचे खेळण्यांतले लहानसे घरकूल अजूनहि तसेच होते. दोन फुटकीं मडकी, हातपाय तुटलेली मातीची बाहुली, नि दोन पैसेवाली पिचलेली मुरली तेथेंच पडली होती. कैलासचन्द्रानी त्या सगळ्या वस्तु लहान बालका-प्रमाणे उचलून आपल्या निजण्याच्या खोलींत आणून ठेवल्या !

पुनश्च ते दुपारच्या प्रहरीं गंगा पाडेकडे बुद्धिबळे पसरून बसूं लागले. संध्याकाळनंतर पुन्हा मुकुंद घोषच्या बैठकींत

मंडळी जमूं लागली. पण खेळण्यात प्रवीण असलेले कैलासचन्द्र आता तसे राहिले नाहीत. पूर्वी ते दिग्विजयी होते. आता खेळावे म्हणून खेळतात झालें. पूर्वी ज्यांना त्यानी हाताला धरून खेळण्यास शिकवले होते तेच आता त्याना चाल कशी करावी ते दाखवत. ज्याच्याबरोबर ते आपले सगळे मोहरे बचावून खेळूं शकत, तेच आता छाती पुढे काढून आपल्या मनाप्रमाणे उंट वगैरे मारून खेळ सुरू करत.

कैलासचन्द्राना पूर्वीप्रमाणे अजूनहि खेळण्याची हौस होती, पण उमेद राहिली नव्हती अद्यापहि एकदोन उत्तम डाव त्याना सुचत, पण सबंध खेळात त्याच्याकडून फार चुका होत. बुद्धिबळे खेळण्यात त्याना अगोदर गर्व वाटे, पण आता तो केवळ लज्जेत परिणत झाला. मात्र शंभू मिश्र आजलाहि त्याचा मान राखत. आता ते त्याचे प्रतिस्पर्धी म्हणून खेळत नसत, उलट, प्रसंगी एकादा बिकट डाव आपणच खेळून दाखवत.

कैलासचन्द्राच्या घरी आताशीं फार धादल उडूं लागली. लखियाची आई त्याच्यावर फार रुसायची. दोनएकदा आपलीं टिपे पुसतांनाहि ती दिसली. ती म्हणे, " बाबूजी, हल्ली खाणंपिणं अगदीं टाकलंत; जरा आरशात आपला चेहरा तरी पहा. "

यावर कैलासचन्द्र हंसून म्हणत, " रांधणं-वाढणं सगळं विसरून गेलो. आगीजवळ जाववत नाही मला. "

लखियाची आई फार जुनी मोलकरीण. ती सोडत नसे, बोलूनसवरून मुठभर तांदूळ शिजवायला लावीच.

अशा प्रकारे एक महिना गेला.

नंतर तीनचार दिवसपर्यंत कैलासकाकाना कोणी बघितलें नाही. सर्वांप्रथम शंभू मिश्राचे या गोष्टीकडे लक्ष गेले. ते चौकशीला आले. त्यानी येऊन हाक मारली,—बाबूजी !

लखियाची आई त्याना म्हणाली, " बाबूजीना ताप येत आहे. "

मिश्रजी घरात आले आणि कैलासचन्द्राच्या अंथरुणापाशीं बसून म्हणाले, " कसं काय बाबूजी, ताप आलाय् का ? "

कैलासचन्द्र हंसून म्हणाले, " हा मिश्रजी, मला बोलावणं येत आहे, म्हणून हळूहळू जातो आता "

मिश्रजी म्हणाले, " छे छे ! बरे व्हाल हो. "

" आता बरं होण्याचं वय राहिलं नाही, ठाकूर. या खेपेला जावंच लागेल."

" वैद्याला बोलावलं होतं का ? "

कैलासचन्द्र हंसून म्हणाले, " मिश्रजी, आता अठ्ठावन वर्षांच्या वयात वैद्य येऊन काय करणार ? "

"अठ्ठावन वर्षे म्हणजे काय वय झालं का? लोक तर आणखी अठ्ठावन वर्षे जगतात!"

याचे उत्तर न देता कैलासचन्द्र एकदम म्हणाले, "अरे हो मिश्रजी, आमच्या विशूनं पत्र पाठवलंय् बरं का. लखियाची आई, जरा खिडकी उघड; मिश्रजीला पत्र वाचून दाखवतो." आणि उशीखालून एक पत्र काढून त्यानी अतिशय कष्टपूर्वक सुरवातीपासून शेवटपर्यंत ते वाचून दाखवले. पत्र बगालीत होते. हिंदुस्थानी मिश्रजीला त्यापैकी काहीं मजकूर समजला, काही समजला नाहीं.

रात्री शंभू मिश्रानी वैद्याला आणले. वैद्य बंगाली असून कैलासचन्द्राना पूर्वीपासून ओळखणारा होता. त्याच्या दोनतीन प्रश्नाची उत्तरे देऊन कैलासचन्द्र म्हणाले, "वैद्यबुवा, माझ्या दादानं पत्र लिहिलंय हो. वाचून दाखवतो हं, जरा ऐका."

कैलासचन्द्राच्या 'दादा'ला वैद्य जाणत नव्हता. त्यानें विचारले, "कुणाचं पत्र?"

"विशू दादाचं! लखियाची आई जरा दिवा इकडे आण पाहूं."

आणि दिव्याचा उजेडात त्यानी सबंध पत्र वाचून दाखवले. वैद्य आपले पत्र ऐकत आहे किंवा नाही इकडे त्याचे मुळींच लक्ष नव्हते. ते सरयूने लिहून दिलेले विशूचे पत्र आहे हीच म्हाताऱ्याची सांत्वना, हेच सुख. औषध देऊन वैद्य गेला. शंभू

मिश्राना बोलावून कैलासचन्द्र आपल्या विश्वेश्वराच्या रूपा-गुणाची, बुद्धि इत्यादीची वाखाणणी करूं लागले.

दोन आठवडे लोटले. पण कैलासचन्द्राचा ताप उतरला नाही. मग त्यानी आळीतील एका मुलाला बोलावून विशूला पत्र लिहवले. त्या पत्राचा मतितार्थ हा होता कीं, आपण इकडे खुशाल आहोत. पण सध्या प्रकृति जरा खालावली आहे. तरी काळजी करण्याचे कारण नाहीं.

कैलासकाका वाचण्याची आशा नाही असें हरिदयाळनी ऐकले तेव्हा ते पण त्याना पहाण्यास आले. इकडच्या तिकडच्या दोनचार गोष्टी झाल्यावर कैलासचन्द्रानी पुन्हा उशीखालून तेच पत्र काढले, आणि हरिदयाळच्या हाती देऊन म्हटले, "घे बाबा, वाच पाहूं हे."

पत्र अगदी मळकट झाले होते. दोनएक ठिकाणीं थोडेसे फाटलेहि होते. शक्य तितके हरिदयाळनी वाचले. ते म्हणाले, "हे तर सरयूनं लिहिलंय."

"हो, लिहिलंय सरयूनं खरं, पण आहे माझ्या दादाचं पत्र."

"हं, शेवटी त्याचं नाव आहे."

हरिदयाळच्या या बोलण्यानें कैलासचन्द्रांचें समाधान झालें नाही. ते म्हणाले, "त्याचंच नाव, पत्रहि त्याचंच. सरयू केवळ लिहिणारी. विशू लिहायला शिकला कीं, मग स्वतःच मला पत्र पाठवत जाईल."

हरिदयाळनी मान डोलावली.

कैलासचन्द्र मोठया उत्साहाने पुढें सांगूं लागले, " काय बाबा, वाचलंस ? आमचा विशू रात्रीं ' दादू दादू ' म्हणून ओरडतो नि रडूं लागतो. तो मला कधी विसरूं शकेल काय ?" तत्क्षणीच त्याच्या डोळयातून दोन मोठाली टिपे ओघळून उशीवर पडली.

लखियाची आई जवळच होती. तिने हरिदयाळला खूण करून बाहेर बोलावले आणि सांगितले, " ठाकूर, आता आपण जा. इथं राहिलात तर हे दिवसभर हीच गोष्ट बोलत रहातील. "

आणखीहि चार-पाच दिवस लोटले. कैलासचन्द्राची प्रकृति फारच बिघडली. शंभू मिश्र अहोरात्र जवळ असत. मधुन-मधून वैद्य देखील बघून जाई. आज सबंध दिवस शुद्धि नव्हती. संध्याकाळनंतर जरा सावध झाले. त्यानंतर काहीं वेळ शुद्धीवर, पुन्हा बेशुद्ध अशी अवस्था राहिली. मध्यरात्रीच्या सुमारास ते बरळले—" विशू दादा, आमचा वजीर दे ना. नाही तर माझ्यावर मात होईल ? "

शंभू मिश्रानी जवळ जाऊन विचारले, " बाबूजी, काय म्हणता ? "

कैलासचन्द्रानी एकदा त्याच्या तोंडाकडे पाहिले आणि गोधळून उशीखालीं हात घातला. जणूं त्याचे काहींतरी हर-

वले असून या वेळी त्याची फार निकड आहे, पण शोधूनहि ते सापडत नाहीं असे दिसले. नंतर त्यांनी हताश होऊन कुशीं वळत म्हटले, “ विशू, विश्वेश्वर—आता तेवढा वजीर देना. वजीरावाचून मी कोठवर खेळणार ? ”

या विश्वरूपीं बुद्धिबळाच्या खेळात कैलासचन्द्राचा वजीर हरवला असून, जणूं कातर भावाने ते विश्वपतीकडे त्या वजीराची याचना करीत होते. शंभू मिश्र त्याच्या जवळ जाऊन उभे राहिले. लखियाच्या आईने त्याच्या तोडाशीं दिवा नेऊन पाहिले,—त्याचे डोळे ताठ उघडे पडले होते, केवळ ओंठ जणूं अजूनहि थरथरत म्हणत होते,—विश्वेश्वर ! वजीरावाचून मी कोठवर खेळणार रे ? दे बाबा, आता तेवढा वजीर दे ना; दे बाबा, दे !....

* * *

दुसरे दिवशीं हरिदयाळनी चन्द्रनाथला पत्र लिहिले की, काल रात्रीं कैलासचन्द्राचे देहावसान झाले !